मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्मयीन नियतकालिक


युगवाणी

जुलै । ऑगस्ट । सप्टें. २०१७



अनुक्रमणिका

रंगरेषा



तैलचित्र : कृणाल धनजोडे



तैलचित्र : आरती मानकर


मकर संक्रांत १९२३

विदर्भ साहित्य संघाचे
वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे

जुलै । ऑगस्ट । सप्टेंबर २०१७




अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

वर्ष ७२ वे

जुलै । ऑगस्ट । सप्टेंबर २०१७



- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक, संपादक मंडळ आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

संपादक
डॉ. अनिल नितनवरे

संपादक मंडळ
डॉ. मोना चिमोटे
सदानंद बोरकर
डॉ. पद्मरेखा धनकर
डॉ. तीर्थराज कापगते

रेखाचित्रे
प्रमोदकुमार अणेराव

मुखपृष्ठ
कार्तिक के.

मुद्रितशोधन
दीपक रंगारी

प्रकाशक
विलास मानेकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

अक्षरजुळवणी, मांडणी व मुद्रण
माधव लोखंडे
मलय ग्राफिक्स
सुभाषनगर, नागपूर
भ्रमण : ९३२६९९९०१५

या अंकाचे देणगी मूल्य : १०० रुपये
वार्षिक वर्गणी : २०० रुपये
त्रैवार्षिक वर्गणी : ५०० रुपये


पत्रव्यवहार
संपादक युगवाणी
विदर्भ साहित्य संघ
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७
ई-मेल : yugwani.nagpur@gmail.com

अनुक्रमणिका


विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

युगवाणी

जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर २०१७



अंतरंग



| भाषणे

अध्यक्षीय भाषण : ८० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

अरुण साधू

मराठी भाषेचे भवितव्य :

आता मुख्य मुद्दा आहे मराठी भाषेसंबंधीच्या काही समस्यांचा. एखाद्या समाजाची भाषा त्याचा इतिहास, भूगोल, संस्कृती, उद्योग-व्यवसाय, दैनंदिन व्यवहारांच्या पद्धती आणि त्यामधून घडलेली त्याची सामूहिक मानसिकता यांपासून अलग काढता येत नाही. आपणा सर्वांचे मराठी भाषेवर प्रेम आहे. मराठीत बोलताना, लिहिताना, ऐकताना, वाचताना जो मनमोकळा व निर्मळ आनंद वाटतो तो आपल्याला दुसऱ्या कोणत्याही भाषेत मिळत नाही. मराठी वाचून जे आकलन होते ते पक्के हृदयात ठसून बसते. अनेकांना आपली भाषा जगात सर्वश्रेष्ठ वाटते आणि तसे वाटायला हरकत नाही. सर्वांचेच आपल्या आईवर प्रेम असते. तसेच भाषेबद्दलही आहे. सर्वांनाच आपापल्या भाषेचे प्रेम आणि अभिमान असतो, तसा आपल्यालाही आहे हे चांगले. आपले प्रेम किती मनःपूर्वक आणि खोल, आपला अभिमान किती सार्थ व खरा, तसेच या प्रेमासाठी व अभिमानासाठी आपण आपल्या भाषेला काय देतो, तिला कसे वागवतो ही गोष्ट वेगळी.

आणखी एक गोष्ट. समाज व संस्कृतीच्या सर्व अंगांशी एकजीव झालेली असली तरी भाषा म्हणजे सजीव प्राणी नव्हे. मूलतः भाषा हे मानवी समूहामध्ये वावरताना परस्पर संवाद साधून व्यक्तीचे समाजात अस्तित्व टिकविण्याचे, जिवंत राहून प्रगती करण्याचे साधन आहे. व्यवहार वाढला की भाषा हळूहळू व्यावहारिक, बौद्धिक व सांस्कृतिक प्रगतीचे साधन बनते. म्हणजे भाषा ही जिवंत वस्तू नसून ते एक साधन आहे, साध्य नव्हे. हे आपण ओळखले की बऱ्याच गोष्टी सुलभ होतात. 'जिवंत' भाषा असा शब्दप्रयोग आपण करतो तो ती भाषा साधन म्हणून आपण लवचीकपणे वापरू शकतो; तिच्यात काव्य करू शकतो, विविध क्षेत्रांमध्ये संवाद करण्यास ती उपयुक्त असते आणि सर्वत्र ती वापरून चांगल्या प्रकारे आपले जीवनव्यवहार करता येतात या अर्थाने. भाषातज्ज्ञ सांगतात, भाषेला स्वतंत्र अस्तित्व नसतेच. काही पाश्चात्त्य वाङ्मयात भाषेचे जिवंत अस्तित्व कल्पून तिला माणसाप्रमाणेच राग, लोभ, मत्सर, असूया वगैरे विकार असल्याचे दाखवितात. वेडी भाषा, खुनी भाषा, दुश्मन भाषा, मित्र भाषा असे प्रकारही कल्पिले जातात. हा कल्पनेचा खेळ असला तरी प्रत्येक भाषा विशिष्ट मानवसमूहाशी निगडित असल्याने त्या समूहावरील आरोपच भाषेवर केले जातात. वास्तवात भाषा ही बांडगुळाप्रमाणे असते. ज्या समूहाच्या ऊर्जेवर ती उत्क्रांत होते त्या समूहाचे संवादकौशल्य आणि तो सभोवतालच्या बदलणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीशी कसा सकारात्मक

अनुक्रमणिका

तडजोड करतो यावर ती भाषा किती दमदार आहे, तसेच तिचा टिकाऊपणा, कमजोरी आणि तिचा मृत्यू इत्यादींचा अंदाज घेता येतो. वेगळ्या समूहांच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्याच्या पद्धती किती भिन्न हे पाहून त्यानुसार भाषा क्षीण होते आहे, बदलते आहे की मृत्युपंथाला लागली आहे याचा अंदाज बांधू शकतो. अशा स्थानिक पर्यावरणावर जागतिकीकरणाची प्रक्रिया कशी प्रभाव टाकते आहे व त्या खळबळीशी तेथील लोक कसे जुळवून घेतात यावरही त्या भाषेच्या भवितव्याचा अंदाज लागू शकतो.

स्वभाषा म्हणजे आपले घर असेही म्हणायला हरकत नाही. घराचे मुख्य व महत्त्वाचे काम ऊन, वारा, पाऊस यांपासून निवारा देणे. आपण झोपडीतही राहू शकतो. हळूहळू आपण घर विस्तारतो. त्यामध्ये अधिकाधिक सोयी-सुविधा जमवतो, झोपडीचा बंगला किंवा मोठा प्रासादही होतो. ते घर आपण सौंदर्यपूर्ण शृंगारतो. घर नुसतेच ऊन-पावसापासून निवारा देत नाही, ते आपल्याला सुख-समाधानही देते. घर आपली संस्कृती दर्शविते, आपले व्यक्तिमत्त्व प्रकट करू लागते. पण घर या गोष्टी स्वतः करीत नाही. कारण त्याला जीव नाही. या गोष्टी आपल्याला कराव्या लागतात. घराला आपणच तन्य द्यावे लागते, जिवंतपणा द्यावा लागतो. आपण ठेवू तसे घर. तद्वतच आपण ठेवू तशी भाषा. भाषेला समाजाशिवाय स्वतंत्र अस्तित्व नसते. समाजाचे न्यून ते भाषेचे न्यून आणि समाजाचा पराक्रम तो भाषेचा पराक्रम. तलवारीचा स्वतंत्र पराक्रम कसा असू शकतो? एक तलवार मोडली तर योद्धा ती फेकून दुसरी उचलतो. तलवारीला पाणी देऊन तेज ठेवावे लागते. घर आपल्यालाच व्यवस्थित, सुस्थितीत व कलापूर्ण ठेवावे लागते. सुंदर ठेवावे लागते. बागेची आपणच निगा राखायची असते. तशी भाषेची निगा राखली नाही तर ती अराजकी होते. घर लहान पडायला लागले, मोडकळीस येऊन पडझड होऊ लागली तर ते पाडून आपण दुसरे बांधतो किंवा विकून दुसरे घेतो. त्याचप्रमाणे भाषेची उपयुक्तता कमी झाली तर आपण घराप्रमाणे तिच्यात दुरुस्त्या करतो, बदल करतो किंवा प्रसंग पडला तर त्या त्या व्यवहारापुरती दुसरी उपयुक्त भाषा स्वीकारतो.

भाषेची आजची स्थिती :

या गोष्टी स्पष्ट केल्यावर व्यापक परिप्रेक्ष्यात मराठी भाषेची स्थिती काय आहे ते जोखून घेतले पाहिजे. आज जगामध्ये सुमारे ६,००० भाषा बोलल्या जातात. त्यातील वीस लाखांच्या वर लोक बोलतात अशा भाषा साडेतीनशेच्या आसपास आहेत. या सगळ्याच प्रगल्भ व स्वतःची लिपी असलेल्या भाषा नव्हेत. डाटाबेस ऑफ एथनॉलॉग्ज लँग्वेजेस ऑफ द वर्ल्ड या २००४ च्या पाहणीत मोठ्या संख्येने बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा जगात तेरावा क्रमांक लागतो. पण तो चुकीचा असावा; कारण त्यामध्ये मराठी बोलणाऱ्यांची संख्या फक्त ६.८ कोटी दिली आहे आणि बाराव्या क्रमांकावरील तेलुगु बोलणाऱ्यांची ६.९ कोटी. इ.स. २००४ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या ९.५ कोटींच्या आसपास होती आणि मराठी प्रथम भाषा असणाऱ्यांची ८ कोटींच्या आसपास. त्यामुळे काही लोक मराठीला दहावा जागतिक क्रमांक देतात. मुद्दा असा की मराठी ही स्वतंत्र लिपी, १२०० वर्षांच्या वर इतिहास व ८०० वर्षांपासून प्रगल्भ काव्य व साहित्य असलेली जगातील बारा-पंधरा प्रमुख भाषांपैकी एक आहे.

मराठी भाषेत आज साडेतीनशेच्या वर नियतकालिके प्रसिद्ध होतात. दैनिके १२७ निघतात व त्या बाबतीत मराठीचा देशात चौथा क्रमांक आहे. पाठ्यपुस्तके सोडून वर्षाला चार-पाच हजार मराठी पुस्तके बाजारात येतात. मराठी दैनिक वृत्तपत्रांचा एकूण खप पन्नास ते साठ लाखांच्या आसपास आहे आणि त्यांचा वाचकवर्ग किमान दोन कोटी तरी. प्रत्येक प्रकाशित पुस्तकाची सरासरी एक हजाराची आवृत्ती धरली तरी चाळीस-पन्नास लाख मुद्रित पुस्तके दरवर्षी नव्याने बाजारात येतात असे म्हणायला हरकत नाही. गेल्या दोन-तीन वर्षांत नवे मराठी चित्रपट पडद्यावर झळकण्याचे प्रमाण वाढले आहे हे खरे. शाळा-कॉलेज नाट्यस्पर्धा, कामगार रंगभूमी, जिल्हास्तरापासून तो राज्यपातळीपर्यंत होणाऱ्या शासकीय नाट्यस्पर्धा, हौशी, प्रायोगिक आणि व्यावसायिक नाट्यप्रयोग अशी वर्षभर जी जोमदार रंगभूमी चळवळ महाराष्ट्रात सतत सुरू असते तसे दृश्य जगात दुसऱ्या कोठल्याच भाषेत दिसणार नाही. आज फक्त मराठी भाषेत चोवीस तास चालणाऱ्या तीन उपग्रह वाहिन्या आहेत. त्यांना भरपूर जाहिराती मिळतात त्या अर्थी त्यांना बऱ्यापैकी प्रेक्षकवर्ग आहे. सहकारी साखर कारखान्यांचे, आधुनिक शेतीचे, फुले-फळे यांच्या व्यापाराचे व्यवहार चोख मराठीत सुरू आहेत. म्हणजे मराठी भाषा चांगली

अनुक्रमणिका

जोमदार असून तिचे नीट चालू आहे, असे म्हणायला हरकत नाही.

भाषातज्ज्ञांच्या मते तीन शतकांपूर्वी ६००० पेक्षा अधिक भाषा जगात बोलल्या जात होत्या. त्यातील कित्येक भाषा स्वतंत्र बेटांसारख्या होत्या व त्यांचा दुसऱ्या भाषांशी क्वचितच संपर्क असे. पंधरा-सोळाव्या शतकांपासून दर्यावर्दी व्यापारी जगभर हिंडू लागले, युरोपियन देशांनी साम्राज्ये स्थापन केली, दळणवळणाच्या साधनांनी वेग घेतला तेव्हा भाषा व विविध संस्कृत्यांमधील आदान-प्रदानाला वेग आला. या प्रक्रियेत जास्त संख्येने बोलल्या जाणाऱ्या, समृद्ध, प्रगल्भ, लष्करी बळ व व्यापारी समृद्धी असलेल्या देशांच्या भाषा कमजोर भाषिक गट स्वीकारू लागले किंवा जेत्या साम्राज्यकर्त्यांची भाषा म्हणून त्यांच्यावर लादल्या जाऊ लागल्या. कमजोर भाषा हळूहळू नुसती बोलीभाषा किंवा कुटुंबभाषा बनत नष्ट होऊ लागल्या. विसाव्या शतकात तांत्रिक प्रगती झाली आणि व्यापार व व्यवसाय जागतिक रूप धारण करू लागले. त्यामुळे हा वेग वाढला. इ.स. १९९० च्या सुमारास वर्षाला अंदाजे २०० भाषा लयास जात होत्या.

दुर्बल भाषा लयास जात आहेत :

संज्ञापन व डिजिटल क्रांतीमुळे गेल्या पंधरा वर्षांत भाषिक संस्कृत्यांमधील संपर्क व आदान-प्रदान एवढ्या वेगाने वाढले की दरसाल अस्तास जाणाऱ्या भाषांची संख्याही वाढली. कित्येक बहुभाषिक समाजांमध्ये शेकडो वर्षे चालत आलेल्या संपर्क प्रक्रियेने प्रवेग धारण करून तेथील सत्ता, संपत्ती व संख्या या बाबतीत कमजोर असलेल्या भाषा बळी पडू लागल्या. भाषाशास्त्रज्ञांच्या सध्याच्या अंदाजाप्रमाणे आजच्या जागतिकीकरणाच्या वेगवान प्रक्रियेमध्ये येत्या अर्धशतकात हजारो बोली व भाषा पृथ्वीवरून नष्ट होतील व त्यामध्ये २० लाखांच्या वर बोलल्या जाणाऱ्या भाषा तर असतीलच; पण स्वतंत्र लिपी व साहित्य असलेल्या भाषाही क्षीण होत मृत्युपंथाला लागतील. बलदंड अर्थव्यवस्था असलेल्या देशातील समृद्ध भाषा ज्या विविध शास्त्रांमध्ये संचार करू शकतात त्या टिकतील. बाकीच्याही कित्येक टिकतील पण त्या बोलीभाषा व कुटुंबभाषा म्हणून. येत्या शतकाच्या आत जागतिक व्यवहाराची, राजनीतीची, व्यापाराची, संवादाची, संगणकाची भाषा इंग्रजीसारखी एकच असेल. पण ती शेक्सपियरची, इंग्लंडच्या राणीची, जवाहरलाल नेहरूंची किंवा सलमान रश्दीचीही इंग्रजी नसेल. चिनीसह अनेक समृद्ध भाषांचा तिच्यावर प्रभाव पडून ती बदललेली इंग्रजी असेल. जागतिक व्यवहारात थोड्याफार प्रमाणात कदाचित चिनी, हिंदी, स्पॅनीश, पोर्तुगीज, रशियन इत्यादी भाषा अस्तित्व टिकवून ठेवतील. जागतिकीकरणाचा व आधुनिक जागतिक बाजारपेठेचा वेग व झपाटा एवढा विलक्षण आहे की जागतिक व्यवहारभाषा बनलेली इंग्रजी इतर भाषांचे झपाट्याने शोषण करीत स्वतः समृद्ध होत जाईल. या प्रक्रियेत झेक, पोलीश, हंगेरियन, स्विडीश, फिनीश, नॉर्वेजियन यासारख्या इतिहास असलेल्या प्रगल्भ युरोपियन भाषाही कदाचित बोलीभाषा बनून जातील.

आजच्या युरोपियन देशातील सुशिक्षित लोक, विद्यापीठीय शिक्षक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर इंग्रजीचा वापर करू लागले आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाच्या पुस्तकांमध्ये पारिभाषिक शब्द लॅटीन व ग्रीकमधून घेतले असल्याने युरोपियन देशातील वैज्ञानिक व विद्यार्थी एकमेकांची परिभाषा समजू शकतात. स्वभाषेचे कडवे अभिमानी फ्रेंच व्यापारी व दुकानदार दहा-पंधरा वर्षांपूर्वी इंग्रजी समजत नसल्याचे नाटक करीत. आता व्यापारी स्पर्धेमध्ये इंग्रजीशिवाय तरणोपाय नाही म्हणून पॅरीसमधील दुकानदार, हॉटेलमधील वेटर, टॅक्सी-ड्रायव्हर हळूहळू इंग्रजी बोलू लागले आहेत. युरोपियन भाषांची ही अवस्था तर इतरांची काय कथा, असा या अंदाजतज्ज्ञांचा रोख आहे. चिनी लोकांनी तर गेल्या वर्षापासून वरून हुकूम आल्याप्रमाणे इंग्रजी शिकून घेण्याची मोहीमच काढली आहे.


मात्र वर उल्लेखिलेल्या युरोपियन भाषा या स्थानिक बोली किंवा कुटुंबबोली बनून जातील की काय याबद्दल अंदाजतज्ज्ञांमध्ये एकमत नाही. या भाषा समृद्ध असून त्यांमध्ये प्रगल्भ साहित्याची निर्मिती कित्येक शतके होत आहे. तेथील साक्षरता ८० ते १०० टक्के आहे. लोक वाचनाभिमुख असल्याने साहित्य, काव्य चांगले खपते. पुस्तके महाग असतात पण वाचक समृद्ध असल्याने विकत घेऊ शकतात. साहित्यव्यवहारावर लेखक बऱ्यापैकी तेथील राहणीमानाप्रमाणे जगू शकतो. शिवाय तेथील चांगल्या पुस्तकांची इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनीश वगैरे भाषांमध्ये अनुवाद सहज होण्याची व्यवस्था असते. बहुतेक स्कॅन्डिनेव्हियन लेखक चांगले इंग्रजी बोलू शकतात आणि इंग्लंड-अमेरिकेतील साहित्य

अनुक्रमणिका

चर्चासत्रांमध्ये भाग घेण्यासाठी, आपली इंग्रजी भाषांतरे खपविण्यासाठी दौरे करीत असतात. या सर्व कारणांमुळे या भाषा नुसत्या बोलीभाषा होण्याचा संभव कमी असून त्यांचा साहित्य-संसार सुखाने चालूच राहील. मात्र त्यांच्या भाषांमध्ये विविध क्षेत्रातील शास्त्रीय परिभाषा निर्माण होणे खूपच मंदावले असून जागतिक व्यवहारामध्ये हे देश अधिकाधिक इंग्रजीच्या जवळ जात राहतील.

प्रमाण मराठी आणि बोलीभाषा :

मराठीच्या मालवणी, कोकणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपुरी किंवा झाडीबोली अशा सगळ्या बोलींमध्ये प्रमाण मराठीत नाहीत असे कित्येक वैशिष्ट्यपूर्ण अस्सल मऱ्हाटी शब्द अजूनही वापरले जातात. ते स्वीकारले तर प्रमाण मराठी भाषा अधिक समृद्ध व सक्षम होऊ शकते. पण शहरे व खेडी यांच्यातील वाहतूक वाढली, गावातील मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले तेव्हा या बोली वापरणाऱ्यांचा घनिष्ठ व वारंवार संपर्क प्रमाण मराठीशी येऊ लागला. या घर्षणामुळे बोलींमधील वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंपदा नाहीशी होत असून त्यांचा तोंडवळा आता प्रमाण मराठीसारखा होऊ लागला आहे. हे मराठी भाषेचेच नुकसान होय. काही दिवसांनी या बोली नष्टप्राय होतील किंवा मराठीत मिसळून जातील. मिसळताना स्वतःचे संचित व शब्दसंपदा घेऊन आल्या तर ते चांगले. पण तसे घडताना दिसत नाही किंवा संबंधित लोक यासाठी प्रयत्न करतानाही दिसत नाहीत. जगातील नष्ट झालेल्या भाषांमध्ये मुख्यतः सर्व खंडांमधील आदिवासी समूहांच्या हजारो भाषा आहेत. त्याव्यतिरिक्त कर्नाटकातील तूलु भाषेसारख्या चांगल्या विकसित भाषाही आहेत. प्रत्येक बोली किंवा भाषा लयास गेली की ती आपल्याबरोबर एक मोठे सांस्कृतिक संचित, ज्ञानभंडार व शब्दभांडार घेऊन जाते. प्रमाणभाषेतीलदेखील किती शब्द गेल्या दहा वर्षांत नाहीसे झालेले आहेत याची कोणीतरी मोजदाद ठेवायला हवी. ते शेकड्यांनी असतील याबद्दल शंका नाही. सूप (पाखडण्याचे), फुंकणी, चूर्ण, आडणी, खलबत्ता, आंगण, न्हाणीघर, स्वयंपाकघर असे आणखी शेकडो शब्द हळूहळू निवृत्तीच्या मार्गावर आहेत. बोलीभाषा व मुख्यप्रवाही भाषा यांचे व्याकरण व गाभा बव्हंशी सारखाच असतो म्हणून विलयाची प्रक्रिया सुलभ होते खरे. दोन किंवा तीन भिन्न संस्कृत्यांच्या भिन्न भाषा जवळ आल्या तर या प्रक्रियेला वेळ लागतो; पण प्रक्रिया चालूच असते.



नोम चोम्स्कीसह पुष्कळ भाषाशास्त्रज्ञांचे तर असे म्हणणे आहे की, मानवी मेंदूच्या विशिष्ट मर्यादांमुळे भाषा विकसित करताना आणि तिची व्याकरणयुक्त रचना होत असताना सर्वत्र माणसाचा मेंदू एकाच पद्धतीने काम करीत असल्याने जगातील सर्व भाषांच्या व्याकरणामध्ये रचनात्मक सूत्रे समान आहेत. या सिद्धांताला युनिव्हर्सल ग्रामर-वैश्विक व्याकरण असे म्हणतात. त्यामुळे वरवर पाहता विविध भाषांच्या व्याकरणरचना उलट्यासुलट्या वाटल्या तरी त्या एका रुळावर येणे कठीण नाही. दुसरा एक भाषातज्ज्ञ म्हणतो की या दृष्टीने जगातल्या सर्व भाषांमध्ये इतके साम्य आहे की, एखादा मंगळावरचा अभ्यासक पृथ्वीवर अवतरलाच तर त्याला या ग्रहावर सर्व लोक एकच भाषा बोलतात असे वाटू शकेल. म्हणूनच बहुभाषिक समाजामधील सर्व भाषा प्रगल्भ असल्या तरी सर्वसामान्य व्यवहारामध्ये, बाजारामध्ये वापरली जाणारी आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेली भाषा हळूहळू प्रभाव पाडू लागतेच. दुर्बळ भाषांचे कंगोरे गुळगुळीत होऊ लागतात आणि त्या बलशाली भाषेच्या जवळ जाऊ लागतात. त्या भाषांमधील साहित्यही तसेच रूप घेऊ लागते. मात्र ते होत असताना या कमजोर भाषा आपापली वैशिष्ट्ये व संचिते या सूक्ष्म गतीने बदलणाऱ्या नव्या रूपात बरोबर घेऊन जाऊ शकतात.

अनुक्रमणिका

बलिष्ठ पण लवचीक इंग्रजी भाषा :

विस्तृत संपर्क आणि ११० देशांतील वापर यामुळे इंग्रजी भाषा जगातील बहुतेक भाषांबरोबर घर्षण करीत आहे. जगातील शेकडो भाषांमधील अगणित शब्द आत्मसात करून ती बदलते आहे. आजची इंग्रजी शेक्सपियरचीही नव्हे की चर्चिलची. तिला नायपॉल, रश्दी, विक्रम सेठ इत्यादिकांनी अनेक नवी वळणे दिली आहेत. त्याहीपेक्षा जास्त प्रभाव तिच्यावर पडतो आहे तो डिजिटल क्रांतीचा आणि जागतिक इंटरनेट व्यवहाराचा. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील चटपटीत मुलेही महाजालावर चॅटिंग करू लागली आहेत. ते आपल्या गतीप्रमाणे इंग्रजी-मराठी वापरतात. प्रश्न असा की ही बदलती इंग्रजी खरेच सर्वांवर मात करून विज्ञान-तंत्रज्ञानाची आणि उत्क्रांत होत असलेल्या साधारणपणे एकसंध अशा जागतिक संस्कृतीची एकमेव भाषा होणार आहे काय? विद्वानांमध्ये एकमत नाही. कारण चिनी व हिंदी भाषा जागतिक बाजारपेठेत अजून उतरायच्या आहेत. स्पॅनीश व पोर्तुगीज मातृभाषा असणारे खूप लोक दक्षिण अमेरिकेत आहेत. फ्रेंच व जर्मन भाषांचे बळ अजून कमी झालेले नसून तेथील लोक आपल्या भाषांना अजूनही इंग्रजीपेक्षा अधिक सुसंस्कृत व अभिजात समजतात. जगामध्ये मातृभाषा म्हणून मॅंडारिन चिनी सर्वांत अधिक लोक बोलतात (८७.३ कोटी). त्यानंतरचे क्रम असे : स्पॅनीश (३२.२ कोटी), इंग्लिश (३०.९ कोटी), हिंदी (१८ कोटी) (?), पोर्तुगीज (१७.७ कोटी), बंगाली (१७.२ कोटी).

इंग्लिश व हिंदी भाषांचे वैशिष्ट्य असे की या मातृभाषा नसलेले खूप जास्त लोक त्यांचा वापर करतात, लिहितात. भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, नेपाळ, बांगलादेश इत्यादी देशांतील मिळून शंभर कोटींच्यावर लोकांना हिंदी भाषा परिचित असून नव्वद कोटींच्यावर लोक त्या भाषेत संवाद साधू शकतात. जगातील सर्व देशांत मिळून एकूण १५० कोटी लोक इंग्रजी बोलू शकतात व त्यापेक्षा जास्त समजू शकतात असे समजले जाते. ब्रिटनचे साम्राज्य लयास गेले खरे; पण जगातील एकमेव आर्थिक व लष्करी महासत्ता जी अमेरिका ती बव्हंशी इंग्रजीमधूनच बोलते, हे महत्त्वाचे.

अशी इंग्रजी ही बलिष्ठ भाषा बनली आहे. माहिती तंत्रज्ञान आणि जगातील दळणवळण व्यवस्थेचे व संगणक संज्ञापनाचे, बंदरांचे व विमानतळांचे, हवाई व सागरी वाहतुकीचे सर्व-स्वीकृत नियम (प्रोटोकॉल), आज्ञाप्रणाली इंग्रजीतून आहेत. संयुक्त राष्ट्र संघ त्या अंतर्गत येणाऱ्या सुरक्षा समितीसह सर्व संस्था, जागतिक बँक व जागतिक नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय न्यायालये इत्यादी संस्थांचे बहुतेक कामकाज इंग्रजीमधून चालते. गॅट व डब्ल्यू.टी.ओ. करार, तसेच आण्विक ऊर्जा व अण्वस्त्रे अशा तऱ्हेचे बहुतेक आंतरराष्ट्रीय करार बव्हंशी इंग्रजी भाषेत होतात. चीन व भारत यांच्यामधील करार-मदार इंग्रजीतच होतात. भले मूळ दस्तऐवज त्या त्या भाषांमध्ये किंवा इंग्रजीमध्येही असतील. चीनमधील व्यापार-व्यवसाय, उद्योगधंदे, परदेशी गुंतवणूक यासंबंधीचे पुष्कळ कायदे इंग्रजीत उपलब्ध नव्हते आणि जे होते त्यांचे मसुदे नेमके नव्हते अशी युरोपियन व अमेरिकन गुंतवणूकदारांची तक्रार होती. म्हणून पुष्कळ गुंतवणूकदार भारताकडे वळू लागले. इंग्रजी भाषाकौशल्य हा या दोन देशांच्या शर्यतीतील भारतासाठी फायद्याचा मुद्दा आहे. कॉर्पोरेट भांवडलशाहीची संवादाची भाषा बव्हंशी इंग्रजी आहे. इंग्रजी येत असली तर जगाचा सुखनैव प्रवास करता येतो आणि इंग्रजी येत नसेल तर जगप्रवासात तुम्ही जुजबी इंग्रजी तरी शिकताच.

भाषांतराचे तंत्र :


भाषा अनुवाद तंत्रज्ञानाने किती प्रगती केली ते पाहिले की आणखी गुंता होतो. एका 'पॉवर ट्रान्सलेटर प्रोग्राम'च्या आधारे तुमचा संगणक सहापैकी एका भाषेतील मजकूर इतर कोणत्याही पाच भाषांमध्ये अनुवादित करतो. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनीश, इटालियन आणि पोर्तुगीज या त्या सहा भाषा. ही प्रणाली अजून पक्की झालेली नसली तरी दिवसेंदिवस तिच्यामध्ये सुधारणा होत आहे. एक दिवस असा येऊ शकेल की आपण मराठीतून ई-मेलने बीजिंगला पाठविलेला मजकूर तिथे क्षणार्धात भाषांतरित होऊन चिनी भाषेत मिळेल. पुढची पायरी म्हणजे ध्वनी ओळख प्रणाली. ही प्रणालीदेखील अजून पूर्णत्वाला पोचलेली नाही. पण प्रोग्रामच्या साहाय्याने तुम्ही मराठीत बोलायचे आणि संगणक ते चक्क इंग्रजीत भाषांतरित करीत लिहूनही काढेल. हे लेखन संगणकाने वाचणे हा पुढचा टप्पा विकसित होत आहे. प्रसिद्ध भौतिकी शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांना नीट बोलता येत नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी एक खास व्हॉईस सिंथेसायझर (ध्वनिमिश्रणयंत्र) बनविलेला आहे आणि त्यामधून

अनुक्रमणिका

त्यांचे वेडेवाकडे उच्चार स्पष्ट इंग्रजी शैलीत ऐकू येतात. म्हणजे या यंत्रामध्ये तुम्ही मराठी बोललात तर समोरच्याला तात्काळ भाषांतरित तामीळ किंवा फ्रेंच ऐकू येईल. हे तीनही प्रोग्राम एकत्र केले तर काय गंमत होईल? हे यंत्र तुम्ही आणि तुमच्या हंगेरियन/कोरियन मित्राने कानास लावले आहे. त्याचे हंगेरियन प्रश्न तुम्हाला मराठीत ऐकू येतात आणि तुमची मराठी उत्तरे त्याला हंगेरीयन भाषेत. हे कल्पनेचे खेळ नव्हेत. तांत्रिक प्रगती आजकाल केवढ्या वेगाने होते आहे ते माहीत आहे ना?

लवचीक पण प्रमाणवद्ध, प्रवाही तरीही शिस्तबद्ध...:

या साऱ्या गोष्टींचा येथे उल्लेख केला, कारण आपण मराठी साहित्याच्या, मराठीच्या भवितव्याची चर्चा करतो आहोत. भाषा सन्मानाने टिकवायची असेल तर या तंत्रज्ञानावर स्वार होण्याएवढी ती सक्षम केली पाहिजे. म्हणजेच तिचे व्याकरण काटेकोर सिद्ध केले पाहिजे तरच ती भाषांतर यंत्राला सामोरे जाऊ शकेल. मराठीत लिंग व वचनानुसार लागणाऱ्या प्रत्ययांचे किती असंख्य घोटाळे असतात. काटेकोर व्याकरणासाठी प्रमाणभाषा पद्धतशीरपणे बांधली पाहिजे, शुद्धाशुद्धतेचे श्लेष स्पष्ट केले पाहिजेत. म्हणजे पुन्हा आलाच सामाजिक पर्यावरणाचा विचार. विरोधाभास असा की भाषा जिवंत ठेवायची असेल तर ती प्रवाही व लवचीक पाहिजे, सभोवतालच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक वगैरे पर्यावरणाला सामावून घेणारी असली पाहिजे; त्याचबरोबर तिने आपल्या वृद्धीसाठी व नव्या शास्त्रांची आणि व्यावसायिक क्षेत्रांची आव्हाने स्वीकारण्यासाठी नवनवे शब्द निर्माण केले पाहिजेत आणि नव्या संकल्पना आत्मसात केल्या पाहिजेत. आवश्यक तेव्हा इतर भाषांमधील शब्द स्वीकारून ते पूर्णपणे आपल्या भाषेत घोळवून आत्मसात केले पाहिजेत आणि भाषातंत्रज्ञान वापरायचे असेल तर ती घट्ट बांधून घेतली पहिजे!



या पार्श्वभूमीवर आजच्या मराठी भाषेच्या वास्तवाचा अंदाज करणे शक्य होईल. केवळ मराठीच नव्हे तर सर्व भारतीय भाषांच्याही. मराठी भाषेच्या अधोगतीबद्दल गेली शंभर वर्षे लिहिले गेले आहे आणि या व्यासपीठावरूनही अनेक वेळा सांगितले गेले आहे. नव्हे, मराठी भाषेची अवनती व ऱ्हास यासंबंधीच्या विषयांची गर्दी या व्यासपीठावरून केलेल्या आजपर्यंतच्या पन्नास-साठ भाषणांमध्ये तरी दिसेल. त्यामुळे त्या बाबींसंबंधी अधिक विस्तार इथे करणे उचित ठरणार नाही. आश्चर्य वाटते ते एका गोष्टीचे की हजार वेळा या व्यासपीठावरून आणि इतरत्र तक्रारी होऊनही काहीच घडत नव्हते. म्हणजे मराठी भाषेचा मानबिंदू म्हणून आपण ज्याला गौरवितो त्या संमेलनातील चर्चा अरुण्यरुदनापेक्षाही वायफळ असे म्हणायचे की काय? काही घडत नव्हते याचे कारण मराठीची उपेक्षा नेमके कोण करतो त्याचा परवापर्यंत पत्ता लागत नव्हता आणि जो तो तक्रारखोर साहित्यिक वा मराठीप्रेमी फक्त सरकारकडे बोटे दाखवून स्वतः नामानिराळा राहात होता. तो पत्ता आता कळल्यासारखे वाटते. मराठीची उपेक्षा मराठी माणूसच करतो आहे. मराठी माणसाचे स्वभाषेविषयीचे प्रेम ढोंगी आहे, त्याची अस्मिता बेगडी आहे आणि भाषेविषयीचा अभिमान पोकळ आहे. हे असे होण्यामागे पुष्कळ ऐतिहासिक, समाजशास्त्रीय, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक कारणे असू शकतील. त्यांचा ऊहापोह येथे करता येणार नाही. या थोड्याशा धाडशी व नकारात्मक वाटू शकणाऱ्या विधानांचे स्पष्टीकरण पुढे येईलच. एक गोष्ट खरी की महाराष्ट्रातील खेडोपाडी, महानगरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये आणि कॉर्पोरेट कचेऱ्यांमध्ये, मंत्रालयातील खोल्यांमध्ये, गावोगावच्या एस.टी. थांब्यावर, बाजारांमध्ये, रस्तोरस्ती आणि गल्लोगल्ली, चहा-सरबताच्या टपऱ्यांवर होणारे 'अस्सल' मराठी भाषेतील संवाद ऐकले की या विधानाची खात्री पटून मराठी माणसाची मान शरमेने खाली जाईल. असो.

ही विधाने करूनही एक गोष्ट निःसंदिग्धपणे सांगितली पाहिजे. ती

अशी की आपल्या दहा कोटी लोकांची मायमराठी मरणपंथाला वगैरे निश्चितच लागलेली नाही. थोर इतिहासतज्ज्ञ वि. का. राजवाडे यांनी सत्तर वर्षांपूर्वी हा प्रश्न मोठ्या नाट्यमयरीतीने उपस्थित केला होता आणि त्यावेळी तो योग्यही होता. वेळोवेळी आपली प्रकृती नीट तपासून घेणे आवश्यकच असते. मधल्या काळात अनेक खळबळी झाल्या. डिजिटल तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती घडवून आणली. पण अजून मराठी भाषा चांगली चिवटपणे टिकून आहे हे मराठी भाषेचा, ग्रंथ व वाचन व्यवहाराचा, साहित्य व सांस्कृतिक व्यवहाराचा जो माहोल आधी वर्णन केला त्यावरून अगदी स्पष्ट होईल.

मग झाले आहे तरी काय ? :

मराठी मृत्युपंथाला लागलेली नसेल तर ठिकठिकाणच्या व्यासपीठांवरून, चर्चासत्रांमधून, संमेलनांमधून असा केविलवाणा आक्रोश का बरे सुरू आहे? ती आजारी पडलेली आहे काय? तसेही दिसत नाही. तिला क्षय झालेला नाही की एड्सची बाधाही नाही. मग झाले आहे तरी काय? मराठी भाषेचे अराजक माजल्यासारखे का वाटते?

आज मराठी भाषेवर प्रभाव टाकणाऱ्या कोणत्या अंतर्गत व बाह्य शक्ती आणि प्रक्रिया कार्यरत आहेत ते यासाठी तपासले पाहिजे.

- मराठी समाजाचा मूलभूत न्यूनगंड, व्यापार-उद्यम व संपत्ती साधनांविषयीची उदासीनता, अतिरेकी सहिष्णुता व फाजील आत्मविश्वास यांचे जालीम मिश्रण.
- उत्तरेतील हिंदी भाषकांचे गेल्या वीस-पंचवीस वर्षांत महाराष्ट्राच्या खेड्यांसह सर्व भागांत वेगाने होत असलेले स्थलांतर.
- जागतिकीकरणाची प्रक्रिया, वर उल्लेखिलेले डिजिटल तंत्रज्ञान, संगणकीय, संज्ञापन, महाजालातील चॅटिंग, दळणवळणाची साधने, चित्रवाणी, वाहिन्या यांमधील अफाट प्रगतीमुळे जगाचे जवळ येणे व परस्परावलंबन वाढणे.
- कल्पनातीत वेगाने होणारे जगाचे सांस्कृतिक सपाटीकरण; हुकूमशाहीतील लष्करी रेजिमेन्टेशनचा भास व्हावा असे. जेवणासाठी डायनिंग टेबलवर बसण्यापासून तो शौचासाठी कमोडवर बसण्यापर्यंत. भारतीय पुरुषांनी पोशाखाचे सपाटीकरण तर केव्हाच स्वीकारले. भाषांचे सपाटीकरण होण्याची ही नांदी आहे. दूरचित्रवाणी सांस्कृतिक सपाटीकरणाचा वेग अधिकच वाढविते.
- भाषारक्षणासाठी, अस्मितारक्षणासाठी एवढेच नव्हे तर घटनेने दिलेले भाषिक अधिकार बजावण्यासाठीदेखील शासकीय पातळीवर आणि मराठी भाषा अभ्यासकांमध्ये व साहित्यिकांमध्ये गांभीर्याचा, चिंतेचा, इच्छाशक्तीचा, जिद्दीचा आणि रचनात्मक धोरणांचा अभाव.
- तात्पर्य-मराठी माणसाचा स्वभाषेविषयीचा अभिमान पोकळ, प्रेम दांभिक आणि अस्मिता बेगडी.

हे सारे क्लेशदायक वाटत असेल तर वरील मानसिकतेचा परिणाम म्हणून सर्व महाराष्ट्रात भाषेच्या सामाजिक व्यवहाराचे दिसणारे चित्र वस्तुनिष्ठपणे तपासले तर धक्कादायक आहे :

सनातन न्यूनगंड :

१. मराठी मातृभाषा असलेले लोक आपल्याच महानगरांमध्ये व शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणी मराठी बोलायला कचरतात, आळस करतात किंवा न्यूनगंडामुळे टाळतात व मुक्तपणे हिंदी-इंग्रजीचा वापर करतात. बाजार, कॉर्पोरेट कचेऱ्या, शासकीय व केंद्र शासकीय कचेऱ्या, रेल्वे स्टेशने, विमानतळे, शहर बस, टॅक्सी-रिक्षातळे इत्यादी ठिकाणी जणू मराठीवर बंदी असल्याप्रमाणे मराठी लोक वागतात. अपरिचित माणसाशी हिंदी किंवा इंग्रजीमध्ये बोलण्याची मराठी माणसाची तत्काळ प्रवृत्ती असते. हे लोण गावागावांमध्येही पोचले असून हिंदी-इंग्रजी मिश्रित भाषा वापरण्याची प्रवृत्ती सर्वत्र वाढते आहे. सुशिक्षित मराठी माणसे आपापसातील संभाषणामध्ये तीस टक्क्यांच्यावर इंग्रजी शब्दांचा, प्रयोगांचा, विशेषणांचा व वाक्यांचा वापर करतात आणि त्यांचेच अनुकरण खेड्यापर्यंत होत जाते.

२. बहुभाषिक पंचतारांकित वर्तुळांमध्ये उच्चवर्गीय मराठी भाषकांना एकमेकांशी मराठीत बोलण्याची शरम वाटते. इतर भाषक तसे करीत नाहीत. हा सनातन न्यूनगंड.

३. राज्याचे मंत्री, अधिकारी, शेतकरी आणि इतर सर्वजण टीव्हीच्या मराठी वाहिनीवरदेखील बाईट द्यायचा असेल तरी दणकून हिंदी, इंग्रजीमध्ये बोलतात. मग हिंदी-इंग्रजी वाहिनी असेल तर विचारायलाच नको.

अनुक्रमणिका

इतर राज्यांतील मंत्री वाहिनी हिंदी असो की इंग्रजी, प्रेमाने आपापल्या भाषेतच बोलतात.

४. मुंबई, पुणे, नागपूरपासून तो अगदी कराड, सांगली, कोल्हापूरपर्यंत गेल्या वीस वर्षांत उत्तर प्रदेशातून पोटापाण्यासाठी येणाऱ्या हिंदी भाषकांचे लोंढे वाढले आहेत. ते हिंदीतून व्यवहार करतात, म्हणून आपले मराठीप्रेमी खेड्यातील बाजारांमध्येही त्यांच्याशी हिंदीतून बोलतात. अशी प्रक्रिया गेली शंभर वर्षे विदर्भात घडत गेल्याने तेथील सार्वजनिक भाषा हिंदीच झाली आहे. तीच प्रक्रिया आता अधिक वेगाने पश्चिम महाराष्ट्रात सुरू झाली आहे. पन्नास वर्षांपूर्वी केवळ कोकणात आणि पश्चिम महाराष्ट्रातच नव्हे तर विदर्भाच्या खेड्यातील मुसलमानदेखील वऱ्हाडी मराठीतच संवाद करायचे. आता ते उर्दूमिश्रित हिंदीत करू लागले आहेत. सांगली-कोल्हापूरला फक्त उत्तरप्रदेशी किंवा बिहारी सुतार, गवंडी, रंगवाले मिळतात अशी तक्रार तेथील लोक करू लागले आहेत. मराठी कोठे गेलेत कळत नाही. त्यांच्याशी हिंदीतच बोलावे लागते. मुंबईतील भाजीबाजार, मच्छीबाजार, पान-विडीची दुकाने-टपऱ्या प्रथम दाक्षिणात्यांनी आणि नंतर उत्तरप्रदेशीयांनी काबीज केल्या आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र छोट्या-मोठ्या गावी उत्तरेतील तरुण रिक्षाचालकांचे प्रमाण वाढते आहे. पुण्याच्या रिक्षावाल्याने जरी दरडावले की. 'मराठी समझता नही, हिंदी में बात करो' तर लगेच न भांडता मराठीप्रेमी पुणेकर समजूतदारपणे हिंदीत बोलतात. असे आपले मातृभाषेवरील प्रेम, असा अभिमान आणि अशी सहिष्णुता. महाराष्ट्रात येणाऱ्या परभाषिकांना मराठी शिकण्याची आवश्यकता वाटत नाही आणि मराठी लोकही त्यांनी मराठी शिकू नये अशीच वागणूक त्यांना देतात.

मराठी लँग्वेजला ह्युमिलियेट करण्याची कॉन्स्पिरसी...:

५. मराठी वर्तमानपत्रे आणि वाहिन्या जमेल तेथे इंग्रजी शब्दप्रयोग करतात. नेमके मराठी शब्द वापरण्याचा, नवीन शब्द तयार करण्याचा जातिवंत आळस. पण वीकेन्ड, पिकनिक, शॉर्ट-कट, ड्राय डे, एटिकेट, काँक्रिट अशा बहुतेकांना माहीत असलेल्या शब्दांना कसले प्रतिशब्द शोधणार? अधिक प्रभाव पडतो तो मराठी वाहिन्यांच्या मालिकांचा. त्यामधील पात्रांची वेशभूषा, त्यांची देहबोली, मराठीचे उच्चार आणि इंग्रजी शब्दांचा आणि वाक्यांचा सर्रास वापर याचा परिणाम खेड्यापाड्यांमधील लोकांवरही होतो. ग्रामीण कॉलेजांमध्ये आजकाल 'शिट्', 'वॉव' असले प्रयोग ऐकू येतात. मुंबई-पुण्याची मुले असे शब्दप्रयोग करतात तर आमच्या ग्रामीण तरुणांनी का करू नये? या प्रक्रियेत कित्येक वैशिष्ट्यपूर्ण मराठी शब्द आपण कसे गमावू लागलो आहोत याची ढीगभर उदाहरणे देता येतील. शहरी भागातील मुले मावशी, मामी, काकू, आत्याऐवजी आँटी हे एकच संबोधन सोयीने वापरू लागली आणि काका, बाबा, तात्या, मामा, अप्पा, दादाऐवजी अंकल. रेल्वेस्टेशन बस-थांबे आणि मुंबई-पुण्यासारख्या रस्त्यांवर वस्तू विकणारी किंवा भीक मागणारी लहान मुले सर्रास 'ऑन्टी-अंकल' असे प्रयोग करतात.

मराठीप्रेमी सहृदय मित्राने एकदा चिडून फोन केला. 'अरे, मराठी पेपर्स वाचलेत का आजचे? किती इंग्लिश शब्द. यांना काय सबस्टिट्यूट मराठी शब्द सापडत नाहीत? मला तर हा प्लॅनच वाटतो. अगदी कॉन्स्पिरसी करून मराठी भाषेला ह्युमिलियेट करण्याचा...' या निवेदनात शब्दाचीही अतिशयोक्ती नाही. आपण मराठीत बोलतांना इंग्रजी प्रयोग करतो आहोत हे लक्षातही येत नाही एवढी ती सवय मुरून गेली असते.

६. आधुनिक शेती, खते, रसायने, बी-बियाणे, विजेचे पंप, ट्रॅक्टरसारखी वाहने व इतर शेतीची आधुनिक अवजारे, त्यांच्या वाहिन्यांवरील जाहिराती, सहकारी साखर कारखाने व शेतमालावरील इतर प्रक्रिया उद्योग, शहरांशी वाढता संपर्क, टेलिफोन, टीव्ही, मोबाईल, संगणक इत्यादी गोष्टींमुळे खेड्यापाड्यातही बोलताना इंग्रजी-हिंदी शब्दांचे प्रयोग करण्याचा सोस वाढतो आहे.

७. शिक्षण, शासन व्यवहार, न्यायालये. केंद्र शासकीय कचेऱ्या, रस्त्यांवरील दुकानांच्या, कचेऱ्यांच्या पाट्या या बाबतीत घटनात्मक, कायदेशीर तरतुदी असूनही महाराष्ट्र शासन कधीच खंबीर राहिले नाही. धोरण नेहमीच बोटचेपे व वेळकाढू राहिले. मुंबई-पुण्याच्या मराठी शाळा आणि मराठी माध्यमाचे वर्ग ओस पडू लागले असून मराठी शिक्षकांना घरी बसविले जात आहे. महाराष्ट्रात इतरत्रही हे लोण पोचायला आता वेळ लागणार नाही.

इतर राज्यांमध्ये याच्या उलटी परिस्थिती आहे.

आता एकीकडे प्राथमिक शाळेपासून इंग्रजीचे धडे द्यायचे आणि सर्व प्रकारच्या माध्यमिक शाळांना मराठी अनिवार्य करायचे असे दुहेरी धोरण. मराठीला राज्यभाषेचा दर्जा दिल्यावर महाराष्ट्राच्या शासन व्यवहारात सर्व स्तरांवर मराठी व्यवहार होणे आवश्यक होते व घटनेलाही ते मंजूर होते. पण या बाबतीतील परिस्थिती पूर्णपणे असमाधानकारक आहे. प्रशासनाशी वारंवार संपर्क येणाऱ्या लक्षावधी लोकांना हे रोज अनुभवाला येते. राज्याच्या शासनाचा किती टक्के कारभार मराठीत चालतो वगैरे सरकारी आकडेवारी देण्यात अर्थ नाही कारण काहींच्या बाबींमध्ये तो चालत नाही हे सर्वांना माहीत आहे.

घोडे कुठे पेंड खाते ? :

मराठी लोकांना आपल्या भाषेच्या राज्यासाठी झगडावे लागले हे खरे असले तरी १९६० साली भाषिक महाराष्ट्र निर्माण झाल्यावरही राज्यघटनेने प्रादेशिक भाषांना ज्या सुविधा उपलब्ध करून दिल्या त्या मराठी राज्याने अजूनही आपल्या पदरात पाडून घेतल्या नाहीत की घटनादत्त अधिकारांची अंमलबजावणी केली नाही हे सर्वश्रुत आहे. याला बेफिकिरी म्हणावे की करंटेपणा. विशेष हे की बाकी बहुतेक सर्व राज्यांनी आपापला राज्यभाषांना या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि अधिकारांची अंमलबजावणीही केली आहे. नुसती कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खंबीरपणा दाखविला असता आणि कलावंत-साहित्यिकांनी जन-आंदोलनांचा दबाव टाकला असता तर भाषेसाठी पुष्कळ काही साध्य झाले असते. पण इथेही मराठी माणसाची, कलावंतांची आणि राज्यकर्त्यांची उदासीनता घात करणारी ठरली.

न्यायालयांमध्ये मराठी भाषा रुजविण्याचे काम करणाऱ्यांमध्ये मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था अग्रगण्य आहे. घटनेप्रमाणे जिल्हास्तरावरील न्यायालयांमध्ये प्रादेशिक भाषेचा वापर वैध ठरविला आहे. पण या तरतुदीचा उपयोग करून तशी अधिकृत अधिसूचना काढण्यास महाराष्ट्र शासनाला फौजदारी न्यायालयासाठी १९९८ ची वाट पाहावी लागली आणि दिवाणी कामकाजासाठी २००० सालाची. घटनेतील तरतुदीनुसारच राज्याच्या उच्च न्यायालयांमध्ये त्या राज्याची प्रादेशिक भाषा प्राधिकृत भाषा म्हणून वापरता येते व तशी अधिसूचना काढण्याचा राज्य शासनाला अधिकार आहे. बहुतेक इतर राज्यांनी केव्हाच ही सोय करवून घेतली आहे. महाराष्ट्राचे घोडे मात्र अजून पेंड खात आहे. महाराष्ट्र शासनाचा प्रस्ताव सहीसाठी चार-पाच वर्षे राज्यपालांकडे पडून होता. मंत्र्यांना, आमदारांना वेळ नाही, फिकीर नाही आणि इच्छाशक्तीही नाही. साहित्यिकांना या विषयात रस नाही. पक्षकारांना 'फर्डा' इंग्रजी बोलणारा वकील हवा असतो. कधी कधी जिल्हा किंवा तालुकास्तरावरील न्यायालयात इंग्रजी भाषेत चालणारी केस हे म्हटले तर अत्यंत विनोदी, म्हटले तर करुणाजनक दृश्य असते. मुंबई हायकोर्टासमोर मराठीतील एक पृष्ठ इंग्रजीत भाषांतरीत करून द्यायला ३०० रुपये घेतात. अशील मुकाट्याने देतात. वकिलांचे काय जाते ?

८. महाराष्ट्रातील सर्व तऱ्हेच्या बाजारांची भाषा हिंदी होत चालली आहे तर कॉर्पोरेट भाषा इंग्रजी आहे. मुंबई-पुणे-नागपूरच्या उच्च सांस्कृतिक वर्तुळातील भाषा इंग्रजी आहे. शेअर बाजार, कापड बाजार, हिरे बाजार वगैरे ठिकाणी गुजराती. कोणत्याच व्यापाऱ्यावर मराठी भाषेचे प्रभुत्व नाही.

९. शिखरस्थाने आणि संपन्न करिअर क्षेत्रे इंग्रजी-शिक्षित शहरी मध्यमवर्गाने बळकाविली असून त्यामुळे मराठी माध्यमाच्या ग्रामीण तरुणांची प्रगतीची बंद झालेली दारे उघडायची असतील तर ग्रामीण मुलांनी इंग्रजीचाच आश्रय घेतला पाहिजे. प्रगतीसाठी यापुढे मराठी उपयोगी नाही आणि मराठीला भविष्य नाही अशी तीव्र भावना जी मध्यम व उच्चवर्गीयांमध्ये होती ती आता सर्वच मराठी समाजात वाढू लागली आहे.

१०. ज्ञानभाषा मराठी? आता ते शक्य नाही. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, प्रबंधनशास्त्र इत्यादी अनेक शास्त्रे अनेकांगांनी व प्रचंड वेगाने विकसित होत असून त्याच वेगाने त्यांच्या परिभाषा वाढत आहेत. मराठी भाषेत परिभाषा निर्माण करण्याची जिद्द संपली आहे.

या विस्तृत पार्श्वभूमीवर मराठी भाषेच्या भवितव्यासंबंधी महाराष्ट्रातील विविध गटांचे अंदाज व मते काय आहेत हे प्रथम पाहिले पाहिजे.

१. मराठी भाषा चिरकाल टिकणारी असून लवकरच ती इंग्रजी भाषेच्या मांडीला मांडी लावून बसेल.

२. ती ऱ्हास पावत असून शे-दीडशे वर्षांत मृतप्राय होईल किंवा लोकांची बोलीभाषा म्हणून उरेल.

३. ती चिरकाल टिकणारी किंवा मृतप्राय अथवा

अनुक्रमणिका

लयास जात नसून सकारात्मक दिशेने बदलत आहे.

मराठी भाषेच्या कुंडलीवरून तिचे भविष्य वर्तविण्याआधी ज्ञानभाषा म्हणून मराठीची परिस्थिती आज काय आहे ते पाहिले म्हणजे बाकीच्या गोष्टी विचार करायला सुलभ होतील.

मराठी ज्ञानभाषा? :

मराठी विश्वकोशाच्या १६ खंडांची पाने चाळली असता त्यात गणित आणि इतर बहुतेक शास्त्रांचे मराठीतून विवेचन केले असून त्यासाठी खास मराठी परिभाषा वापरली आहे असे दिसते. पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैज्ञानिक व तांत्रिक विषयांची ओळख करून देताना कशी परिभाषा वापरली ते सांगून ज्ञानविज्ञानाच्या काटेकोर प्रतिपादनासाठी योग्य असणारी परिभाषा मराठीत पूर्णतः तयार नाही हे त्यांनी नमूद केले आहे. १४ मे १९७५ रोजी लिहिलेल्या या प्रस्तावनेत ते म्हणतात की, कोशरचनेची मुख्य समस्या परिभाषेची असते. विश्वकोश मंडळाने परिभाषेची निर्मिती आणि प्रयोग एकाच वेळी केला. महाराष्ट्र शासन व्यवहार कोश, पुणे विद्यापीठाचे परिभाषाविषयक कार्य, केंद्रीय शासनाचे अनेक परिभाषा संग्रह, डॉ. रघुवीर यांचा इंग्रजी-हिंदी शब्दकोश इत्यादी कोशांचे मंडळाने साहाय्य घेऊन आधी एक परिभाषा संग्रह तयार करून तो प्रसिद्ध केला. ज्ञान-विज्ञानाच्या पारिभाषिक संज्ञा मराठीत आणताना त्या संज्ञांची अखिल भारतीय स्तरावरील उपयुक्तता जशी ध्यानात घेतली तद्वतच मराठीची प्रकृती आणि मराठीतील रूढ संज्ञा यांचाही विचार करून पारिभाषिक शब्द निश्चित केले. विज्ञान शाखेतील संकल्पनांसाठी नवीन पारिभाषिक शब्द तयार केले असले तरी विशिष्ट पदार्थवाचक शब्द आंतरराष्ट्रीय वा इंग्रजीच ठेवले. उदा. ऑक्सिजन, हायड्रोजन, कार्ब्युरिटर इत्यादी. मराठीने आत्मसात केलेले इंग्रजी शब्द तसेच ठेवले. उदा. स्क्रू, एंजिन, नट, बोल्ट इत्यादी.

प्रस्तावनेतील शास्त्रीबोवांचे एक महत्त्वाचे वाक्य नमूद करण्यासारखे आहे. ते म्हणतात, ''कोणतीही परिभाषा वापरून रूढ होत असते. नुसत्या कोशगत परिभाषेस काहीच अर्थ नसतो.''

परिभाषा संग्रह व विश्वकोशाचा पहिला खंड प्रसिद्ध होऊन आता तीस वर्षे उलटून गेली आहेत. या कोशातून व संग्रहातून दिसून येईल की ज्ञान-तंत्रज्ञान शाखांमधील अनेक विषय तर पदवी स्तरापर्यंत शिकविता येतील अशी परिभाषा आज मराठी भाषेत उपलब्ध आहे. नागपूर विद्यापीठात गणित हा विषय एम. ए. पर्यंत मराठी माध्यमात घेण्याची सोय होती हेही या वेळी स्मरते.

परिभाषेची आपणच टवाळी केली :

यातून आता काही प्रश्न उद्‌भवतात. ही प्रयत्नपूर्वक परिभाषा गेल्या तीस वर्षांत रूढ करण्याचा महाराष्ट्र शासनाने, माध्यमिक शिक्षण मंडळाने, पाठ्यपुस्तक मंडळाने, महाराष्ट्रातील विद्यापीठांनी - विशेषतः खासकरून मराठीच्या संवर्धनासाठी म्हणून स्थापन झालेल्या पुणे विद्यापीठाने, मराठीप्रेमी विद्वानांनी आणि साहित्यिकांनी काही प्रयत्न केले आहेत काय? सर्वसाधारण उत्तर नकारार्थीच येईल. संग्रहातील परिभाषा फक्त कोशातच राहिली आहे. मराठीला ज्ञानभाषा बनविण्याची क्षमता निश्चितच या परिभाषेत आहे. पण या क्षमतेचा उपयोग करण्याची जिद्द महाराष्ट्राने दाखविली नाही. उलट महाराष्ट्र शासनाने जेव्हा आपला पहिला शासन व्यवहार कोश प्रसिद्ध केला तेव्हा मराठीतील बड्या साहित्यिकांनी, लोकप्रिय पत्रकारांनी आणि विद्वानांनी त्यातील शब्दांची यथेच्छ टिंगल करीत अभ्यासकांची दिशाभूल केली. जी मुले या परिभाषेच्या आधारे मराठीतून विज्ञान शिकू शकली असती त्यांच्या आयुष्यभराच्या किंवा महाराष्ट्राच्या एक-दोन पिढ्यांच्या नुकसानीसाठी मग कोणास जबाबदार धरावे?


विश्वकोशासाठी पारिभाषिक शब्द निश्चित करताना अखिल भारतीय स्तरावरील उपयुक्ततेचा विचार केला गेला. भारतातील इतर भाषकांनी काय केले? समजा महाराष्ट्राने प्रयत्नपूर्वक ती परिभाषा पदवीस्तरापर्यंत राबविली असती तर भारतीय स्पर्धा-परीक्षांमध्ये त्यांचे नुकसान झाले असते काय? मायभाषेतून शिकल्यामुळे कदाचित त्यांची आकलनशक्ती अधिक वाढली असती. अखिल भारतीय स्तरावर देशातील सर्व भाषांमधील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या परिभाषा एकत्र करण्याचा प्रयत्न झाला आहे काय? अशी परिभाषा भारतात तयार झाली असती तर पुष्कळ गोष्टी सुलभ झाल्या असत्या.

शाळा-कॉलेजात विज्ञान-तंत्रज्ञान विषय इंग्रजी माध्यमातून शिकविण्याचा सोस १९६० पासून म्हणजे

मराठी भाषेचे स्वतंत्र राज्य झाल्यापासून निर्माण झाला. तेव्हापासूनच मराठी परिभाषा वापरण्याच्या विकल्पाचा पाठपुरावा केला गेला नाही. इंग्रजी माध्यमाला व परिभाषेला प्राधान्य दिले गेल्याने मराठी परिभाषा कोशातच पडून राहिली व त्यामुळे मराठीही खुरटली. ज्यांना इंग्रजीची सोय नव्हती अशा बहुसंख्य मुलांना विज्ञान-तंत्रज्ञानाचे दरवाजे बंद झाले.

आणि समजा माध्यमिक शाळेत मराठीचा विकल्प उपलब्ध असला (अजून बऱ्याच शाळांमध्ये आहे) तरी आपल्या मुलाला किंवा मुलीला इंजिनीअर, डॉक्टर, बडा मॅनेजर करण्याचा चंग बांधलेले कोणते आईवडील पाल्याला मराठी माध्यमातून विज्ञान शिकविण्याचा उपद्व्याप करतील?

तात्पर्य असे की मराठी मुळातच प्रगल्भ व समृद्ध भाषा आहे आणि तिला योग्य परिभाषेची जोड दिल्यास आधुनिक ज्ञानभाषा बनण्याची तिच्यात क्षमता आहे. पण समृद्धीचा, प्रगतीचा आणि जगसंचाराचा पासपोर्ट देणाऱ्या इंग्रजीचा विकल्प उपलब्ध असताना मराठीकडे कोण पाहतो? भारतातील इतर भाषकांचीही हीच मनोवस्था असावी. इंग्रजी माध्यमाच्या न्यूनतेमुळे जे गट, विशेषतः ग्रामीण भागातील गट उच्च विज्ञान व तंत्रज्ञान शिक्षणाला मुकले व मागासलेले राहिले ते आता त्यांच्या स्मार्ट शहरी बांधवांशी स्पर्धा करण्याच्या ईर्षेने इंग्रजी माध्यमात उत्साहाने शिरू लागले आहेत. ग्रामीण भागातही प्राथमिक शाळेपासून इंग्रजी शिकविण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय या आकांक्षेशी सुसंगत असा आहे. शहरी लोकांनी नाके मुरडण्याआधी त्यांच्या जागी स्वतःला कल्पून बघितले तरी थोडी समज वाढेल. मराठी भाषेचा ऱ्हास होत आहे असा आक्रोश शहरी मध्यमवर्गाने करायचा आणि आपली मुले गुपचूप इंग्रजी माध्यमात पाठवायची; मराठीचे संरक्षण-पोषण करण्याची जबाबदारी मात्र खेड्यातल्या शेतकऱ्यांची, हा दुटप्पीपणा चालणार नाही. फक्त भीती अशी वाटते की शासनाचा हा निर्णय यथायोग्य रीतीने व निश्चयेकरून अंमलात आणण्याची राजकीय इच्छाशक्ती व खंबीरपणा आपल्या सत्ताधारी पुढाऱ्यांमध्येही नाही आणि अधिकाऱ्यांमध्ये ती तळमळही नाही. शिक्षकांच्या बाबतीत तर आनंदी आनंद आहे. खेड्यापाड्यातील शाळांमधील मुलांना उत्तम इंग्रजी शिकविण्यासाठी चांगल्या प्रशिक्षित शिक्षकांची फौज निर्माण करावी लागेल. तसे झाले तरच ती मुले समृद्ध इंग्रजी शाळांमधून शिकणाऱ्या स्मार्ट शहरी मुलांशी स्पर्धा करू शकतील. इकडे मात्र इंग्रजी शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे थातुरमातुर प्रयत्न होताना दिसतात. सरकारला खरी आंच असल्यासारखे दिसत नाही. अशा अर्धवटपणामुळे मातृभाषा धड येत नाही आणि इंग्रजीही येत नाही अशी पिढी तयार करण्याचे पाप सरकारच्या माथी लागेल. पण सध्या तरी समाज संतुलन साधण्याच्या व्यापक हेतूसाठी हा निर्णय तत्त्वतः योग्यच म्हणायला हवा.



त्याचा एक परिणाम सोसायला हवा. मराठीला ज्ञानभाषा बनविण्याची संधी आता कायमची हातून निसटली आहे. परिभाषा परिश्रमाने तयार करूनही ती रूढ केली नाही तो अपराध तत्कालीन साहित्यिकांचा आणि मराठी अभिजनांचाच आहे, हे कबूल करायला हवे. हिंदी भाषा अजूनही ती संधी घेऊ शकते. इतर भारतीय भाषांची अवस्था मात्र या बाबतीत मराठीसारखीच आहे.

लोकहो, मराठीत बोला... :

आजच्या क्षणी मराठी भाषेच्या भवितव्याची रेषा कोणत्या दिशेने जाते आहे, त्याचे निदान असे करता येईल.

- आठशे वर्षांचे समृद्ध काव्य व साहित्य लाभलेली, नऊ कोटी लोकांची प्रगल्भ व सुंदर मराठी भाषा सहजासहजी नाहीशी होणे शक्य नाही.

- लवचीकता व प्रवाहीपणा ही लक्षणे तिने आत्मसात केली असल्याने संक्रमण काळातील आव्हाने

स्वीकारण्यासाठी ती सक्षम आहे. त्यामुळे ती बदलते आहे, पुष्कळ भाषांमधून वेगवेगळे नवे शब्द व संकल्पना आत्मसात करीत ती अधिक समृद्ध होत आहे आणि जागतिक संवादाच्या उत्क्रांत होणाऱ्या भाषेच्या ती अधिकाधिक जवळ जात राहील.

- पुढील एक-दीड शतकात मराठी समाज आज असा बहुभाषिक आहे तसाच राहील. मात्र त्यात गुणात्मक फरक असेल. टिळकांच्या 'केसरी'मधील १९०७ मधील अग्रलेखांची व बातम्यांची मराठी भाषा व आजच्या लोकसत्तामधील भाषा यात जो फरक पडला आहे त्याच्या कित्येक पटीचा फरक २१०७ मध्ये पडलेला दिसेल.

- ज्ञानभाषा म्हणून मराठी विकसित करण्याची संधी आपण गमावल्याने पुढच्या काळात मराठी समाज इंग्रजीचा किंवा नव्या जागतिक भाषेचा आधार ज्ञानभाषा म्हणून घेईल. नव्या पिढ्या आधुनिक स्वरूपातील इंग्रजी अथवा ही नवी जागतिक भाषा यांचा लेखन-वाचनासाठी अधिकाधिक उपयोग करू लागतील. अशा परिस्थितीत आपली मायमराठी लवकरच जागतिक मंचावर इंग्रजीच्या मांडीला मांडी लावून बसणार आहे अशी खोटी स्वप्ने नव्या पिढीला दाखविणे म्हणजे तिची फसवणूक होय.


- चित्रवाणीच्या वाहिन्यांवरील हिंदी-इंग्रजी मिश्रित बिनधास्त मराठी, मराठी वृत्तपत्रांमधील हिंदी-इंग्रजीची मुक्त सरमिसळ, रस्त्यावरील टपोरी मराठी आणि तिचा मोठा प्रभाव असलेली बंबईया हिंदी, दुकानांमधील इंग्रजी आणि ग्रामीण भागातील आधुनिक शेती, आधुनिक अवजारे, टेलिफोन-मोबाईल, एसटीमुळे शहरांशी होणारा घनिष्ठ संपर्क या सर्वांमुळे एकूणच संभाषणातील मराठी भाषेचा बाज वेगाने बदलत असून येत्या अर्धा-पाऊण शतकात तिचा चेहरामोहरा बदललेला आढळून येईल. रस्त्यावरील मराठी आणि साहित्यातील मराठी यात खूप फरक पडलेला असेल. प्रमाण मराठीचा वाचक वर्ग आकुंचन पावू लागेल व त्यामुळे हळूहळू साहित्यदेखील रस्त्यावरील मराठीचा प्रयोग करू लागेल. युरोपीय भाषांप्रमाणे बदललेल्या मराठी भाषेतही लेखन-वाचन थोड्या प्रमाणावर चालूच असेल. मात्र लीळाचरित्र अथवा ज्ञानेश्वरी यांमधील मराठी समजण्यास आज जसे अवघड वाटते तसेच हरी नारायण आपटे किंवा नामदेव ढसाळ यांच्या साहित्याचे येत्या शंभर वर्षांत होईल. ज्ञानेश्वरांपासून तो ढसाळांपर्यंतचे उत्तमोत्तम मराठी साहित्य-संचित या बदललेल्या भाषेत त्यापुढील पिढीसाठी कसे न्यायचे हा प्रश्न आपल्या व पुढच्या पिढ्यांना सोडवावा लागेल.

मराठी भाषेची लवचीकता आणि प्रवाहीपणा यांना उत्तेजन देऊन नवनवी शब्दसंपदा आत्मसात करीत असताना मराठीचा आत्मा गमवायचा नसेल तर एक साधी गोष्ट मात्र करावी लागेल. आपला आळस व न्यूनगंड सोडून, ज्ञानेश्वर-तुकारामांचे स्मरण करीत थोडीशी हिंमत धरून महाराष्ट्रात सार्वजनिक ठिकाणी जिद्दीने शक्य तेथे मराठीत बोलायला. आपल्याच राज्यात आपलीच भाषा बोलायचे कसला आला आहे संकोच किंवा शरम? त्यात कोणता संकुचितपणा किंवा भाषिक राष्ट्रवाद? इतरांवर मराठी बोलण्याचा आग्रह करण्याचा प्रश्न नाही. अनाक्रमक पद्धतीने, शांतपणे, सौजन्याने मराठीत बोलत राहायचे. जेथे अशक्य आहे तेथे आणि फक्त तेथेच संभाषणात हिंदी-इंग्रजीचा तेवढ्यापुरता प्रयोग करायचा. हे मराठी समाजाला जमले तर आणखी काही शतके तरी मराठीला मरण नाही.

तेव्हा या व्यासपीठावरून मराठीप्रेमी लोकांना एकच आवाहन करता येण्यासारखे आहे. लोकहो, महाराष्ट्रात सार्वजनिक ठिकाणी मराठीत बोला.

•••

अनुक्रमणिका



। भाषणे

अध्यक्षीय भाषण

उत्तम रूद्रवार

शब्द पुस्तकात असतो. अर्थ जीवनात शोधावा लागतो. या संदर्भातील एक उद्‌बोधक कथा मला सांगावीशी वाटते. मराठीच्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना 'पुष्पांच्या सहवासात' हा काव्यमय विषय निबंधलेखनासाठी दिला. त्यांना वाटले विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला यात खूप वाव आहे. वेगवेगळ्या ऋतूंत उमलणारी विविध पुष्पे, त्यांचे रूप, त्यांचा गंध, त्यांचा आकार. पण एका विद्यार्थ्याने लिहिलेला निबंध वाचून ते अवाक् झाले. त्याने 'पुष्पाच्या सहवासात' या विषयावर निबंध लिहिला. पुष्पा नावाच्या बालमैत्रिणीवरचा त्याचा निबंध वाचून त्यांना हसू आले. पत्नीला त्यांनी निबंध वाचून दाखविला. पत्नी म्हणाली, सर तुमच्या विद्यार्थ्याला अनुस्वाराचा अर्थ कळला नाही आणि तुम्हाला तरी कोठे कळला जीवनाचा अर्थ. काव्यमय विषय विद्यार्थ्याला सांगितला, कवितेचे अध्यापनही समरसून करता पण पत्नीसाठी कधी जाईची-शेवंतीची वेणी आणायची आठवण तुम्हाला होत नाही. काव्य जगता आले पाहिजे.

भाषा केवळ संवादाचे माध्यम नसते तर ते कल्पनाशक्तीचे, विचारशक्तीचे, विकासाचे साधन आहे. भाषेच्या दारातून संस्कृतीच्या दालनात माणूस प्रवेश करतो. भाषा हे माणसाला एकत्र आणणारे प्रभावी व परिणामकारक साधन आहे. विज्ञान हे सोय-सुविधा निर्माण करते. भाषा माणासाची जडणघडण करते. आजच्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या काळात माहिती तंतज्ञान, संगणक विज्ञान आणि परमाणू विद्युत हे परवलीचे शब्द बनले आहेत. माहितीचा विस्फोट झाला आहे. संगणकाच्या या महाजालाने सगळ्यांनाच वेड लावले आहे. आपले नाव, आपल्या संस्था, व्यापारी प्रतिष्ठाने हे संकेत स्थळावर येण्यासाठी सगळ्यांचीच धडपड सुरू आहे. 'इंग्रजी' हीच ज्ञानभाषा या उक्तीवर आम्ही शिक्कामोर्तब करून इंग्रजी भाषेचे महत्त्व जणू अधोरेखित करून टाकले आहे. इंग्रजीशिवाय पर्याय नाही अशी आपली जी धारणा झाली आहे त्याबाबत अंतर्मुख होऊन एकदा विचार करण्याची गरज आहे. इंग्रजी भाषेबद्दलच्या आकसापोटी मी हे बोलत आहे, असा गैरसमज कृपा करून घेऊ नका. आकस नाही, द्वेष तर मुळीच नाही. आम्ही इंग्रजीच नाही तर फ्रेंच, जर्मन, लॅटीन इ. विदेशी भाषांचाही अभ्यास करून भाषा-कोविद झाले पाहिजे. मात्र मराठीचा बळी देऊन नाही. जपान, जर्मनी, फ्रान्स या प्रगत देशांत त्यांचीच भाषा चालते. आपल्या देशात विशेषतः दक्षिण भारतात तेलगू, कानडी, तामिळ आणि मल्याळम् या दाक्षिणात्य भाषांबाबत ते प्रांत आग्रही आहेत. इंग्रजी शिकण्याला आमचा विरोध नाही. विरोध इंग्रजीतून शिकण्याला आहे. वास्तविक मातृभाषा हेच सर्वोत्कृष्ट माध्यम आहे. ज्यांची जयंती आम्ही मराठी भाषादिन म्हणून दरवर्षी २७ फेब्रुवारीला साजरी करतो ते मराठी कवितेचे शैलशिखर असलेले कुसुमाग्रज या संदर्भात म्हणतात, ''कोणत्याही समाजातील प्रतिभा त्या समाजाच्या मायभाषेतच

फुलू शकतात. वरून लादलेल्या भाषेत- मग ती कितीही प्रगत असो, बाजारी व्यवहार होऊ शकतील, राजकीय कामकाजही होऊ शकेल, पण समाजाची अस्मिता वा अंतरंग प्रकट करणारं साहित्य परस्थ वा दूरस्थ भाषेत कधी उगवत नाही, वा विकसत नाही.'' यातील मर्म आम्ही जाणले पाहिजे. भाषेच्या दाराने मूल सुसंस्कृत माणसांच्या जगात प्रवेश करते. मायमराठीची ही खिडकी-कवाडच जर आम्ही बंद करून टाकले तर सगळे भावजीवनच उद्ध्वस्त होईल. ते रूक्ष, गद्य नीरस होईल. अस्मिताच आपण गमावून बसू. देवदत्त प्रतिभा लाभलेले आमचे सुरेश भट म्हणाले होते, ''खातो मी साय मराठीच्या दुधावरची, आम्ही कोणाचा उंबरा झिजवू कशाला?''

परमकारुणिक भगवान गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान पाली या लोकभाषेत, भगवान वर्धमान महावीरांनी जैन धर्माचे तत्त्वज्ञान अर्धमागधीत, म. बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत पंथाचे तत्त्वज्ञान कानडीत, म. चक्रधरांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान मराठीत, ज्ञानोबा ते तुकोबा या संत मालिकेतील संतांनी भागवत धर्माचे तत्त्वज्ञान मराठीत म्हणजे लोकभाषेत मांडून लोकभाषा ही ज्ञानभाषा व्हावी यासाठी सगळा आटापिटा केला. यादवकाळात संस्कृत ही ज्ञानभाषा तर मराठी ही लोकभाषा, यावनी सत्तेच्या काळात अरबी-फारसी ही ज्ञानभाषा तर मराठी ही लोकभाषा आणि देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे व संयुक्त महाराष्ट्र निर्माण होऊन ५७ वर्षे झाल्यानंतरही जर इंग्रजी हीच ज्ञानभाषा राहणार असेल तर मराठीचे पांग आम्ही कसे फेडू? अन् तिच्या आरतीला सूर्य-चंद्र कसे आणू? आधुनिक कवी वाल्मीकी ग. दि. माडगूळकर म्हणाले होते, एकीकडे राजभाषेचा मुकुट मराठीच्या शिरावर अन् अंगावर मात्र लक्तराचा साज राहणार असेल, अजूनही ती वळचणीला उभी राहणार असेल तर काय उपयोग?


सुप्रसिद्ध विचारवंत फादर दिब्रिटोचे याबाबतचे विचार अतिशय मननीय आहेत: ''एखादी भाषा अवगत करण्यासाठी बालवर्गापासून सर्व विषयांचे माध्यम इंग्रजी करणे आत्मघाताचा प्रकार आहे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण न घेतलेल्या आमच्या बहुतेक महापुरुषांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व संपादन केले होते. हे आम्ही विसरता कामा नये.''

मराठी बोलण्याबाबतची मनात असलेली न्यूनगंडाची भावना आम्हाला अगोदर झुरळासारखी झटकून टाकावी लागेल. मुंबई-पुणे-नागपूर-नाशिक-औरंगाबाद इ. महानगरांतील मुले एकतर मराठीत बोलत नाहीत. बोलली तर संमिश्र मराठीत बोलतात. दूरदर्शन आणि चित्रपटातून आलेले सांस्कृतिक आक्रमण आम्ही थोपवू शकत नाही. निदान घरात आम्ही त्यांच्याशी शुद्ध-सुंदर मराठीत बोलले पाहिजे. देवघर, दिवाणखाना, माजघर, स्वयंपाकघर या ठिकाणी जिव्हाळ्याने बोलल्या जाणाऱ्या बोलीशी अतूट नाते असलेली घरगुती मराठी, त्या मुलांमध्ये आत्मविश्वास जागा करेल. त्यांच्या मनात मराठीबद्दलची गोडी निर्माण होईल. ते जे इंग्रजाळलेली मराठी बोलतात त्याला प्रतिबंध बसेल आणि मुख्य म्हणजे मायमराठीच्या अमृततुल्य दुधावर पोसला जाणारा त्यांचा पिंड आपोआपच संस्कृतीचा आधारस्तंभ बनेल. एक विचारवंत एकदा म्हणाला होता, ''ज्या देशातील माणसे त्या देशात निर्माण झालेले अन्न सेवन करीत नाहीत, तो देश भुकेबंगाल असतो. ज्या देशातील माणसे त्या देशात निर्माण झालेले कापड परिधान करीत नाहीत. तो देश विवस्त्र असतो आणि ज्या देशातील माणसे त्या देशातील भाषांमध्ये आपले भाषिक व्यवहार करीत नाहीत त्या देशाला अस्मिता नसते आणि अस्मिता गमावून जर काही मिळत असेल तर त्याला काही अर्थ नाही.'' कधी न आटणारा स्वाभिमानाचा जिवंत झरा प्रज्ञाचक्षू डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दुःख-दारिद्र्यात व अज्ञानात खितपत पडलेल्या आपल्या समाजबांधवांना दिला आणि अस्मिता घेऊनच भूतकाळाच्या डोक्यावर पाय ठेवून, भविष्याचा वेध घेत, समर्थ वर्तमान ते आज जगत आहेत हे आम्ही ध्यानात घेतले पाहिजे.

'राष्ट्र उभारणीत भाषा व संस्कृती यांची भूमिका' या विषयावर मुंबई विद्यापीठाचा भाषा विभाग व अकॅडमी ऑफ पॉलिटिकल अॅण्ड सोशल स्टडी, पुणे यांनी तीन दिवसांचे चर्चासत्र काही वर्षांपूर्वी आयोजित केले होते. त्यात सादर केल्या गेलेल्या एका निबंधातील काही भाग या संमेलनाच्या निमित्ताने मी उद्धृत करतो.

''जुना मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात शहरांमध्ये राहणारा व उच्चवर्णीयांमधून निर्माण झालेला होता. नवा मध्यमवर्ग केवळ शहरांपुरता मर्यादित राहिलेला नाही. त्याचे अस्तित्व ग्रामीण भागातही जाणवते. हा मध्यमवर्ग केवळ उच्चवर्णीयांपुरता मर्यादित राहिलेला आहे, असेही म्हणता येणार नाही. याचा व्याप बहुतेक

जातींमध्ये विस्तारलेला आहे. महाराष्ट्रात सर्वदूर पोचलेला, अठरापगड जातींतून निर्माण झालेला व सांस्कृतिक व्यवहाराच्या केंद्रस्थानी आलेला हा नवा मध्यमवर्ग मराठी साहित्यातील जाणिवेचे भरणपोषण आजघडीला करतो आहे.'' हा त्या लेखकाने काढलेला निष्कर्ष यथायोग्यच आहे. मराठीच्या भवितव्याबाबत पडलेल्या प्रश्नचिन्हाचे उत्तर ह्या नव्या मध्यमवर्गाने देऊन टाकले आहे. शिक्षणाने त्याच्या जाणिवा प्रगल्भ झाल्यात. विचारांच्या कक्षा रुंद झाल्यात, त्याला आत्मभान गवसले. अविद्येचे अनर्थ त्याला कळून चुकले. मती, गती आणि नीती यांच्या संयोगातूनच होणाऱ्या समाजपरिवर्तनाचे चक्र शिक्षणामुळेच फिरते हे त्याच्या ध्यानात आले. आपल्या अंगभूत गुणांनी व्यक्त होते ती व्यक्ती आणि व्यक्तीची ती अभिव्यक्ती. शिक्षणाचा एक अर्थ अभिव्यक्ती असाही आहे. या अभिव्यक्तीतून १९६० नंतरचे मराठी साहित्य निर्माण झाले आहे, त्यानंतरचा दुसरा टप्पा आहे १९७५ नंतरचा. याच दरम्यान झालेली नव्या मध्यमवर्गाची निर्मिती 'ग्रामीण साहित्य' आणि 'स्त्रीवादी साहित्याची' आणि त्यानंतरच्या पुढील दोन तपांच्या काळात विविध अस्मितादर्शक संज्ञा-संकल्पना याचे स्पष्ट प्रतिबिंब मराठी साहित्यात उमटले आहे. त्याचा मूल्यवेध मराठीच्या अभ्यासकांना घ्यावा लागेल. असे म्हणतात की, माणसाने समोर पहावं, त्याला भविष्य कळतं, मागे पहावं, त्याला भूतकाळ कळतो, अवतीभवती पहावं, त्याला सत्य समजतं, स्वतःच्या आत डोकावून पहावं, त्याला स्वतःचा परिचय होतो. बदलत्या काळाची चाहूल घेऊन जो समाज मार्गक्रमण करतो तोच समाज प्रगतिपथावर वाटचाल करतो. न वाहणारे पाणी जसे सडून जाते, ते पिण्याच्या तर सोडा वापरण्याच्या योग्यतेचे राहात नाही. तसाच न बदलणारा समाज नामशेष होतो. आजच्या विज्ञान आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात मराठीचे जतन-संवर्धन करण्याच्या हेतूने एकूणच भाषा आणि साहित्याचा अभ्यास करावा लागेल. मराठीचे अध्ययन आणि अध्यापन यात नव्या तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करावा लागेल. यात ध्वनिफितीचा, चित्रफितीचा, उपग्रहावरून थेट ध्वनिलहरींच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या माहितीचा कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार होणे अगत्याचे! साहित्य जर समाजाचा आरसा असेल तर बदलत्या समाजाचे आरस्पानी प्रतिबिंब त्यात उमटले पाहिजे. माथ्यावरचे संपूर्ण आकाश स्वतःमध्ये प्रतिबिंबित करणाऱ्या सागराची विशालता साहित्याला लाभली पाहिजे.



यासाठी आम्ही मराठी बोलण्याचा कटाक्ष ठेवला पाहिजे. मराठी भाषेचे अध्ययन करणाऱ्या, माध्यम म्हणून मराठी स्वीकारलेल्या विद्यार्थ्यांची आणि मराठीचे अध्यापन करणाऱ्या शिक्षक-प्राध्यापकांचीच ती केवळ जबाबदारी नसून ते आपणा सर्वांचेच दायित्व आहे. भाषा-साहित्य आणि संस्कृतीचा असलेला नाळसंबंध आम्ही विसरता कामा नये. मूल बोलायला लागतं आणि त्याच्यावर पहिला संस्कार भाषेचा होतो. संस्कार म्हणजे मनाची मशागत आणि संस्कृतीची गर्भकल्पना असते संस्कार. भाषा हा त्या दृष्टीने मूलभूत घटक आहे. दैनंदिन व्यवहारात मराठीचा कटाक्षाने वापर, म्हणजे नकळत होणारा संस्कारच आहे. हिंदीच्या प्रचार-प्रसाराच्या संदर्भात 'हिंदी की बात मत करो, हिंदी में बात करो।' असं म्हणतात. तसेच मराठीबद्दल खूप चर्चा झाली, आता 'मराठी'ला केंद्रस्थानी ठेवूनच सर्व भाषिक व्यवहार व्हावेत ही अपेक्षा चुकीची ठरू नये.

आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, मंत्रालय, नगरपालिका, महानगरपालिका, महापौर हे शब्द आता रूजले आहेत. त्याच अर्थाचे असणारे इंग्रजी शब्द आता कमी वापरले जातात. 'आचारसंहिता' हा शब्द सामान्य माणूस सहजपणे वापरतो. कोणत्याही कारणाने का होईना पण 'भारनियमन' हा शब्द रूढ झाला आहे. जे आपण रुजवू ते रुजेल. 'स्वाईन फ्ल्यू', 'बर्ड फ्ल्यू' ह्या रोगाने मधल्या काळात थैमान घातले होते. प्रसारमाध्यमांनी हेच शब्द सातत्याने वापरून रूढ

अनुक्रमणिका

केलेत. वस्तुतः उच्चारायला कठीण असणारे शब्द सामान्य माणसेही सहजतेने वापरू लागलीत. त्या ऐवजी 'वराहज्वर' व 'कुक्कुटज्वर' हे मराठी शब्द वापरता आले असते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या व संगणक विज्ञानाच्या काळात 'हार्डवेअर' व 'सॉफ्टवेअर' हे शब्द सर्रास वापरले जातात. त्याऐवजी 'संगणकाची यंत्रणा' व 'संगणकाची मंत्रणा' असे अन्वर्थक शब्द वापरले तर ते अधिक सुयोग्य ठरतील. प्रसारमाध्यमांबरोबरच ते आपणां सर्वांचे दायित्व आहे, हे आपण जाणले पाहिजे. मच्छर, अंगूर, किचड या हिंदी शब्दांऐवजी डास, द्राक्षे, चिखल असे मराठीचेच शब्द आपण का वापरत नाही? समाजमूल्यातच जिथे भेसळ झाली तिथे भाषेत भेसळ झाल्यास काय नवल! अर्थात मराठीचा वापर करताना दुर्बोधता टाळली पाहिजे. पु. ल. देशपांडे एकदा म्हणाले होते, 'कुदळीला कुदळ म्हणावे, कृषी कर्मातील आयुध म्हणू नये.' यासाठी सोपी, सुबोध, प्रासादिक भाषा, संताची भाषा आम्ही आत्मसात केली पाहिजे. गाडगे महाराज लोकांच्या भाषेत बोलत असत. तेव्हा लोकांना वाटले हा खरा संत. हा खरा महात्मा. त्यांच्या भाषेने मधले अंतर केव्हाच पार केले आणि जनता व संत हा हृदयसंवाद घडून आला. अवघड बोलणे सोपे असते व सोपे बोलणे अवघड असते. यासंदर्भातील एक उद्‌बोधक गोष्ट मला सांगावीशी वाटतेः एका खेड्यात काही शासकीय अधिकारी व कर्मचारी काही कामानिमित्ताने गेले. मारुतीच्या पारावर बसलेल्या ग्रामस्थ मंडळींना त्यांनी विचारले, ''तुमच्या गावातील 'शासकीय बीजगुणन प्रक्षेत्र' कोठे आहे?'' ग्रामस्थ म्हणाले, ''आम्हाला नाही माहीत.'' अधिकारी म्हणाले, ''तुम्ही या गावात राहत नाही का?'' ते म्हणाले, ''साहेब आमच्या ४२ पिढ्या इथेच नांदल्यात'' अधिकारी परत म्हणाले, ''मग तुम्हाला शासकीय बीजगुणन प्रक्षेत्र कसे माहीत नाही?'' सर्वांच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह कायम होते. त्यातला एक शहाणा अधिकारी म्हणाला, ''अहो, तुमच्या गावातील 'गव्हर्मेंट सीड फार्म' कोठे आहे?'' सगळे ग्रामस्थ एका सुरात म्हणाले, ''साहेब असं जरा मराठीत विचारा ना.'' यातील विनोद सोडून दिला तरी बोलण्यातील दुर्बोधता टाळून सहज-सुंदर बोलींचा उपयोग संवाद साधण्यासाठी आम्हाला करता आला पाहिजे.

कधी नव्हे ते आज समाजजीवनावर सत्ता-संपत्ती व शस्त्र यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. बलदंड लोक पाशवी शक्तीचा उपयोग करून 'बळी तो कान पिळी' या उक्तीप्रमाणे दीन-दुबळ्यांना जगणे असह्य करून सोडतात. ही शरीरशक्ती. धनशक्तीचा सर्वत्र संचार असून त्या शक्तीने घातलेले थैमान आपण पाहतोच आहोत. तथापि सर्वश्रेष्ठ मानली जाते ती 'शब्दशक्ती' म्हणजेच ज्ञानशक्ती होय. भारतीय संस्कृतीत 'ॐ' हा ध्वनिरूप शब्द नादब्रह्म मानला गेला आहे. ग्रंथराज ज्ञानेश्वरीचा आरंभ 'ॐ' या अक्षरापासून - शब्दापासून झाला आहे. बायबलमध्ये वर्णन आहे की, ''प्रथमतः शब्द निर्माण झाला, तो शब्द ईश्वराचा होता, तो शब्दच ईश्वर होता.'' ही शब्दशक्ती संतांजवळ-महापुरुषांजवळ होती. आकड्यांच्या मागे अक्षरे उभी राहिली नाहीत तर अर्थ-संपन्नता असूनही सांस्कृतिक दारिद्र्य नांदताना दिसून येते. परिणामतः संस्कृतीचा ऱ्हास होतो. संस्कृतीचा संबंध हा ज्ञानशक्तीशी आहे. काळ कोणताही असो ज्ञानाची पुण्याई ही वेगळीच असते, 'न हि ज्ञानेनं सदृश्य पवित्रमिह विद्यते' असे योगेश्वर श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहेच. महापुरुषांनी शब्दातील सामर्थ्यांच्या मागे आपली तपश्चर्या उभी करून जग जिंकून घेतले. ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषदेत 'बंधू-भगिनींनो!' हा भावोत्कट शब्दप्रयोग करून ती धर्मपरिषद स्वामी विवेकानंदांनी जिंकली. ९ ऑगस्ट १९४२ रोजी गोवालिया टँक, आताचे क्रांती मैदान येथे अ. भा. काँग्रेसच्या अधिवेशनात महात्मा गांधी यांनी नखशिखांत शस्त्रसज्ज अशा साम्राज्यशाहीला 'चले जाव' म्हटले आणि उण्यापुऱ्या पाच वर्षांत त्यांना आपला गाशा गुंडाळावा लागला. वेद मंत्राहुनी प्रिय असलेल्या 'वंदे मातरम्'च्या जयघोषाने देशभरात स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित झाली. 'मेरी झांशी नही दुंगी' असे झांशीची राणी असलेल्या लक्ष्मीबाईंनी निर्भयपणे ब्रिटिशांना ठणकावले. वडिलांनी दिलेल्या शब्दांचे पावित्र्य राखण्यासाठी मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्र कोणताही अपराध नसताना १४ वर्षे वनवासात गेले. सराफ कट्ट्यावर असलेल्या ताजव्याप्रमाणे शब्द तोलून मापून वापरला तर त्याचा प्रभाव जाणवतो. शब्दांचा क्रम, त्याचा संदर्भ व अर्थ माहीत नसल्यास अनर्थ निर्माण होऊ शकतो. संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील 'जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात' या ओवीचा खरा अर्थ त्या आधीच्या ओळी वाचल्यानंतरच कळतो आणि म्हणूनच संदर्भासहित अर्थ

अनुक्रमणिका


स्पष्ट करा असा प्रश्न, प्रश्नपत्रिकेत हमखास विचारला जातो. मराठी भाषेची ही मोड, तिची विलोभनीय गुणवैशिष्ट्ये, तिचा पोत, तिचे कंगोरे आम्ही जाणून घेतली पाहिजेत. आमच्या भावविश्वाशी अनुबंध ठेवणाऱ्या या आईच्या भाषेला पुढच्या पिढीपर्यंत तर संक्रांत करावयाचे असेल आणि नव्या पिढीचा भावविश्वस्त जर आम्हाला व्हावयाचे असेल तर मराठीचाच आश्रय घ्यावा लागेल. प्रगत तंत्रज्ञान आता थेट आमच्या घरात-चुलीपर्यंत पोचले आहे. नवी पिढी मुद्रित कागदापेक्षा परमाणू विद्युतने तयार केलेल्या भ्रमणध्वनी संचाचा पडदा, संगणकटंकचा (लॅपटॉप) पडदा, संगणक संच व दूरदर्शनचा पडदा याकडे आकृष्ट झाली आहे. ही उपकरणे सहज समर्थपणे हाताळण्यात ती कुशल झाली आहे. ज्ञानप्रसाराची ही साधने सहजगत्या उपलब्ध झाल्यामुळेच, भोवतीच्या वातावरणामुळे, परिस्थितीचा रेटा वाढल्यामुळेच या नव्या तंत्रज्ञानाची अपरिहार्यता निर्माण झाली असेल तर ती अटळता आपण स्वीकारली पाहिजे. किंबहुना आपण ती स्वीकारली आहेच. तथापि या यंत्रशरणतेमुळे, सतत निर्जीव यंत्र हाताळता हाताळता ही नवी पिढी आत्ममग्न बनली आहे. घरातला संवाद हरवत आहे. घरं मुकी बनत आहेत. आम्हाला 'नवता'ही हवी आणि परंपराही हवी. आमची भाषा आमचे साहित्य आणि आमची संस्कृती याच्याशी आमचा तो नाळसंबंध आहे. तो तुटता कामा नये. परंपरेचा अन् नवतेचा संबंध कसा जोडता येईल? या संदर्भात विचारमंथन होणे आवश्यक आहे.

सर्वत्र मूल्यऱ्हासाचे प्रदूषित वातावरण आहे. समाज अगतिक-हतबल बनला आहे, ''सारे कसे शांत-शांत तरंग नाही तलावात!'' असे कविवर्य विठ्ठल वाघ म्हणाले होते; ते खरे ठरल्याचा दुःसह प्रत्यय येत आहे. बदलत्या मूल्यव्यवस्थेत मराठी भाषेचे अस्तित्व, तिचे आरोग्य आणि तिचे संवर्धन हा प्रश्न ऐरणीवर आला आहे आणि मराठी भाषक म्हणून आमचे दायित्व वाढलेले आहे. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली, त्यावेळी नवमहाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री असलेले यशवंतरावजी चव्हाण म्हणाले होते, ''हे राज्य मराठी असेल. यातील मर्म आम्ही जाणले पाहिजे.''

जीवन समृद्ध आणि संपन्न करणाऱ्या ललित कलांमध्ये साहित्याचा क्रम खूप वरचा आहे आणि भाषेतील लावण्य सदैव लखलखीत असते. स्त्री-पुरुषाच्या सौंदर्याला जरा-मरण आहे. वार्धक्याचा अभिशाप आहे. एकेकाळी अंतःकरणावर अधिराज्य गाजविणाऱ्या रंगभूमी-चित्रपटातील तारकांना त्यांच्या वार्धक्यात पाहावत नाही. तथापि साहित्य अजर-अमर-अक्षर असते. चित्रकला-शिल्पकला यांनाही जरा-मरण आहे. अजिंठ्यातील चित्रकला काळवंडत आहे. वेरूळमधील शिल्पकला भग्न पावत आहे. 'संगमरवरातील काव्य' असे ज्या शिल्पकलेचे सौंदर्य आणि जगातील सातवे आश्चर्य मानल्या गेलेला ताजमहल भोवतीच्या प्रदूषणामुळे काळवंडत आहे. या सर्वाला हा साहित्य उज्ज्वल अपवाद आहे. मायमराठीच्या अनेक वर्षांतून एकदा होणाऱ्या या जिल्हा साहित्य संमेलनाची ही अपूर्वाई आहे. रसिकांच्या-जनतेच्या दृष्टीने हा मोठा वाङ्मयीन उत्सव आहे.

• • •

अनुक्रमणिका



। लेख

अस्वस्थ मराठी रंगभूमी : पूर्वरंग

▫ माणिक कानेड

वास्तव जीवनात 'जर... तर'च्या संभावनांना आपण एक काल्पनिक खेळ मानतो. रंगभूमीवर या कल्पक संभावना वास्तवरूपात प्रयोगरूपाने साकार होतात.

"In real life 'If' is an evdsion In 'Theatre' 'If' is the truth." (Peter Brook)

जर...तरच्या संभावना मिथ्या/फसव्या म्हणून त्यांना आपण दूर सारतो. प्रत्यक्ष रंगभूमीवरील खेळात हेच सत्य असते. नाटकाच्या प्रयोगाने हे सत्य विश्वसनीय मानण्यास आपण प्रवृत्त झालो जर वास्तव जीवन आणि रंगभूमी (Theatre) एकरूप होतात.

"Lift and Theatre become one It is difficult to play, but playing a play 'is a 'revelation' या साक्षात्कारी ज्ञानाने माझ्या मते मानवी जीवनाचे एक अभिनव भान आपल्याला होते.

वास्तवातील जीवनानुभव नाटककाराच्या भावगर्भ आणि बुद्धिगम्य अनुभूतीतून साकार झालेले नाटक आणि हेच वास्तव मानून रंगभूमीवर साकार झालेला नाट्यप्रयोग अन्योन्याश्रयी व अन्योन्यसापेक्ष असतो. वास्तवातून रंगभूमीवर आणि रंगभूमीवरून पुन्हा वास्तव जीवनात असा हा प्रवास असतो. या दृष्टीने लोकधर्मी आणि नाट्यधर्मी यांचा अन्योन्य संबंध असतो. हा द्वयमार्गी प्रवास (Two Way Traffic) असतो.

'Theatre And Its Double' (आर्तो) असे हे स्वरूप असते.

माणसाच्या आजच्या जीवनातील क्षोभ, वेदना, अस्वस्थता इत्यादींचे दर्शन रंगभूमीवर घडते. ब्रेख्तआर्तो, सार्त्र, ग्रोटोव्हस्की इत्यादी पाश्चात्त्य रंगभूमीवर प्रभाव गाजविणाऱ्या नाट्यशिल्पींच्या नाट्यशास्त्रीय विचारांचा आणि त्या अनुरोधाने त्यांनी रंगभूमीवर सादर केलेल्या प्रायोगिक उपक्रमांचा मागोवा घेतल्यानंतर मराठी रंगभूमीवरील अस्वस्थतेचा शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे. (संदर्भ : 'अस्वस्थ रंगभूमी' युगवाणी, जा.फे.मा. २०१७)

१. आत्मिक वा मानसिक स्वरूपाची अस्वस्थता :

आत्मिक अस्वस्थता किंवा आध्यात्मिक आकुलता समजावी म्हणून मला इब्सेनची आठवण होते.

इब्सेनचे पाच अंकी नाटक 'ब्रान्द' मुळात हे प्रदीर्घ निवेदनात्मक काव्य आहे. 'ब्रान्द' शब्दाचा अर्थ आहे. 'अग्निखड्ग' (Sword of Fire) आत्मिक उन्नयन होण्याविषयी त्याला जितकी आशा होती तितकीच निराशाही त्यातून सूचित होते.

सकृतदर्शनी या नाटकाचे स्वरूप धार्मिक दिसते. ईश्वराच्या सान्निध्याचा मानवाचा आत्मा मुकला. सूर्यप्रभेला वंचित होऊन घोर अंधाराच्या महासागरातील वनवास त्याच्या भाळी आला. हे

आनुवंशिक पाप खांद्यावर घेऊन हा आत्मा आक्रंदून स्वातंत्र्याची मोकळी हवा आणि मुक्त प्रकाश पुन्हा प्राप्त करावा म्हणून अनंत आकाशाकडे पाहून प्रार्थना करतो. पापमुक्ती आणि आत्मस्वातंत्र्यातून आत्मशुद्धी अशक्यच! पण त्यासाठी संघर्ष करणे हा आत्म्याचा स्वभाव आहे. या संघर्षात जायबंदी होण्याचे, मरणाचे भय आहे. सुखाच्या आसक्तीची प्रलोभने आहेत; पण त्यांना नकार देऊन आपल्या आदर्शावर श्रद्धा आणि निष्ठा ठेवणे यातच आत्मधर्म आहे. आत्मज्ञान हीच खरी मुक्ती! त्यासाठी हवी इच्छाशक्ती! "If not by will, how can man be redeemed!" हा ब्रान्दचा ईश्वराला केलेला शेवटचा सवाल आहे आणि पर्वतराजीतून उत्तर येते. "He is The God of charity, mercy, Love." या आकाशवाणीने हे नाटक संपते.

इब्सेनच्या सामाजिक योगदानाचे कौतुक मराठी रंगभूमीने केले हे खरे असले, तरी "I have been more of a poet and less of a social phlosopher than is commonly believed." हे इब्सेनचे उद्‌गार महत्त्वाचे आहेत. आत्मिक अस्वस्थता/आध्यात्मिक व्याकुळता आपल्या आत्म्याचे जगनियंत्या ईश्वराशी नाते तुटल्यामुळे निर्माण झालेली दिसते.

"God is in His Heaven... All is well with The World." या ब्राऊनिंगच्या कवितेतील आशयाचा प्रत्यय या लौकिक जगात माणसाला आज प्रकर्षाने येत नाही. प्रत्यही माणसाला आपत्तींना सामोरे जावे लागते. सगळे आलबेल नाही. त्याला प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागते. पण ईश्वराचे अधिष्ठान आज त्याने गमावले असल्याने त्याचे आत्मिक समाधान हरवले आहे. काल्पनिक का असेना, पण या आध्यात्मिक आश्वासनात शांत असलेला माणूस आज 'ठेविले अनंते तैशीचे राहावे, चित्ती असू द्यावे समाधान.' यातील निश्चिततेला पारखा झाला आहे. आजच्या भौतिक सुखसमृद्धीतही माणूस अस्वस्थच आहे. मानवी जीवनात संतुलन घडवून आणणारा ईश्वराचा आधारच तुटला. त्यामुळे जीवनाच्या लौकिक आणि अलौकिक क्षेत्रातील संतुलन संपल्यामुळे सगळीकडे अराजकता, अस्वस्थता, गोंधळ निर्माण झालेला दिसतो. माणसाची अस्वस्थता आजच्या मानवी जीवनाचे अपरिहार्य अंग बनले आहे.

नित्सेच्या तत्त्वज्ञानाने ईश्वराचा मृत्यू जाहीर केला. परंपरागत श्रद्धा, मानवी मूल्ये, आत्मिक समाधान त्याबरोबरच नाहीसे झाले. नवीन मूल्ये सापडणे दुरापास्त झाले. त्यामुळे "To Kill God And to build Church" अशा परस्परविरोधी काचात आजचा माणूस सापडला आहे. त्याची आध्यात्मिक अस्वस्थता अर्वाचीन पाश्चात्त्य नाटकांतून जाणवते. ही आत्मिक अस्वस्थता, इब्सेन, स्ट्रीनबर्ग, कामू आदी नाटककारांच्या नाट्यकृतीत प्रसंगी बंडखोरीही प्रकर्षाने प्रकट झालेली आहे. आदिभौतिक, आदिबंधाला गमावल्याची त्यांची आकुलत्ता येथे आढळते. अर्वाचीन सुसंस्कृत नागरी रंगभूमीवर ही आध्यात्मिक आकुलता फारशी आढळत नाही. 'वासांसि जिर्णानी' (महेश एलकुंचवार) असे काही अपवाद संभवतात. परंतु अनागरी लोकरंगभूमीवर ती भक्ती संप्रदायाच्या योगदानातून दिसून येते.

भक्ती संप्रदायाचे योगदान :

लोकरंगभूमीला धर्माचे अधिष्ठान आहे. बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर (सातवे शतक) एक नवीन सांस्कृतिक भान लोकांना आलेले दिसते. वैदिक धर्मात शंकराचार्याच्या अद्वैत तत्त्वज्ञानाने लोकजीवनाला नवी उभारी आली. जीव आणि शिव यांच्या ऐक्यात कर्मकांडाची आडकाठी नको यायला. माणूस स्वतःच देव होऊ शकतो; कारण देवत्व त्यांच्या आत्म्यात असतं. या शिकवणीतून एक नवा आत्मविश्वास लोकांत निर्माण झाला.

''जग हे मिथ्या आहे.'' असं कितीही सांगितलं तरी ऐहिक जीवनाचा भूलभुलैय्या माणूस सोडायला तयार नसतो. या लौकिक संसारी जीवनातूनच अलौकिक आनंद देणारा एक नवीन भक्ती संप्रदाय जन्मास आला आणि काही काळातच भक्ती संप्रदायाच्या संतांनी रचलेल्या कवनांनी लोक भारून गेल्याचे दिसते. ईश्वराची ताटातूट झाल्याचे दुःख आणि पुनर्भेटीची आस ज्ञानदेवांच्या विराण्यांतून, ('अवस्था लावूनी गेला... अजुनी का न ये') तसेच तुकारामांच्या अभंगवाणीतून (''कन्या सासुरासी जाये। मागे परतोनी पाहे। तैसे झाले माझ्या जिवा। केव्हा भेटसी केशवा।'') आपल्या प्रत्ययाला येते. संत भक्तांच्या कवनांचा वापर भारतीय लोकनाट्यातून झालेला आहे.

'भवई' (गुजरात), 'भागवतमेळा'(मद्रास), 'कुचीपुडी' (आंध्र), 'अंकियानाट' (आसाम), 'जात्रा' (बंगाल), 'यक्षगान'(कर्नाटक), कथकली (केरळ) ,

अनुक्रमणिका

लळिते - दशावतारी खेळे (महाराष्ट्र) रामलीला, कृष्णलीला इत्यादी लोकनाट्यांतून ईश्वराशी जवळीक साधण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते. महाराष्ट्रात लोकनाट्याचे स्वतःच असे स्वतंत्र अस्तित्व विविध प्रकारांनी व्यक्त झालेले आहे. उदा. पश्चिम महाराष्ट्रात 'तमाशा', कोकणात 'लळित', विदर्भात 'दंडार', मराठवाड्यात 'भारूड', 'गोंधळ', 'पोवाडा', 'कीर्तन', 'लावणी' इ. (विशेष म्हणजे शृंगार आणि वीररसांनी परिप्लुत असलेल्या या प्रकारात 'भेदिक' लावणीचा अंतर्भाव होतो.) लोकरंगभूमीच्या अभिव्यक्तीत कालानुसार व प्रदेशानुसार स्थित्यंतरे झालेली असली तरी आजही काही समान वैशिष्ट्ये तिच्यात टिकून आहेत. नाट्यप्रयोगात नृत्य, गायन, वादन अनुस्यूत असतात. रात्रभर जागरण करून ईश्वराचे गायन रंगभूमीवर होत असताना त्यात सहभागी झाल्याने पुण्यकृत्य घडते असा विश्वास लोकांत भक्ती संप्रदायाने रुजविला.

रामकृष्ण घरी परतले. ''दार उघडा. त्यांचं आगमन म्हणजे कामधेनूच आली. सुखी व्हा!''

कोकणातील ललित व दशवतारी खेळे यातही यक्षगानाचे अनुकरण आहे.

''रामकृष्णरू मनगे बेदरू
बागिलु तेगियरो
कामधेनु बंदितायितु
सुखव पडेयिरो।''

यक्षगानाचा शेवट या गीताने होतो.

आत्मिक असमाधान/आध्यात्मिक आकुलता नागरी रंगभूमीवर अभावानेच दिसते.

'वरून तमाशा, आतून कीर्तन' आणि 'विठ्ठला विठ्ठला' ही काही नाटके मराठी रंगभूमीवर आली आणि गेली. त्याची कोणी फारशी दखलही घेतली नाही. परंतु, आधुनिक रंगभूमीवर मानसिक अस्वस्थतेचे दर्शन घडते. ग्रोटोव्हस्कीने आपल्या "The Poor Theatre च्या संकल्पनेत 'Actor - spectator Relationship' यात रंगभूमीचा व्यवहार सामावलेला असतो असे म्हटले आहे.

बालगंधर्व प्रेक्षकांना 'मायबाप' म्हणायचे आणि प्रेक्षक त्यांच्या अभिनयाला तसेच गायनाला 'Once More म्हणून दाद देत. नट आणि प्रेक्षक हे दोन आदिबिंदू कल्पून त्यांचा अनुबंध नाट्यगृहातील प्रयोगात लक्षात घ्यावा लागतो. रंगभूमीवरील नट आणि नाट्यगृहातील प्रेक्षक यांच्याविना नाट्यप्रयोग संभवत नाही.

मी (नट) आणि तू (प्रेक्षक) यांचा संवाद :

रंगभूमीवरील आभास आणि वास्तव यांचा अन्योन्य संबंध अशा दृष्टीने 'मी' (नट) आणि 'तू' (प्रेक्षक) जणू परस्परांशी संवाद साधतात अशी कल्पना केली तर -

लौकिक वास्तव जीवनात कोणीएक 'मी' कोण्या एकाला- 'तू'ला विचारतो, - 'कसं काय?,'तू' उत्तरतो 'ठीक आहे.' मग 'मी'सुद्धा 'तू'ला सांगतो, 'माझंही छान चाललंय.' आपल्या दैनंदिन जीवनातील या औपचारिक संवादातून मानवी जीवनाकडे पाहिले तर त्यात नाट्य असं काही नाही असं वाटलं. सुखान्तिका तरी संभवते काय?ः

''मी सुखान्तिका लिहायला प्रारंभ करतो तेव्हा पहिला विचार माझ्या मनाला स्पर्श करतो तो शोकान्तिकेचा... त्यातील भूमिका शोकान्तिकेला लायक नसतील तर सुखान्तिका होऊच शकणार नाहीत.'' असे म्हणून ख्रिस्तोफर फ्राय दोहोंतील भेद फरक स्पष्ट करताना म्हणतो - ''शोकान्तिका आणि सुखान्तिका यातील (मूलभूत) फरक म्हणजे प्रत्यक्ष इंद्रियजन्य प्रचितीतून प्राप्त होणारे ज्ञान (Experience) आणि अर्न्तज्ञान (Intuition) यातील फरक होय. ('On Comedy' - Tulane Drama Review Vol. 4, Spring 1900) हे विधान लक्षात घेता शोकान्तिका आणि सुखान्तिका यांची सरमिसळ झालेली असते. दोहोतही आपल्याला अस्वस्थ करण्याची क्षमता असतेच असते. लौकिक जीवनातील शोकात्म अथवा सुखात्म अनुभव नाटककाराच्या अनुभूतीतून रंगभूमीवरील नाट्यप्रयोगात का? व कसा? प्रकट होतो हे पाहायला आता हरकत नसावी. प्रेक्षकांना केवळ हसविणारे हलकेफुलके विनोदी नाटक म्हणजे सुखान्तिका नव्हे.

रंगभूमीवरील आभासात्मक खेळ :

नाटकाच्या खेळात 'मी' (नटांचे सामूहिक एकवचन) रंगभूमीवर आपला खेळ मांडतो आणि 'तू' (प्रेक्षागृहांतील रसिकांच्या समूहाचे एकवचन) हा खेळ पाहून - ऐकत असतो. खेळातील 'मी' ची कथा-व्यथा 'तू' पाहात, ऐकत असतो. रंगभूमीवरील आविष्काराला हे पुरेसे असते. वास्तवातील 'मी' आणि 'तू' चे प्रतिबिंब अशा प्रकारे नाटकाच्या खेळात पडत असते. आमच्या-

अनुक्रमणिका

तुमच्या वास्तवाचा हा रंगभूमीवरील 'आभासा'चा हा खेळ- आपण (प्रेक्षागृहातील रसिक) कधी त्यात समरसून तादात्म्य पावत गुंतून जातो, तर कधी त्यापासून फटकून अलिप्तपणे त्याचा आस्वाद घेत असतो. परस्परांच्या भूमिका बदलून ('मी'चा 'तू' किंवा 'तू'चा 'मी') रंगभूमीवरील आभासात्मक जीवनाच्या चौकटीत सहभागी होऊन आपण पुनःपुन्हा एका विशिष्ट जीवनाचा अनुभव जगत असतो. "We relive in doing something?"

(थिएटर ॲकॅडमीच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकात 'पुण्याचे बामण हरी' प्रेक्षागृहातून येतात आणि रंगभूमीवर तालावर डोलत-नाचत नंतरच्या नाट्यात अनेक भूमिकाही वठवितात. वास्तव जीवनात सुख-दुःखाचे, हर्ष-खेदाचे क्षण येतात आणि जातात. ते आपण अनुभवतोही पण नेणतेपणाने. या जगण्यात जाणीवपूर्वक उत्कटता नसते. या अनुभवाकडे पुनःपुन्हा रंगभूमीवर पाहताना - ऐकताना - ती उत्कटता जगत असतो. आता जाणवते आणि पटतेही. प्रत्यक्ष वास्तव जीवनात ही उत्कटता जाणीवपूर्वक त्याचे भान ठेवून आपण जगलेले नसतो.

या दृष्टीने थॉटन वाइल्डरचे 'Our Town' हे नाटक लक्षणीय आहे. आपले हरवलेले उत्कट क्षण मृत्यूनंतर जिवंत माणसाच्या वास्तव जगात परत येऊन जगावे असे या नाटकातील ॲनला वाटते. पण ते शक्य असते काय? 'Our Town' हे नाटक वास्तव आणि स्वप्न यांचे अप्रतिम दर्शन घडविते.

या संदर्भात मला असे वाटते की, प्रत्येक माणसाची ('मी'/'तू') ही अभिलाषा रंगभूमीवरील आभासात्मक खेळातून आपण पुनःप्रत्ययाने पूर्ण करून घेत असतो.

रंगभूमीवरील 'मी' आणि प्रेक्षागृहातील 'तू' असे काही काळ एकत्र येतात. खेळ मांडून खेळतात आणि पुन्हा आपापल्या जीवनात परत जातात. रंगभूमीवरील जीवनाला संसाराचा आरसा असे म्हटले जाते. आपले बिंबरूप असलेले खरे जीवन रंगभूमीवरील आरशात प्रतिबिंबरूपाने उमटलेले असते.

'मी' - 'तू' चे अद्वैत :

ॲरिस्टॉटलने केलेल्या Tragedy व्याख्येत या तादात्म्यातून भावभावनांचे 'शुद्धिकरण' Purgation विरेचन) through 'pity and fear' or such like emotions हे लक्षात घेतले पाहिजे. 'Comedy' मध्येही Tragic sense, शोकात्म भाव अनुस्यूत असतो हेही तितकेच लक्षणीय असते.

मानसिक अस्वस्थता आणि शोकान्तिका :

शोकान्तिका लिहिणारा लेखक, ती सादर करणारा नट आणि ते पाहणारा प्रेक्षक असे सगळे 'तुम्ही' - 'आम्ही' अस्वस्थ असतो.

ग्रीक शोकान्तिकांच्या संदर्भात शोकनायकाचा करुण अंत नियतीने मुक्रर केलेला असतो. 'Destiny' (नियती) is Character' शेक्सपियरने हे उत्तरदायित्व Character is destiny असे प्रतिपादन केले.

शेक्सपियरच्या प्रसिद्ध चार शोकान्तिकांचे मनोविकार विलसित :

हॅम्लेट - अनिर्णायक कर्मशून्यता, 'To be or not to be? 'जगावे की मरावे', हा एक सवाल आहे.
ऑथेल्लो - अति संशयग्रस्त स्वभाव-लाडक्या पत्नीने (डेस्डिमोना) जारकर्म केले या संशयाने तगमग

मॅकबेथ - अतिमहत्त्वाकांक्षी स्वभाव मानसिक अगतिकतेतून तो मारला जातो.

किंगलिअर - मानसिक असमतोलामुळे अति अहंकारी व वेडसरपणा या चारही शोकनायकांचा करुण अंत त्यांच्या मानसिक अस्वस्थतेतून होतो.

शेक्सपियरच्या शोकान्तिकांतील पात्रांच्या वर्तनाचा अर्थ त्यांच्या मानसिकतेत- वर्तनात- पर्यायाने स्वभावात शोधण्याचा प्रयत्न झालेला आहे. अशा तऱ्हेने नाटक वर्तनाकडून त्यातून निर्माण होणाऱ्या (Action) मानसिकतेकडे (Psyche) वळलेले दिसते.

मानसशास्त्राचे विकसित स्वरूप :

मानवी जीवनातील सत्याचा शोध घेणाऱ्या तत्त्वज्ञानाची (Philosophy) एक शाखा म्हणून मानसशास्त्र जसजसे (Phychology) विकसित होत गेले तसतसे मानवी व्यवहाराकडे, माणसाच्या वर्तनाकडे, स्वभावाकडे, मानवी जीवनातील विविध घटनांकडे, मनोव्यापाराकडे वेगळ्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले.

शोपेनहोर, बर्गसन् यांच्या तत्त्वज्ञानाबरोबरच फ्रॉइड-ॲडलर, युंग यांच्या मानसशास्त्रीय संशोधनाचा व त्याच्याशी निगडित वर्तनाबद्दलही अभ्यास होऊ

अनुक्रमणिका

लागला. मानसशास्त्र मग एकप्रकारे Science of behaviour या दृष्टीने महत्त्वाचे मानले गेले.

माणसाच्या अंतर्मनाचा, प्रज्ञासुलभ (conscious) आणि प्रज्ञादुर्लभ (unconscious) मनाचा शोध घेऊन त्याच्या प्रकट-अप्रकट व्यक्तिमत्त्वाचे पैलू रंगभूमीवर उलगडून दाखविणे नाटकांतील घटनांपेक्षा अधिक महत्त्वाचे मानले जाऊ लागले. प्रत्यक्षदर्शनी कृतीमागे असलेल्या अदृश्य मनाचा शोध घेतला पाहिजे. परंतु या अमूर्त मनू (गूढ मनाचा तळ रंगभूमीवर दर्शनीय करायचा कसा? या दृष्टीने नाट्यतंत्रात बरेच बदल झाले. मूकाभिनय, पात्रांचे स्वगत, आत्मगत, रंगमंचावरील नेपथ्य (stage craft and technique) इत्यादी बाबींचा नाट्यप्रयोगात वापर होऊ लागला.

मराठीतील काही लक्षणीय नाटके :

या संदर्भात 'वेड्याचे घर उन्हात' या नाटकाचा उल्लेख करता येईल. (वसंत कानेटकर, १९५७) या नाटकाचा गाभा म्हणजे दादासाहेबांचे प्रत्यक्ष देहरूप आणि अप्रत्यक्ष मानसिक अस्तित्व होय. दादांचा रुद्रावतारी अहंकार, त्यांची अपराधी मनोवृत्ती, ममता आणि विफलता/रसिकता यांचा विचार त्यांचे व्यक्तिमत्त्व समजून घेताना करावा लागतो. गाण्याच्या आणि इतर व्यसनापायी बडे भय्यांनी घराचा कसा विध्वंस केला याबद्दल घृणा आणि तिरस्कार असल्याने 'दामू' परागंदा झाला ही अपराधी भावना भूतकाळात आपणाला नेते. सांप्रत आपण घर सावरणार, आपण म्हणू ती पूर्व दिशा. बापूने किंवा शकूने आपल्या शब्दाबाहेर जाता कामा नये हा अहंकार. या सर्वांचा ताण अदृश्य होऊन त्यांची वेडात झालेली परिणती हा आलेख लक्षात घेता हे मनोविश्लेषणात्मक नाटक आहे हे लक्षात येते.

दादांच्या 'split personality' चा ठसा या नाटकावर उमटलेला आहे. त्यामुळे अस्वस्थ करणारे हे नाटक आहे. नाटक केवळ शोकान्तिका आहे असे म्हणता येईलही; पण ॲरिस्टॉटलच्या भावना-विरेचनाची मापे या नाटकाला लावण्यापेक्षा मराठी रंगभूमीवरील एक अपूर्व आणि अस्वस्थ करणारे नाटक आहे हे महत्त्वाचे मानावे.

मानवी सुखदुःखाची सूक्ष्मता, स्वभावातील अंतर्विरोध आणि जीवनदर्शनातील भेदकता यांचा कलात्मक संगम येथे दिसतो. हे नाटक गडकऱ्यांच्या शोकान्तिकांप्रमाणे ढसढसा रडवत नाही. पण आतून आपणाला अस्वस्थ करते हे निश्चित!

मानवी मनाच्या खोल डोहात डोकावून पाहिले म्हणजे माणसाच्या अशा द्विधा व्यक्तिमत्त्वाचा बोध देणारे दुसरे नाटक म्हणजे 'अवध्य'(चिं.त्र्यं. खानोलकर) होय. या नाटकाला माधव मनोहर 'वयात आलेले नाटक' असे म्हणतात.

गंगाधर नावाचे व्यक्तिमत्त्व (Duel personality) हा या नाटकाचा केंद्रबिंदू आहे. गंगाधरच्या सुष्ट-दुष्ट भावनांचा संघर्ष त्याच्या प्रकट-अप्रगट मनातील द्वंद्व, त्याच्या Ego-Alter ego 'यातील द्वैत यावर हे नाटक आधारलेले आहे. गंगाधरचे सुबोध मन-अबोध मन यांचे द्वंद्व त्याच्या सभोवतीच्या माणसांच्या मनोविश्वामधून (collective consciousness) आकाराला आलेल्या 'super ego' बरोबर त्याच्या स्वत्वाचा संघर्ष येथे दिसतो. मानवी स्वभावाचे अंतिम सत्य. सापडणे काय हे या नाटकात पाहायला व ऐकायला मिळते. गुणावगुणांचा संकर म्हणजे माणूस! परिस्थितीने पारध केल्यामुळे हिंस्र, निर्घृण बनलेला माणूस, लाचार, असहाय, किळसवाणे जीवन जगणारा माणूस, सामाजिक प्रतिष्ठेचा मुखवटा घालून मिरणारा माणूस, अप्राप्याची अभिलाषा धरून वांछिले ते मिळत नाही म्हणून दुसऱ्याच्या भोगविलासात गुप्तपणे डोकावून वासनांची तृप्ती करून घेणारा माणूस, नीती-अनीतीच्या पलीकडे झेप घेणारा माणूस, लौकिक जगाच्या किळसवाण्या पिंजऱ्यात अडकल्यामुळे आत्म्याच्या विशुद्ध रूपाकडे जाण्यासाठी आत्महत्या करणारा माणूस इत्यादी अनेक रूपे येथे एका व्यक्तीत प्रतिबिंबित झालेली आहेत.

माणसाचे वैयक्तिक स्वत्व, सामाजिक विकल्पात्मक अस्तित्व (personal self-social self) आणि आदर्श, अलौकिक व्यक्तिमत्त्व (Ideal self) इत्यादी पातळ्यांवर फिरणारे हे नाटक पाहताना अस्वस्थ व्हायला होते.

व्यक्तिसापेक्षतेच्या पलीकडे जाऊन परस्पर विरोधीवृत्तींच्या पार जाऊन महाकाय 'अवध्य' मानवतेचा साक्षात्कार या नाटकात झालेला दिसतो. गंगाधरची मानसिक आंदोलने आणि अनादी अनंत द्वंद्व रंगभूमीवर साक्षात घडविणे म्हणजे एक आव्हानच होते. स्वगतांनी, आत्मगतांनी हा प्रश्न सुटणे शक्यच नव्हते. द्रष्ट्याप्रमाणे क्षणाक्षणाला भूत, वर्तमान, भविष्यात

अनुक्रमणिका

डोकावून जागृती आणि स्वप्न यांत एकाचवेळी आत्म्याच्या अनामिक आदिमप्रेरणांचा शोध घेणे कठीण असते.

एकाचवेळी गंगाधरचे मन ही रंगभूमी कल्पायची; पण सभोवतीचे वास्तव सोडायचे नाही यासाठी नाटककाराने वापरलेल्या लयांचा उल्लेख करावा लागेल. हे नाटक एकाचवेळी वास्तवाच्या आणि कल्पिताच्या पातळीवरच चालत नसून त्यात अनेक पातळ्यांची (Levels) कल्पना करावी लागते. स्वतःशी बोलता-बोलता दुसऱ्या पात्रांशी संवाद साधायचा हे तंत्र पाहून ओनीलच्या strange Interlude ची आठवण होते. गंगाधर अवध्यच!

मानसशास्त्राच्या क्षेत्रात फ्रॉइडने आपल्या मनोविश्लेषणात्मक पद्धतीने प्रचंड वादळ निर्माण केले. स्वप्नमीमांसेतून दडपलेल्या लैंगिक भावभावनाची विकृती त्याने दर्शविली Adler चे 'Psychology of Sex' दुर्लक्षित करता येत नाही. याचा प्रत्यय जयवंत दळवींच्या 'बॅरिस्टर' आणि 'महासागर' या नाटकांतून येतो. वैयक्तिक स्वभावाच्या विकृतीत 'sex' चे अंतःप्रवाह कसे खळखळत असतात यांचे दर्शन या दोन नाटकांतून होते.

बॅरिस्टर :

बॅरिस्टर रावसाहेब आत्मलुब्ध असल्याने आत्मरतीने पछाडलेला आहे. त्याच्या केसांचे वळण, त्याने वापरलेला विग, पोशाख, घोडागाडी, त्याचे दैनंदिन वागणे, बोलणे, शेजाऱ्याच्या बायकोला फूल देणे इत्यादींतून त्याची सौंदर्यासक्ती, रसिकता निर्व्याज भासते. तरीपण हळूहळू ती मानसिक विकृतीकडे झेपावते. आनुवंशिक वेडेपण, इंग्लंडमध्ये शिकत असताना एका मुलीचे प्रेमप्रकरण आणि आता शेजारी असलेल्या भाऊरावच्या अपत्य असलेल्या पत्नीचे आकर्षण इडिपसला असलेल्या फ्रॉइडप्रणीत न्यूनगंडाशी जोडलेले आहे. डोळ्यांची जळजळ थांबावी म्हणून भाऊरावच्या पत्नीच्या दुधाचे थेंब रावसाहेबांनी चटचट चोखून पिणे हेच दर्शविते.

प्राचीन मिथकातील केसांचे प्रतीक (भीम दुःशासनाच्या रक्ताने द्रौपदीचे केस भारवतो) भाऊरावच्या विधवेच्या केशवपनाला केलेला कृतिशून्य विरोध रावसाहेबांची मानसिक दुर्बलता प्रकट करतो. स्वतःच्या घरातील मावशीचे सोवळेपण एकाचवेळी जपणारा आणि विधवेच्या केशवपनाला विरोध करणारा - तरुण विधवेवर वैषयिक प्रेम करणारा पण पुनर्विवाह करून तिची यातनांतून सुटका करण्यात नादान ठरलेला हा असंगतीने व विकृतीने पछाडलेला बॅरिस्टर अखेरीस पूर्णपणे वेडा होतो. बॅरिस्टर म्हणजे 'eatholic at home' आणि 'protestant abroad' अशी विसंगती. 'घरी सनातनी बाहेर सुधारक' मनाला चटका देणारे, विचार करायला प्रवृत्त करणारे हे नाटक लोकप्रिय होऊ शकले नाही; पण या व्यक्तिरेखेला एक खोली आहे.

मानवी जीवनातील गूढ आणि तितकेच गहिरे अंधारे मन मानसशास्त्राच्या निकषांवर घासून पाहणे जमणारे नसते. मानसशास्त्र समोर ठेवून नाटककार लिहीत नसतो हेही खरे. नाटक ही कलाकृती आहे असे आपण मानतो. अनुभूतीतून जाणवलेले सत्य मानसशास्त्राच्या कक्षेत सामावणारे नसते, ते गूढच राहात असते; परंतु अशा नाटकाचे विश्लेषण करून त्यातील मनाचे गहिरे रंग तपासता मात्र येतात हेही खरे आहे.


महासागर - या नाटकात मनाचे हे गहिरे रंग अनेक पात्रांच्या माध्यमातून दळवींनी भरलेले आहेत. मनाच्या अथांगतेचा शोध 'चंपू', दिगंबर, वसंता, सुमी, काटदरे पती-पत्नी आणि बच्चू (नातीगोती) इत्यादी पात्रांतून दळवींनी घेतला आहे.

मानवी मनाच्या अपूर्णांकातून मानवी जीवनातील पूर्णांकाचा हा शोध होय. (Sex-morbidity) अतृप्त वासनेची भूक यांचा शोध दळवींनी अखेरपर्यंत घेतला आणि रंगभूमीवर सुजाणपणे ते पाहणाऱ्या प्रेक्षकांना अस्वस्थ करीत राहिले असे मला वाटते. या नाटकात दळवींनी एक नवा प्रयोग केला. एकाच माणसाच्या प्रकट-अप्रकट मनातील संघर्ष संवादांतून इतर पात्रांच्या समोर मांडण्याची त्यांची शैली पाहता ओनिलच्या The strange Internde या आणि आर्थर मिलरच्या The death of a salesman या नाटकाची आठवण मला होते.

याच संदर्भात 'सविता दामोदर परांजपे', 'बाधा', 'ध्यानीमनी', 'गार्बो', 'एका मित्राची गोष्ट' इत्यादी नाटकांचा निर्देश करून हा अस्वस्थ रंगभूमीचा पूर्वरंग संपवितो.

• • •

अनुक्रमणिका



। लेख

गीतारत्नप्रासाद

अशोक राणा

मराठी भाषेच्या प्रारंभकाळात निर्माण झालेल्या साहित्यकृतींमध्ये ज्ञानेश्वरीचे स्थान अव्वल दर्जाचे आहे, यात शंका नाही. ज्ञानदेवांची लालित्यपूर्ण भाषा व गीतेचे सुबोध तत्त्वज्ञान या दोन्ही वाङ्मयसरितांचा सुरेख संगम ज्ञानेश्वरीत झालेला आहे. भावार्थदीपिका म्हणून प्रचलित असलेल्या या ग्रंथास नामदेवांनी 'ज्ञानदेवी' म्हणून संबोधले तर एकनाथांनी याचा उल्लेख 'ज्ञानेश्वरी' असा केला. नाथांचे ज्ञानेश्वरीच्या पाठशुद्धीत मोलाचे योगदान आहे, म्हणून असेल कदाचित; त्यांनी वापरलेला शब्द अधिक अधिक मान्यता पावला. अन्यथा स्वतःच्या नावाने ग्रंथ ओळखला जावा या अहंमन्यतेचा लवलेशही नसलेल्या ज्ञानेश्वरांवर तसा आरोप होणे स्वाभाविक होते.

मूळ भावार्थदीपिकेवर त्यामधील आशयाशी प्रामाणिक न राहण्याचा आरोप करीत वामन पंडिताने 'यथार्थदीपिका' ही गीतेवरील समश्लोकी निर्माण केली. गीता ही आद्यशंकराचार्यांपासून तो विनोबा भाव्यांपर्यंतच्या कित्येक तत्त्वचिंतकांसाठी एका अनामिक आकर्षणाची गोष्ट राहिली आहे. ज्ञानदेवांनी मूळ आशयाला धक्का न लावता व क्वचित प्रसंगी कलावंताला आवश्यक असलेले स्वातंत्र्य घेऊन यथार्थदीपिकेची निर्मिती केली. ही निर्मिती अभिव्यक्तिस्वातंत्र्याची इतकी बूज राखणारी आहे, की बरेचदा वाटू लागते की तिचा मूळ गीतेशी काहीएक संबंध नाही, तर तत्त्वज्ञानाच्या पायावर आधारलेली देशी भाषेतील विविध वैशिष्ट्यांचा बाज घेऊन सजलेली स्वतंत्र कलाकृतीच आहे. म्हणूनच कदाचित गीतेच्या भावार्थाची बांधिलकी सोडून तिला नामदेवांनी ज्ञानदेवी व एकनाथांनी ज्ञानेश्वरी का म्हटले असावे या गोष्टीचा उलगडा होतो व ही नावेच खऱ्या अर्थाने या काव्यग्रंथास सार्थक आहेत, असे वाटू लागते.

गीतारत्नप्रासादाचे रूपक :

ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांच्या विलक्षण नवनिर्मितिक्षम प्रतिभेची अपत्ये शोभावीत अशी कितीतरी स्थळे आहेत. उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टांतादी वाङ्मयीन अलंकारांची रेलचेल असलेल्या या अद्वितीय ग्रंथातील एक असेच स्थळ आहे, गीतारत्नप्रासादाचे. या रूपकामधून ज्ञानदेवांनी गीतेचे वैभवी वर्णन केलेले आहे. गीतारूपी रत्नखचित प्रासादाची वैशिष्ट्ये सांगण्याच्या भरात रंगून गेलेल्या ज्ञानदेवांनी भल्या-भल्यांना बुचकळ्यात टाकले आहे. हे रूपक त्यांनी कोणत्या वास्तुशिल्पाला समोर ठेवून केले आहे हा त्या सर्वांना बुचकळ्यात टाकणारा प्रश्न. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यापूर्वी हे रूपक कसे व कोणत्या संदर्भात आलेले आहे हे पाहिले पाहिजे.

अनुक्रमणिका

गीतेचा अठरावा अध्याय म्हणजे गीतारूपी रत्नप्रासादावर चढविलेला कळस होय, हे गृहीतक स्वीकारून या रूपकाची उभारणी करण्यात आलेली आहे. म्हणूनच त्यांनी या अध्यायाला कळसाध्याय असे म्हटलेले आहे. या रूपकास सुरुवात करणाऱ्या ओवी क्र. ३० मध्ये ज्ञानदेव म्हणतात :

जी गीतारत्नप्रासादाचा । कळशु अर्थचिंतामणिचा।
सर्व गीतादर्शनाचा । पाढावो जो ।।३०।।

अठरावा अध्याय म्हणजे गीतारूपी रत्नप्रासादाचा अर्थरूपी चिंतामणीने मढवलेला कळस आहे. त्याचबरोबर संपूर्ण गीतेचे एका दृष्टिक्षेपात आकलन व्हावे, असा मार्गदर्शकही आहे; अशा शब्दांमध्ये या अध्यायाचा गौरव करून आपण 'कळस' हा शब्द का वापरला याचे स्पष्टीकरण ते देतात. ज्ञानदेव म्हणतात, की देवालयाचा कळस दुरून दिसला की भाविक भक्त त्याला वंदन करतात. कारण की कळसाच्या दर्शनानेच मंदिरामधील देवतेचे दर्शन झाल्याचे समाधान त्याला मिळते. त्याचप्रमाणे या एकाच अध्यायाचे वाचन केल्याने संपूर्ण गीताशास्त्र अभ्यासल्याचे श्रेय मिळते.

प्रासाद म्हणजे राजवाडा. पण कळस व कळसाच्या दर्शनाने देवाचे दर्शन झाल्याचे समाधान हे संदर्भ मंदिराचे आहेत. अर्थात प्रासाद हा शब्द या ठिकाणी मंदिरास उद्देशून वापरला आहे, हे स्पष्ट आहे. म्हणून हे गीतारूपी रत्नखचित मंदिराचे रूपक आहे, असे म्हणावे लागेल. या रूपकाच्या उभारणीत रंगलेल्या ज्ञानदेवांनी ओवी क्र. ३३ मध्ये बादरायण व्यासांनी गीतारूपी मंदिरावर हा कळस चढविला आहे व यातून गीतेची निर्मिती पूर्ण झाल्याचा संकेत मिळतो असे मतही नोंदविलेले आहे. याठिकाणी जाणता-अजाणता ज्ञानियाच्या राजाने केलेला बादरायण व्यासाचा उल्लेख संभ्रमात टाकणारा आहे. तो कसा ते आपण आता पुढे पाहू या.

बादरायण व्यास आणि महाभारतकार व्यास :


ज्ञानेश्वरांनी ओघाओघात बादरायण व्यासांचा महाभारतकार म्हणून केलेला उल्लेख कितपत ऐतिहासिकदृष्ट्या तथ्यावर आधारित आहे याची पडताळणी अलीकडील ज्ञानेश्वरीचे संशोधक अरविंद मंगरूळकर व वि. मो. केळकर यांनी केलेली आहे. या दोन अभ्यासकांनी 'ज्ञानदेवी' या त्रिखंडात्मक ग्रंथाचे संपादन केले. मुंबई विद्यापीठाने १९९४ मध्ये प्रकाशित केलेल्या या ग्रंथाच्या तिसऱ्या खंडामध्ये पृष्ठ १८११ वर ज्ञानदेवांच्या वरील संदर्भातील उल्लेखावर टिपण लिहिलेले आहे. त्यात ते म्हणतात, महाभारतकार व्यास अथवा महाभारतान्तर्गत गीताकार व्यास हे वेगळे आणि ब्रह्मसूत्रकार व्यास हे वेगळे... ह्या दोन्ही रचनांचे कालही एकमेकांपासून कैक शतके दुरावलेले असे भिन्न आहेत. 'व्यास' ह्या सर्वसामान्य नावामुळे हा संभ्रम झालेला आहे. महाभारतकार व्यास हेच पाराशर अथवा द्वैपायन व्यास होत. पराशरापासून त्यांचा जन्म झाला म्हणून ते 'पाराशर' आणि यमुनेमधील एका द्वीपामध्ये जन्म म्हणून 'द्वैपायन.' परंतु त्यांनीच ब्रह्मसूत्रांचीही रचना केली, हे म्हणणे असंयुक्तिक आहे. ब्रह्मसूत्रांची रचना करणारे ते 'बादरायण' व्यास. हा व्यासासंबंधीचा संभ्रम अनेक विद्वानांमध्ये वर्षानुवर्षे चालू आहे. ज्ञानेश्वरही त्याला अपवाद नाहीत. एवढेच या ठिकाणी नमूद करून गीतारत्नप्रासादाच्या रूपकातील आशयाचा उलगडा करण्याचा प्रयत्न करू या.

गीतारत्नप्रासादाची रचना :

गीतेवर रत्नप्रासादाचे केलेल रूपक हे सांगरूपक आहे. त्यात महर्षी व्यास म्हणजेच महाभारताचे कर्ते द्वैपायन व्यास यांनी या रत्नप्रासादाची रूपरेषा तयार केली व आखणीही केली असे म्हटलेले आहे. व्यासांनी निगम म्हणजे वेदरूपी रत्नाच्या डोंगरावर या मंदिराची योजना करून उपनिषदरूपी माळभूमी म्हणजे पठारावर त्याची आखणी व खोदकाम केले असा उल्लेख आहे. त्या ठिकाणी धर्म, अर्थ, काम ह्या तीन पुरुषार्थांच्या लहानमोठ्या दगडधोंड्यांपासून महाभारतरूपी कोट तयार झाला. या तटबंदीच्या मधोमध आत्मज्ञानरूपी एकजिनसी चिरा तासून कृष्णार्जुन संवादाच्या कौशल्याने त्याला उत्तमरूप दिले. निवृत्तिनाथरूपी ओळंब्याने सर्व शास्त्रांच्या साह्याने योजनापूर्वक मोक्षरूपी दोरीचा आकार जमविला. अशारीतीने एकेका माळ्याची रचना करीत पंधरा अध्याय म्हणजे पंधरा माळे तयार झाल्यावर प्रासाद पूर्णत्वास आला. यानंतरचा सोळावा अध्याय म्हणजे गळमण्याचा घाट (ग्रीवघंटेचा) तर सतरावा म्हणजे कळसाच्या बैठकीचे ठिकाण. अर्थातच, अठरावा अध्याय कळस होऊन त्यावर स्थिरावला. ग्रंथाची पूर्तता झाल्यावर त्याचा निर्माता व्यास हा ध्वज फडकू लागला.

गीतारत्नप्रासादाचे रूपक कशावरून बेतले ? :

ज्ञानेश्वरांनी गीतारत्नप्रासादाचे रूपक कशावरून बेतले असावे, याविषयी बऱ्याच अभ्यासकांनी खल केलेला आहे. प्राचीन साहित्य व संस्कृतीचे थोर अभ्यासक डॉ. रा. चिं. ढेरे यांनी याविषयी लिहिले आहे की, ''ज्ञानदेवांचा गीताप्रासाद हा बांधीव (Built up) आहे या गैरसमजुतीवरच आजवरचे अर्थ लावण्याचे प्रयत्न झाले त्यामुळे आत्मज्ञानाचे एकवट दलवाडे 'चोखट झाडून घडिले' या ज्ञानदेवांच्या निःसंदिग्ध शब्दांकडे विद्वानांनी दुर्लक्ष केले. या रत्नप्रासादाच्या उभारणीसाठी वापरण्यात आलेले प्रासाद, सूत्री, प्राकार, सूत्र, सोडवणी, पुरवणी, मांडणी, रेखा, भूमी, ग्रीवा, घंटा, पडिधाणी, आव, आय, कलश आणि ध्वज हे भारतीय स्थापत्यशास्त्रातील पारिभाषिक शब्द असून त्यापैकी सोडवणी, पुरवणी, मांडणी, आव आणि पडिघाणी या संज्ञा देशी आहेत.'' या विधानाच्या पुष्ट्यर्थ डॉ. ढेरे यांनी प्रभाशंकर ओवडभाई सोमपुरा यांच्या 'क्षीरार्णव' आणि 'प्रासादमंजिरी' या ग्रंथांचे आधारही दिले आहेत. यावरून या प्रासादासाठी वापरलेल्या स्थापत्यशास्त्रातील पारिभाषिक संज्ञांवरून ज्ञानदेवांना स्थापत्यशास्त्राचे सूक्ष्म ज्ञान होते हे स्पष्ट होते.



ज्ञानेश्वरांनी या गीतारूपी प्रासादाला 'रत्नप्रासाद' म्हटले आहे. त्याचप्रमाणे त्याच्या निर्मितीकरिता सूत्रधार व्यासांनी उपनिषदरूपी खडक फोडून त्याची उभारणी केली असे म्हटले आहे. या ठिकाणी डॉ. ढेरे यांनी अखंड खडक वरून खाली फोडण्याचीही क्रिया 'आधी कळस मग पाया' अशा स्वरूपाची आहे असे मत नोंदविले आहे. या वर्णनात 'आत्मेया श्रीहरी'ला उराउरी आलिंगन देणाऱ्या भाविकांचा जो उल्लेख आहे, त्यावरून ज्ञानदेवांच्या दृष्टीपुढे पंढरपूरचे विठ्ठल मंदिर होते, असे ग. कृ. आगाशे यांनी म्हटलेले आहे. त्यांच्या या मताविषयी मतभेद व्यक्त करताना डॉ. ढेरे म्हणतात की, ''ज्ञानदेवांचे हे प्रासादरूपक कोणत्याही बांधीव (Built up) मंदिराला लागू पडत नसून ते एकात्म कोरीव मंदिरालाच (carred monolithic Temple) लागू पडते.'' आपले हे मत नोंदविताना त्यांनी 'कथाकल्पतरू' मधील (२.१५) कैलास लेण्याच्या निर्मितीच्या पारंपरिक कथेचा आधार घेतलेला आहे. डॉ. ढेरे यांचे हे मत बऱ्याच विद्वानांनी डोळे झाकून स्वीकारले आहे. डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्यासारख्या समीक्षकांनीही फारशी चिकित्सा न करता ते स्वीकारलेले आढळते.''

कैलास लेणे की बांधीव देवालय ? :

डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'ज्ञानदेवांचा गीतारत्नप्रासाद' हा आपला लेख लिहून आपले मत ठामपणे मांडले व महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत एप्रिल ते सप्टेंबर १९७५ या श्री ज्ञानेश्वर विशेषांकात ते प्रसिद्धही झाले. डॉ. ढेरे यांच्या ''वास्तुकृतीचे हे रूप डोंगरात वरून खाली कोरून काढिलेल्या वेरूळच्या शिल्पाचे असावे'' या मताचा परामर्श वि. मो. केळकर व अरविंद मंगरूळकर यांनी घेतला. ते म्हणतात की, 'वेरूळचे शिल्प कैलास लेणे हे ज्ञानदेवांच्या कैक शतके अगोदरचे आहे, ही गोष्ट खरी; परंतु कोरून काढिलेली अशीच शिल्पाकृती त्यांच्या मनापुढे येथे आहे, असे म्हणण्याला (प्रबल) आधार नाही. उलट बांधून काढिलेल्या देवालयाचीच शिल्पाकृती त्यांच्या मनात खेळत असावी, असे वाटते. मातीला खणती लावून भूमी सपाट करणे, अठरावा अध्याय हा शेवटचा अध्याय म्हणून तो कळस, असे ते म्हणतात. तेव्हा हे ध्यानी घ्यावयास पाहिजे की कळस हा देवालयावर सर्वांत शेवटी समारंभाने चढविला जातो. वेरूळच्या लेण्याच्या बाबतीत तर अगदीच उलट 'आधी कळस मग पाया' अशी स्थिती आहे. ह्या ओव्यांमध्ये ज्ञानदेव आवर्जून म्हणतात की, अठराव्या अध्यायाच्या रूपाने कळस चढविल्यावर 'संपलेपणे प्रासादि कलशा परौते काम नाही' (ओवी ३४)। ह्याच्यानंतर काही कामच उरत नाही. ३७ व्या ओवीत 'चिरा घडवून' काढण्याचाही उल्लेख आहे. ३९ मध्ये 'पंधरा मळे' तयार केले म्हणजे बांधून काढले, असे म्हटले आहे. ४० मध्ये 'ग्रीवा', 'कळसाची बैठक' ह्यांचा निर्देश आहे. ४१ मध्ये कळसावर 'ध्वज'

लाविल्याचा निर्देश आहे. ४२ मध्ये 'चढत्या मजल्यांचे आकार' उल्लेखिलेले आहेत. ४७ मध्ये गीताप्रासादाला 'मोक्षप्रासाद' म्हटले आहे. ४८ मध्ये 'गीता वैष्णवप्रासाद' आहे, असे म्हटले आहे. आणि कैलास हे तर स्पष्ट शिवार्पण केलेले लेणे आहे. ह्या सर्व निर्देशांवरून हे स्पष्ट आहे की, येथला गीतारत्नप्रासादाचा निर्देश कैलास हे कोरीव लेणे मनात ठेवून केलेला नाही आणि कोरून काढिलेल्या डोंगराचाही येथे संबंध नाही, तर बांधून काढिलेल्या देवालयाचेच रूप ज्ञानेश्वरांच्या दृष्टीसमोर आहे.''

या ठिकाणी केळकर-मंगरूळकरांनी चिकित्सक दृष्टीने डॉ. ढेरे यांचे मत खोडून काढले आहे. परंतु ज्ञानदेवांना अभिप्रेत गीतारत्नप्रासाद नेमका कोणत्या बांधीव देवालयावरून सुचला याविषयी कोणताही संकेत दिलेला नाही. ग. कृ. आगाशे यांनी वारकरी संप्रदायातील भाविकांच्या उराउरी भेटण्याच्या परंपरेवरून पंढरपूरचे विठ्ठलमंदिर ज्ञानेश्वरांच्या डोळ्यांपुढे असावे असे म्हटले होते. पण गीतारत्नप्रासाद हा वेद रत्नांचलावर उभारला असल्याच्या संदर्भाचा त्यांना विसर पडला होता. अर्थात एखाद्या उंच व या रत्नासारख्या चमकणाऱ्या पर्वताचे दृश्य ज्ञानेश्वरांपुढे असावे. या दृष्टीने पाहिल्यास ११ व्या ते १३ व्या शतकादरम्यान अबूच्या पहाडावर बांधलेली जैन मंदिरे त्यांच्या डोळ्यांपुढे असावीत असे मला वाटते. ते का हे आपण आता पाहूया.

माउंट अबूची मंदिरे व रत्नप्रासाद :

मध्यप्रदेश व राजस्थानच्या सीमेवरील अबूच्या पहाडात संगमरवरी दगडामध्ये कोरून बांधलेली जैनपंथीयांची मंदिरे सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या रत्नासारखीच आहेत. या मंदिरांना पाहूनच ज्ञानेश्वरांना रत्नप्रासादाची कल्पना सुचली असावी. उत्तर भारताकडील तीर्थयात्रेच्या मिषाने नामदेवांसोबत ज्ञानेश्वर अबू पहाडाकडे गेले असावेत. तेथील विलोभनीय निसर्ग व अद्वितीय असे कोरीव काम पाहून असे मंदिर हिंदू परंपरेतही असावे, असे त्यांना वाटणे स्वाभाविक आहे. आपली ही सुप्त इच्छा त्यांनी गीता रत्नप्रासादाच्या रूपकामध्ये पूर्ण केली असावी असे म्हणण्याइतके सामर्थ्य या मंदिराच्या रचनेत आहे. ही मंदिरे शुभ्र संगमरवरी दगडांची व उंच चौथाऱ्यावर बांधलेली आहेत. ह्या मंदिरांची शिखरे व खजुराहो येथील कंदारीय महादेव मंदिरांची शिखरे ह्यात रचनेच्या दृष्टीने बरेच साम्य आहे. मंदिरांच्या सभोवती उंच भिंतींची तटबंदी आहे. महाभारतरूपी प्रकाराची कल्पना तटबंदीवरून ज्ञानेश्वरांना सुचवली असावी. मंदिरांच्या घुमटाच्या अवतीभवती उभारलेली घुमटे जणू काय पंधरा अध्याय आहेत व त्यावरील गळमणी म्हणजेच आमलक हा सतरावा अध्याय. आमलक व घुमटाच्या मधोमधी जी ग्रीवा आहे तो सोळावा अध्याय. अशी या रूपकाची योजना दिसते. संपूर्ण भारतामध्ये कोरीव कामाच्या शिल्पांचा उच्चांक व मुबलक प्रमाणात संगमरवरी दगडाचा केलेला वापर, या दृष्टीने अबूची मंदिरे अद्वितीय आहेत. त्यांना पाहूनच ज्ञानेश्वरांना रत्नप्रासादाची कल्पना सुचली असावी, असे मला वाटते. कदाचित या मंदिराची रचना चालू असताना ज्ञानदेवांनी ही मंदिरे पाहिली असल्याचीही शक्यता आहे. तर-बुध म्हणजे ज्ञानाचा डोंगर यापासून अर्बुद हा शब्द बनला आहे. त्याचेच रूपांतर अबू असे झाले. ज्ञानाच्या देवाला-ज्ञानदेवाला ते भावले.

आक्षेपाची शक्यता व निरसन :

या शोधनिबंधाच्या निमित्ताने प्रस्तुत लेखकाने डॉ. रा. चिं. ढेरे व डॉ. द. भि. कुळकर्णी यांसारख्या ज्येष्ठ संशोधकांच्या निरीक्षणावर घेतलेले आक्षेप अनधिकारचेष्टा वाटू शकेल. तसे वाटणे स्वाभाविकही आहे. परंतु आपल्या पूर्वसूरींच्या निरीक्षणातून सुटलेल्या बाबी त्यानंतरच्या अभ्यासकांनी ध्यानात आणून देणे काही गैर नाही असे प्रस्तुत लेखकास वाटते. नम्रतेचा हिमगिरी अशा ज्ञानदेवांच्या नवनिर्मितिक्षम प्रतिभेचे आकलन करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. त्यात कुठेही आढ्यता वा अहंकार नाही. ही प्रस्तुत लेखकाची नम्र भूमिका कृपया समजून घ्यावी ही विनंती.


वरील आक्षेपापेक्षाही ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आक्षेप या अनुमानावर घेतला जाऊ शकतो व तो म्हणजे ज्ञानेश्वरीच्या लेखनानंतरच नामदेवांनी ज्ञानेश्वरांना तीर्थयात्रेला नेले असे तीर्थावळीच्या अभंगांमध्ये म्हटलेले आहे. ते आपण स्वीकारले तर अबूच्या मंदिरांवरून गीतारत्नप्रासादाचे रूपक ज्ञानदेवांना सुचले हे मानीव (Hypothesis) आपोआपच कोलमडते.

तीर्थावळीचे अभंग नामदेवांनी लिहिले की नाहीत, तसेच त्यामधील तपशील कितपत खरा वा खोटा

याविषयी अभ्यासकांमध्येही मतभेद आहेत. म्हणून केवळ या अभंगातील तपशिलाच्या आधारे वरील मानीव नाकारणे अनैतिहासिक ठरेल. तूर्त एवढेच या ठिकाणी नोंदवितो की, ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतील नवनिर्मितीचा गंभीर विचार करताना अबू मंदिरांच्या स्थापत्यशैलीचा व गीतारत्नप्रासादाच्या रूपकाचा संबंध यापुढील अभ्यासकांच्या विषयकक्षेत चर्चेसाठी घेतला जावा. ग. कृ. आगाशे यांचे यासंबंधीचे गृहीतक कसे तर्कशुद्ध नाही असे डॉ. रा. चिं. ढेरे यांना वाटते तसेच त्यांचेही गृहीतक अयोग्य आहे हे वि. मो. केळकर व अरविंद मंगरूळकर यांनी पटवून दिले आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत निबंधकाराचे विवेचन विचारात घ्यावे एवढीच नम्र अपेक्षा आहे.

• • •

अनुक्रमणिका



। लेख

उत्तर-आधुनिक

काय डेंजर वारा सुटलाय :

वर्तमान महानगरी वास्तवाचे उत्तर-आधुनिक दर्शन

▫ डॉ. देवानंद सोनटक्के

'**काय** डेंजर वारा सुटलाय' हे नाटककार जयंत पवार यांचे एक अप्रतिम नाटक आहे. नव्वदनंतरचे महानगरी जीवन, जागतिकीकरणाच्या लाटेत सामान्य माणसाची झालेली कोंडी, भांडवलशाहीत पैशाच्या मागे जाणाऱ्या सर्व व्यवस्था, खाजगीकरण, उदारीकरणामुळे हतबल झालेली लोकशाही, सामान्य माणसाला वजा करून बिल्डर, राजकारणी आणि पोलीस यांच्या कह्यात गेलेल्या संरक्षण, न्याय, राजकारण, आरोग्य इत्यादी व्यवस्था आणि न्याय, नैतिकता, समता, हक्क, कर्तव्य, कायद्याचे राज्य या मूल्यांच्या जपणुकीबाबत समाजाची उदासीनता असे समकालीन वास्तव हे नाटक मांडत जाते. या अर्थाने १९९० नंतरचा उत्तर-आधुनिक समाज, त्याचे जगणे आणि त्याची संस्कृति-मूल्ये यांचे संदर्भच कसे बदलले आहेत, ते हे नाटक अधोरखित करते. महानगरी जीवनातील सामान्य माणसाचे अस्वस्थ वर्तमान आणि असुरक्षित जगणे समोर आणते; आणि आजच्या राजकीय, सामाजिक व्यवस्थेचा बुरखाही फाडते.

सत्यविजय नरहरी दाभाडे हे मुंबईतील कुसुमकुंज बिल्डिंगमधील एका फ्लॅटमध्ये राहणारे मध्यमवर्गीय, सज्जन, पापभिरू, प्रामाणिक व कुटुंबवत्सल गृहस्थ, शिक्षिकेच्या पेशातून सेवानिवृत्ती घेतलेली, शुगर आणि बी.पी.ची पेशंट असलेली त्यांची बायको; टीव्ही सिरीयलचे आकर्षण असलेला तरुण मुलगा बंटी; आणि एमबीएची पूर्वतयारी करणारी आणि एका तरुणाच्या प्रेमात पडलेली मुलगी यांसह ते या इमारतीत गेली तीस वर्षे राहात आहेत. दाभाडे सेफ इंडिया इन्शुरंसमध्ये ऑफिसर आहेत. कीर्तनकार वडिलांच्या पोटी जन्मलेल्या दाभाडे यांचा सांभाळ त्यांचे आईवडील लहानपणीच गेल्यामुळे इंदूरच्या कीर्तनकार काकांनीच केला. त्यामुळे कीर्तनकाराचा गप्पीष्टपणा आणि शुचिता त्यांच्या बोलण्या-वागण्यात आहे.

कुणाच्या अध्यातमध्यात नसणाऱ्या या सज्जन कुटुंबाच्या फ्लॅटवर बिल्डरची नजर पडते. त्यांच्या बेडरूमला सी-फेस असल्यामुळे त्याची वाट्टेल ती किंमत मोजायला तो तयार आहे. मात्र आपल्या प्रेमाचा साक्षी असलेला, मुंबईत आल्यावर जवळ घेणारा आणि त्यांच्या खिडकीतून दिसणारा हा समुद्र भाबड्या दाभाड्यांना आपला वाटतो, तर त्यांच्या पत्नीला तो हिंस्र सिंहासारखा आयाळ पसरलेला वाटतो. हा समुद्रच आता त्यांच्या मुळावर येतो. बिल्डरच्या मुलाला तो सी-फेस असलेलाच फ्लॅट हवा आहे. तीस वर्षांपासून राहात असलेल्या घराशी भावनिक बंध जुळलेले असल्यामुळे दाभाड्यांना मात्र तो विकायचा नाही. पैशाने दाभाडे बधत नाही हे पाहून बिल्डर दुसरा मार्ग वापरतो.


एका पहाटे एक वृद्ध जोडपे लिमयांचे घर विचारत दाभाडे यांच्या घरात शिरते. त्यांचा टॅक्सी ड्रायव्हर बिलाच्या पैशावरून वाद उकरून काढतो. दाभाडे मध्ये पडतात तेव्हा त्यांनाच घेरतात. ते

अनुक्रमणिका

प्रवासी नसून बिल्डरने पाठवलेले घुसखोर असतात. ते घर खाली करण्यासाठी दम देतात. दाभाडे पोलिसांना फोन करतात. पण तेही आधी टाळाटाळ करतात, उशिरा पोचतात. तोपर्यंत दाभाडे यांच्या घराचा पूर्ण ताबा घेतला जातो. पुढे घडणाऱ्या अनेक घटनांतून लोकशाहीतील पोलीस, न्याय, संरक्षण, वैद्यक, प्रशासन, राजकीय व सामाजिक व्यवस्थांचा फोलपणा नाटककार आपल्यासमोर मांडत जातो.

दाभाडेंचा फ्लॅट मुळात त्यांच्या परदेशातील काकांचा आहे. त्यांच्याकडून काही लेखी कागदपत्र त्यांनी तयार करून घेतलेले नाही. फक्त सोसायटीच्या मेंटेनन्सच्या पावत्या त्यांच्याकडे असतात, त्याही ज्या टेबलाच्या ड्रॉवरमध्ये आहेत, त्यावर घुसखोरांनी सर्व सामान रचून ठेवलेले असते. उलट काकांनी फ्लॅट विकल्याचे कागदपत्र घुसखोरांजवळ असतात. त्यामुळे आतली खोली घुसखोरांना, बाहेरची दाभाडे यांना, तर संडास बाथरूम तासांच्या हिशेबाने कॉमन अशी घराची विभागणी करून इन्स्पेक्टर निघून जातो.

बिल्डर दडपशाहीने त्यांच्या आजूबाजूचे फ्लॅट आधीच बळकावतो. त्यामुळे शेजारी दाभाड्यांना मदत करत नाहीत. सोसायटीचे सेक्रेटरी बाजी प्रभाकर देशपांडे त्यांच्या मदतीला येतात. ते दाभाड्यांना मुख्यमंत्र्यांकडे घेऊन जातात, तर मुख्यमंत्रीच हतबल असतात. ते म्हणतात, "शेवटी माणसाला किती जागा लागते? साडेतीन हात. आजच्या तारखेला तुम्हाला एक रूम आणि बाथरूम या शहरात मिळत असेल तर सफिशंट आहे... विकासदर दहा टक्क्यांवर न्यायचाच... (यासाठी) दाभाडे तुम्ही मला हवे आहात." (पृ. ५९-६०)



या साऱ्यांमुळे वैतागून दाभाडे आपल्या लोकशाही व्यवस्थेवरच चिडतात. ते म्हणतात, "नष्ट करून टाका ती लोकशाही. ज्याला हवं ते करायची मुभा देते लोकशाही. गोंधळ घालते. मग त्यात सुमार लोकांना महत्त्व येतं आणि हुशार लोकांचा अपमान होतो... लोकशाहीतल्या निवडणुका म्हणजे मिडीऑक्रिसीचा धुडगूस... राज्यक्रांती झाली. मध्यमवर्गाला सत्तेत वाटा मिळाला. संपली क्रांती... गरिबांना स्वातंत्र्य नाही. गरिबांना समता नाही. गरिबांशी बंधुभाव? शक्यच नाही. असा आप्पलपोटा मध्यमवर्ग बरोबर घेऊन जीडीपी दहा टक्के करायचाय आपल्याला?" (पृ. ६०)

जागतिकीकरणात लोकशाहीचे स्वरूप व सामान्यांना प्राप्त होणारे बकालपण ह्यावर कडवट भाष्य या संवादात येते. विकासाच्या व्याख्येबद्दलच इथे प्रश्न उपस्थित केला जात आहे. दाभाडे आधुनिक लोकशाहीची तत्त्वे आणि प्रत्यक्ष लोकशाहीचे स्वरूप यांची विसंगतीही दाखवून देतात आणि आधुनिकतेची उलट तपासणी घेतात. हे नाटक जागतिकीकरण आणि सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्था यांवर उत्तर-आधुनिक भाष्य करते.

आधुनिकतेने समोर आणलेल्या तत्त्वज्ञानाच्या मर्यादा दाखवत नाटककार उत्तर-आधुनिक मांडणी करू पाहतात. दाभाडे म्हणतात, पूर, भूकंप याप्रमाणेच मर्डर, रायटस ह्यादेखील नैसर्गिक आपत्तीच आहेत. जेव्हा बंटी अमेरिकेतील ९/११ चा दहशतवादी हल्ला निसर्गानेच घडवला का, असा उलट प्रश्न विचारतो तेव्हा दाभाडे त्या कृतीची भावनाच कशी मूलभूत आहे ते सांगतात.

जीवशास्त्र, उत्क्रांती व मनोविज्ञान यांच्या आधारे आधुनिक ज्ञान-संकल्पनाही दाभाडे नाकारत जातात. भालचंद्र नेमाडे जसे उपरोधाच्या पातळीवर आपल्या कादंबऱ्यांत उत्क्रांती, मनोविज्ञान व पुरातत्वशास्त्र नाकारतात व मानववंशशास्त्राच्या आधारे मानवी वर्तन व संस्कृतीचा शोध घेऊ पाहतात; तसेच जयंत पवारही मानवी वर्तन व संस्कृतीकडे मानववंशशास्त्राच्या नजरेतून पाहतात. दाभाडे म्हणतात, "तत्त्वज्ञानाचा जन्म भीतीतून होतो. त्यामुळे ज्याला मरणाची भीती वाटते त्याला मी तत्त्वज्ञान ऐकवतो." (पृ. ११) इथे तत्त्वज्ञानाच्या

निर्मितीमागचे कारण सांगत, आपल्या संत परंपरेतील दया, क्षमा या मूल्यांचीही तपासणी केली जाते. दाभाडे म्हणतात, ''दयामाया खरी नव्हेच. क्रोध, हिंसा, लढाया ह्याच खऱ्या. राग, लोभ, हेवा, मत्सर ह्या उपयुक्त गोष्टी आहेत. दुष्टपणा उपयुक्त नसता तर माणसाच्या उत्क्रांतीत तो नष्ट झाला नसता? नित्शे तर म्हणतो, माणूस उत्क्रांत होत जाताना हा दुष्टपणाच कामी येणाराय त्याच्या.'' (पृ.६२) उत्क्रांतीतही माणसाच्या हिंस्रता, दुष्टपणा या आदिम भावना टिकून राहिल्या, त्या मानवी सांस्कृतिक विकासात नष्ट झाल्या नाहीत; कारण त्या उपयुक्त व मूलभूत आहेत, असे दाभाडे म्हणतात.

तेंडुलकर आणि एलकुंचवार हे नाटककार आपल्या नाटकांमधून हिंसा आणि लैंगिकता या मानवी भावनांचा शोध घेताना दिसतात. इथे जयंत पवारही हिंसा, क्रौर्य, घुसखोरी आणि आक्रमण या भावनांचे आदिमपण मानववंशशास्त्राच्या आधारे शोधू पाहात आहेत. दाभाडे म्हणतात, ''माणूस घुसखोराय. घुसखोरीचाच इतिहासाय सगळा. घुसखोरीशिवाय प्रगती नाही... आम्हाला विकास पाहिजे. सदैव सैनिका पुढेच जायचे. गा. रेड इंडियनांच्या कत्तली करणाऱ्या कोलंबसाचे गर्वगीत गा. मला भूक लागलीय खारे शेंगदाणे द्या.'' (पृ. ७२) इथे मानवी इतिहास आणि संस्कृती यावर भाष्य आहे. आधुनिकतेने औद्योगिक क्रांती म्हणजे हीच प्रगती असे सूत्र मांडले होते. त्याला उत्तर आधुनिकतेने छेद दिला आहे. म्हणूनच आदिवासींच्या, मूलनिवासींच्या कत्तली करून होणारा विकास उत्तर-आधुनिकतेला मान्य नाही. आधुनिकतेत सामान्य माणसाला अन्न तर राहोच, साधे शेंगदाणेही मिळत नाही, हे लेखक सांगू पाहतो आहे. आधुनिकतेचा पुरस्कार करणाऱ्या अनेक कवी-लेखकांना आधुनिकतेच्या मर्यादा जाणवल्या नव्हत्या, त्या उत्तर-आधुनिकतेमुळे पुढे आल्या आहेत.

बंटी जेव्हा लोकशाही मार्गाने फ्लॅट मिळत नाही तेव्हा राडा करून मिळवू म्हणतो, तेव्हा दाभाडे त्याला हा मार्ग आपला नाही असे सांगतात. बंटी म्हणतो, ''कधी उजाडणाराय पंधरा ऑगस्ट? इथे मुतायचं तरी आहे स्वातंत्र्य?'' इथे आधुनिकतेने प्रदान केलेल्या 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचीही तपासणी केली आहे. आधुनिकतेत मूठभरांना स्वातंत्र्य मिळते, समता व बंधुता तर गरिबांसाठी नाहीच, या आधुनिकतेच्या मर्यादा आहेत. तात्पर्य, उत्तर-आधुनिकता मूल्यांना कमी मानत नाही, तर तिचे लाभार्थी कोण व्हावेत याची परखड चर्चा करते.

भयामुळे दाभाडेंना थंडी वाजू लागते. तेव्हा त्यांना डॉक्टर थंडी वाजण्याचे दोन प्रकार सांगतात. 'होमोइरेक्टस आणि होमोसेपियन. काहींचे दात कटकट, तर काहींचे टकटक वाजतात.' (पृ. ५१) होमोसेपियन व होमोइरेक्टस ही मानवाची आदिम अवस्था होती. या अवस्थेतील मानव शिकार करत असे. आदिम मानवाच्या काळातील ही हिंसा आणि भयाची जाणीव उत्क्रांती व सांस्कृतिक विकासातही नष्ट झाली नाही. हा जाणिवांचा शोध मानववंशशास्त्रीय आहे. नेमाड्यांच्या 'हिंदू'मधील खंडेरावही, पुरातत्त्वशास्त्राच्या आधारे भौतिक संस्कृतीचा नव्हे तर तिच्यातील मानवी जाणिवांचा मानववंशशास्त्रीय शोध घेण्याचा आग्रह धरतो.

गुंड मुन्ना मारायची धमकी देतो तेव्हा दाभाडे म्हणतात, ''म्हातारे कोतारे, आजारीपाजारी, लुळेपांगळे, भेकड वातड, पापभिरू, व्हाईट सेल्सची ॲक्यूट डेफिशिअन्सी असणारे या साऱ्यांची यादी तयार होतेय. सामर्थ्यवान राहिले पाहिजेत. ताकदवानांचा वंश टिकला पाहिजे, तरच मानवाची प्रगती होणाराय. कमजोरांनी मरून जावं, असा फतवा निघणाराय.'' (पृ. ६३) जागतिकीकरणाच्या लाटेत सामर्थ्यवान टिकतो, दुबळा नष्ट होतो, यावर हे भाष्य आहे. आदिम जमातीतही दुर्बलांना मारले जात असे, ही जाणीव आजच्या काळातही टिकून आहे. याला धर्माचाही आधार आहे. दाभाडे सांगतात, ''दुबळ्या विस्थापितांनी बंड करून उठणं शास्त्रसंमत नाही. तसं झालंच तर सर्पसत्र आरंभून तक्षकागत त्यांना भस्मसात करण्याचा उपायही त्याच धर्मग्रंथात आहे... जगात दर दहा माणसांमागे एक बंदूक आहे आणि प्रत्येक माणसाला मारायला दोन गोळ्या अव्हेलेबल आहेत.' (पृ. ६५) सबलांचीच सत्ता टिकवायची व त्याविरुद्ध बोलणाऱ्याला संपवायचे याचे तत्त्वज्ञान प्राचीन काळापासून कसे रूढ आहे, ते महाभारताचा संदर्भ देऊन, त्याला वर्तमान उदारीकरणाशी जोडून नाटककाराने सांगितले आहे. इथे प्राचीन संस्कृती, इतिहास व महाकाव्य यांवर उत्तर-आधुनिक भाष्य केले आहे.

याच दृष्टीतून नाटककार भारतीय मध्यमवर्गीय माणसाचीही चिकित्सा करतो. मार्क्सने केलेल्या 'मध्यमवर्गीय बुर्झ्वा' या मांडणीपेक्षा वेगळा दृष्टिकोन

अनुक्रमणिका

इथे दिसतो. दाभाडे म्हणतात, ''माणूस समोर आला की तोंड भरून हसायचं आणि निरोप घेताना हात जोडायचे. जातीय तणाव व धार्मिक तेढ ह्यांबाबत न्युट्रल राहायचं. अंतर्यामी क्लीन असायचं आणि या देशाचा रिस्पेक्टेबल मिडलक्लास बनून जगायचं.'' (पृ. १२)

तीच वृत्ती मध्यमवर्गीय गृहिणीचीही. दाभाडेची बायको आपल्या आयुष्याबद्दल म्हणते, ''रोज रात्री अंथरुणं घालायची आणि सकाळी काढायची. धुणी भांडी करून जाणाऱ्या बाईवर डाफरत सकाळ, संध्याकाळ कुकर लावायचा नि टीव्हीवरच्या सिरियलीत कौटुंबिक सुखाची वाफ करून टाकायची... साधीसुधी शिक्षिका नव्हते, मुख्याध्यापिका झाले असते. कुठून बुद्धी झाली नि घराच्या शाळेची शिपाईण झाले.'' (पृ. १४) इथे वृत्तीबरोबरच निवेदन-संवाद यांची शैलीही लक्षात घेण्याजोगी आहे, जी उत्तरआधुनिक आहे. 'कौटुंबिक सुखाची वाफ' ही प्रतिमा आधीच्या' कुकर' प्रतिमेमुळे आली आहे.

अशी शैली अनेक संवादात दिसते. उदा. दाभाडेंची बायको म्हणते, ''आयुष्याचं भिरभिरं झालं. ओचे वर करून लंगडी घालण्याच्या वयात चष्मा लावला. पोक काढून तांदूळ वेचले. उसने आईबाप घेऊन सख्ख्या पोरांना जन्माला घातलं. उसनेही गेले, सख्खेही गेले. मास्तरीण बनून ओळी आखल्या नि प्रत्येक चौकोनात विम्याचे हप्ते भरले. पण ओंजळीत कसलाच विश्वास राहिला नाही.'' (पृ. ६२-६३) आपले आयुष्य कसे वाया गेले हे सांगण्यासाठी वापरलेली शैली अन्योन्य आहे. कौटुंबिक असला तरी हा संवाद मधुसूदन कालेलकर-दारव्हेकर यांच्या नाटकांसारखा भावनाप्रधान नाही; किंवा गडकरी-कुसुमाग्रज यांच्या नाटकांतील संवादासारखा शब्दशैलीप्रधान नाही; किंवा तेंडुलकर-एलकुंचवार यांच्या संवादासारखा निव्वळ वास्तववादी नाही. तर काव्यात्म आहे; पण रोमँटिक नाही. ही उत्तर-आधुनिक शैली आहे.

नाटकात व्यक्तिरेखांच्या तीन पातळ्या दिसतात. एक मध्यमवर्गीय दाभाडेची. दुसरी दाभाडेच्या बायकोची मध्यमवर्गीय स्त्रीची आणि येलमामे या गरीब माणसाची. हे तिघेही वेगवेगळ्या प्रश्नांचे प्रतिनिधित्व करताहेत. उत्तर-आधुनिक काळात सुखवस्तू, प्रामाणिक, मध्यमवर्गीय माणसाचेही काही खरे नाही, हे दाभाड्यांच्या व्यक्तिरेखेतून कळते. इतरांचे लाईफ सिक्युअर करणाराच इनसिक्युअर होतो. तीच गोष्ट कशाळकर, पुसाळकर आदी निवृत्तांची. काहींनी पॉलिसी काढल्या तर त्या मॅच्युअर झाल्यावर त्यांच्या मुलांनी पैसे हडप केले. मुले परदेशात असल्यामुळे एकट्यादुकट्या वृद्धाची गळा दाबून हत्या होण्याची भीती. त्यामुळे या माणसाना आता कशाची हमी नकोय, अशी आयुष्य असुरक्षित झाल्याची वेदना नाटकातून येते. आर्थिक उदारीकरणाच्या जगात व्हीआरएस-सेवानिवृत्ती घेतलेल्या स्त्रीचे-दाभाड्यांच्या बायकोला तर काहीच स्थान नाही. कारण तिला आर्थिक सत्ताच नाही. त्यामुळे ती मुलगी आणि मुलगा यांच्या आधारे जगू पाहते. शेवटी दाभाड्यांना सोडून भावाकडे जाते.

बबन येलमामे हा उत्तर आधुनिक काळात जागतिकीकरणाच्या लाटेत उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण माणसाचा प्रतिनिधी आहे. बबन म्हणतो, ''गावाकडं रोजगार हमीवर काम कराया मुकादमाच्या गांडीला सत्रांदा हात लावावा लागतू... हाय काय त्या भिकारड्या गावात?'' (पृ. १३) जागतिकीकरण आणि दुष्काळ अशा दोन्हीकडून होरपळलेला बबन मुंबईत आलाय तो विस्थापित म्हणूनच; तर इकडे शहरात जे प्रस्थापित मध्यमवर्गीय आहेत, ते दाभाडेही स्वतःच्याच घरात विस्थापित होताहेत. बायको- चिंगी मामाकडे निघून जाते. बंटी स्वतःच गुंड बनला आहे. बबनला कायम आसरा कुठेच मिळत नाही. त्याच्या झोपडपट्टीवर बुलडोझर फिरला जातो, त्याचे मूलही मरते. अशा प्रकारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व उदारीकरणाच्या युगात सारेच कसे विस्थापित होताहेत, हे वास्तव नाटककार समोर आणतो.

आजची समाजव्यवस्था व राजकीय व्यवस्था बिल्डर-उद्योगपती-राजकारणी-पोलीस आणि गुंड यांच्या अभद्र युतीने कशी पोखरलेली आहे, हेही या नाटकात दिसते. दाभाडेंची सर्व माहिती बिल्डर मिळवतो, त्यांच्या उणिवा-कमजोरी हेरतो आणि घरात घुसखोरी करतो. त्यावर पोलीस काहीही करत नाही. त्यांना आधीच 'केस काय' हे माहीत आहे. ते उलट बंटीलाच दहशतवादी ठरवतात. शेजारीपाजारी तर बिल्डर-पोलीस यांच्या कायम दहशतीत आहेत. मुख्यमंत्र्यांकडेही यावर उपाय नसतो. लोकशाही मार्गाने निवडून आलेला हा नेता देवालाच साकडे घालतो व विकासासाठी विस्थापनाचे समर्थन करतो. त्याला रुसो, आईनस्टाईन, नित्शे ही मंडळी माहीत नाहीत. ती त्याला दहशतवादी वाटतात. लोकशाहीत 'सामान्य

माणसाला महत्त्व येतं आणि हुशार माणसाचा अपमान होतो' असे म्हणतात, ते इथे खरे ठरते.


या व्यवस्थेत बिल्डर मात्र आपल्या यशाचे शिखर गाठत असतो. तो म्हणतो की, परप्रांतीय कामगार हेच माझ्या यशाचे रहस्य. ते युनियन करत नाहीत. त्यांना स्थानिक भाषा येत नाही. ते अत्यंत कष्ट करतात, त्यांच्या गर्भवती बायकाही बाळंत झाल्याच्या दहाव्या दिवशी कामावर हजर राहतात. तो आपला पुरस्कार 'कुदरत'लाच अर्पण करतो. दुष्काळाच्या झळा सोसणारे कामगार; जागतिकीकरणाच्या काळात त्यांच्या अस्तित्वाला काहीच किंमत नसते; त्यांच्याकडेही उपयुक्ततावादी दृष्टीनेच पाहिले जाते. म्हणूनच जोपर्यंत मुन्ना दाभाडेंना धमकावत राहतो, तोपर्यंत तो कामाचा व ज्या दिवशी तो दाभाडेंबद्दल सहानुभूती दाखवतो, त्या दिवशी गुंड त्याला गोळी मारतात. त्यामुळे दया, सहानुभूती या मूल्यापेक्षा उपयुक्तता हेच मूल्य या बाजारू जगात महत्त्वाचे ठरते.

या नाटकात वास्तवाच्याही चार पातळ्या आहेत. एक, लेखक-निवेदकगत वास्तव. दोन, प्रत्यक्ष सामाजिक सांस्कृतिक वास्तव. तीन, बिल्डर, राजकारणी यांचे वास्तव. चार, गुंडांचे वास्तव. पहिले वास्तव आदर्श आहे, किमान लेखकाला स्वातंत्र्य आहे, असे आपण आधुनिकतेत मानत होतो; उत्तर-आधुनिकतेत तेही कसे नाही हे जयंत पवार दाखवून देतात. नाटकाचा निवेदक हा लेखकच आहे; बिल्डरचे बिग स्क्रीनवरील अवार्ड फंक्शनचे थेट प्रक्षेपण पाहून इतरांना 'हे बघू नका' अशी त्याची विनवणी कोणी ऐकत नाही. कारण 'फुकट मिळालं की काहीही बघायची सवय असलेला' हा समाज; त्याला 'दाभाडेंची सेन्सिबल स्टोरी' नकोच आहे. टीव्हीवाल्यांनाही या स्टोरीमुळे टीआरपी खाली येईल अशी भीती वाटते. त्यामुळे तेही ही कथा नाकारतात आणि मग तो थेट प्रेक्षकांनाच स्टोरी सांगतो.

प्रत्यक्ष सामाजिक वास्तवात तर डेंजर वारा सुटलाय. कोणी कुठेही घुसून कोणावरही आक्रमण करतो. कुणाच्याही झोपडपट्टीवर बुलडोझर फिरतो, कुणालाही घरातून हाकलले जाते. 'जगा आणि जगू द्या' असे म्हणणाऱ्या बुद्धाच्या भूमीत 'मरा आणि मरू द्या' अशी स्लोगन सोडली जाते. कुणाचाही कधीही खून होतो आणि भाईची माणसे जबरदस्तीने दुकाने बंद करून 'शांततामय मार्गाने बंद पाळण्या'साठी धमकावतात. मग 'सावल्या हरवलेली माणसं' या शहरात 'पोरकी बेरकी' होतात.

तिसरे हाय क्लासवाल्यांचे वास्तव. हे बिल्डर, राजकारणी, अधिकारी यांचे कायम सेलिब्रेशनचे जग. नाटकाच्या प्रारंभीच बिल्डररत्न अवार्ड कार्यक्रम सुरू आहे. त्यात 'झुमेंगे, नाचेंगे आणि गायेंगे और पुरस्कारोंकी बौछार करेंगे' असे वातावरण. या सोहळ्याला कोणाची उपस्थिती? तर 'एंमिनंट पर्सनॅलिटिज अँड सेलिब्रिटीज फ्रॉम पोलिटिक्स, बिझनेस,कार्पोरेट वर्ल्ड, अॅडमिनिस्ट्रेशन, फिल्म-टीव्ही अँड फॅशन वर्ल्ड' क्षेत्रातील. सामान्य माणसाला तर या जगात प्रवेशच नाही. जो शिरू पाहतो त्याला सिक्युरिटी ऑफिसर हाकलून लावतो. यातून नव्वदोत्तरी भारत आणि इंडिया अशी सामाजिक विभागणी पुढे येते.

चौथे वास्तव हे गुंडांचे. महानगरात बेरोजगारीमुळे येणाऱ्या परप्रांतीय लोकांना या जगात प्रवेश मिळतो. एक ग्रामीण भागातील विस्थापित बबन; तर दुसरे




बिहार-उत्तर प्रदेशमधून येणारे विस्थापित परप्रांतीय. पैशासाठी सुपारी घेणारे. पण त्यांचेही प्रश्न आहेच. ठरलेले पैसे मिळत नाही. त्यातल्या एकाला तर पैसे नको, पण मुंबईत घर हवंय. मुन्नाची बायको प्रेग्नंट असल्यामुळे त्याला आता दाभाड्यांना मारवत नाही. त्याला सेटल व्हायचे आहे; पण ज्या धंद्यात तो उतरला आहे त्यातून बाहेर पडणे शक्य नाही. शेवटी त्याचे सहकारीच त्याला गोळी घालून ठार मारतात.

शेवटी दाभाडे दुःखाला सहन करण्याचे खलील जिब्रानचे तत्त्वज्ञान स्वीकारतात - ''दुःख आणि आनंद ह्या अविभाज्य गोष्टी आहेत. जेव्हा त्यांच्यापैकी एकजण एकटाच तुमच्याबरोबर जेवायला येऊन बसतो ना, तेव्हा दुसरा तुमच्या अंथरुणावर झोपलेला असतो.'' (पृ. ४६) असे मानतात.

तत्त्वज्ञान जीवनाचे आकलन करण्यास मदत करते. जीवनाचा स्वीकार कसा करावा याची दृष्टी देते; मात्र प्रत्यक्ष जीवन जगण्यास व जगण्याचे प्रश्न सोडवण्यास कामी येत नाही याचे सूचनही हे नाटक करते. त्यामुळेच श्रेष्ठ तत्त्वज्ञान मानणाऱ्या सत्यविजय नाव असलेल्या नायकाचा नाटकाच्या शेवटी पराजय होतो. त्याच्या मेंदूवर परिणाम होऊन त्याचा अंत होतो. सर्व कलावंत त्याला श्रद्धांजली अर्पण करतात व नाटक संपते.

हे नाटक वर्तमान जगण्याची एक अस्वस्थ जाणीव करून देते. आपल्या भोवतालचा समाज व सर्व आधुनिक व्यवस्था असून आपल्या कामाच्या नाहीत. त्या आपल्याला एकटे पाडत आहेत. या उत्तर-आधुनिक समाजात समूहजीवन तर जाऊ द्या, सहजीवनही जगता येत नाही. आधुनिकतेत समाजाचे व त्यातील कुटुंबाचे विघटन झाले होते, उत्तर-आधुनिकतेत व्यक्ती व तिचे व्यक्तित्व यांचे विघटन होत आहे. या काळात मूल्ये, परंपरा, तत्त्वज्ञान, वारसा, भूमिका काहीही कामी येत नाही. एकटेपणा व एकाकीपणा हेच या युगातील मानवाचे प्राक्तन आहे. सर्व व्यवस्था या बाजारू जगात आर्थिकतेच्या दावणीला बांधलेल्या आहेत. त्यामुळे प्रचलित व्यवस्था व प्रचलित मूल्ये यांच्याही विघटनाचे भयचकित करणारे उत्तर-आधुनिक दर्शन हे नाटक आपल्याला घडवत जाते.

• • •



। कथा :

दोन खड्डे

मूळ उर्दू कथा

▫ सआदत हसन मंटो
हिंदी रूपांतर : नरेन्द्र मोहन
मराठी अनुवाद : योगिनी राऊळ

तुम्ही मला एक कथाकार म्हणून ओळखता आणि न्यायालय एक अश्लील लेखक म्हणून. सरकार कधी मला कम्युनिस्ट म्हणतं तर कधी देशातला कलावंत. कधी माझ्यासाठी पोटापाण्याचे दरवाजे बंद केले जातात, तर कधी उघडले जातात. कधी मला 'निरुपद्रवी मनुष्य' अशी पदवी देऊन शहरातून हद्दपार केलं जातं, तर कधी चेष्टेत सांगितलं जातं 'शहराच्या हद्दीच्या आत तू कुठेही फिरू शकतोस.' यावर मी पूर्वीही विचार करायचो आणि आताही विचार करतो...'या भल्यामोठ्या देशात खरोखर माझं स्थान काय आणि माझी या देशाला गरज तरी काय?' तुम्हाला ही कविकल्पना वाटेल कदाचित; पण माझ्यासाठी हे कटुसत्य आहे की माझ्या स्वतःच्या देशात, ज्या देशावर माझं अतोनात प्रेम आहे, त्या देशात मला अजून माझी नक्की जागाच सापडली नाहीये. यामुळे माझा आत्मा नेहमी तळमळत असतो आणि मग मला कधी त्यांच्या वेड्यांच्या सोबत तर कधी इस्पितळात राहावं लागतं.

मी कोणीही असलो तरी माणूस आहे याची मात्र मला खात्री आहे. पुरावा हवा असेल तर तुम्ही माझ्यातल्या उणिवा बघू शकता, तशाच अंगातल्या नाना कळा. मी खरं बोलतो, पण काही वेळा खोटंही बोलतो. मी नमाज पढत नाही; पण अनेकदा गुडघे टेकून नमस्कार करतो समोरच्याला. एखाद्या जखमी कुत्र्याला पाहिलं तर तासन्तास मी अस्वस्थ असतो. पण त्या कुत्र्याला घरी आणून औषधपाणी करण्याइतकी हिंमत माझ्यात नाही. एखाद्या मित्राला पैशाची फारच अडचण असेल तर मला मनापासून वाईट वाटतं; पण मी वेळीअवेळी माझ्या खिशातले पैसे काढून देत नाही; कारण त्या पैशातून मला दारू विकत आणायची असते. एखादी अपंग मुलगी योगायोगाने भेटलीच तर कितीतरी वेळ माझ्या डोक्यात नुसतं वादळ घोंगावत राहतं. मग मी पण तिच्यासारखा अपंग होतो, तिच्या जागी स्वतःला ठेवतो आणि तिच्या आयुष्यातल्या अडचणींविषयी कितीतरी वेळ विचार करत बसतो. ताबडतोब तिच्याशी लग्न करण्याचा निर्णयही घेतो. मात्र माझ्या बायकोकडे हा विषय काढला की माझा निर्णय ढेपाळतो.

मी एक कथाकार आहे. कल्पनेच्या प्रचंड भराऱ्या मारू शकतो. पण होतं काय, मी जेव्हा जास्त उंच भरारी घेतो, त्याच वेळेस जमिनीवर ...अगदी पाताळात म्हटलंत तरी चालेल, असा काही तोंडावर आपटतो की मला वाटतं, खाली आपटायचंच होतं तर कल्पनेच्या भराऱ्या मारायला गेलोच कशाला? त्यापेक्षा आयुष्यातले छोटे-छोटे घसरणीचे प्रसंग, जे आपल्यासारख्या छोट्या माणसांच्या अधःपतनामुळे तयार होतात, तेच माझ्यावर परिणाम करण्यासाठी पुरेसे आहेत.


अनुक्रमणिका

रस्त्यावर फेकलेल्या केळीच्या किंवा कलिंगडाच्या साली मला अजिबात सहन होत नाहीत. मूर्ख लोकांच्या अशा बेपर्वा वागण्याची मला कीव येते. लोक जेव्हा आपल्या घरातले उंदीर पिंजऱ्यात पकडतात आणि दुसऱ्या वस्तीत सोडून येतात, तेव्हाही मला अशीच कीव येते. आपल्या घरातला कचरा काढतात आणि शेजाऱ्याच्या घरापाशी लोटून देतात. हे सगळं अडाणीपणामुळे घडतं असं म्हणतात. जर सगळ्यांचं यावर एकमत आहे की, अडाणीपणामुळे हे घडतं. तर शिक्षण सार्वत्रिक का नाही करून टाकत? याचा अर्थ असा नाही का होत की ज्या लोकांच्या हातात शिक्षणाचे अधिकार आहेत, ते लोक स्वतःच अडाणी आहेत?

आपले सरकारी अधिकारी पराकोटीचे बेपर्वा आहेत, असा विचार माझ्या मनात आला की मी पार कावरा-बावरा होतो. एखादा माणूस मंत्री झाला की त्याच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर फवारणी काय, सफाई काय... आणि या सगळ्यावर देखरेख करायला पोलिसांची नेमणूक आणि ज्या ठिकाणी स्वच्छतेची खरी गरज आहे, तिथे मात्र कोणाचेच लक्ष नाही. एखाद्या मंत्र्याचा घसा सारखी धूळ उडाल्यामुळे खराब झाला किंवा एखाद्या मंत्र्याला डास चावला, तर काय होणार मोठंसं? त्यापेक्षा गलिच्छ वस्तीत नेहमी राहणारी ती शेकडो-हजारो मुलं जास्त महत्त्वाची नाहीत का, जी कोणत्याही लढाईत आपल्या छातीवर गोळ्या झेलतात आणि राष्ट्राच्या जय-पराजयात महत्त्वाची भूमिका बजावतात?

खरं म्हणजे या सगळ्याच गोष्टी इतक्या स्पष्ट आहेत की त्या सगळ्यांनाच माहीत आहेत, अगदी सरकारी अधिकाऱ्यांनासुद्धा. तरीही प्रत्येक गोष्टीत भेदभाव का, कळत नाही. मला तर बऱ्याचदा वाटतं की सरकार आणि जनता यांचं नातं रुसलेल्या नवरा-बायकोसारखं असतं. वरून सगळं साजरं-गोजरं आहे, पण खरं तर काही नाहीच आहे. एक कथाकार म्हणून मला हे नातं फारच भुरळ घालतं. तुम्हीपण थोडा प्रयत्न कराल, तर यातले अनेक मजेशीर पैलू तुम्हाला दिसतील. बायको स्वतःचेच हट्ट पुरे करत असते आणि नवरा त्याचा आडमुठेपणा करत असतो. दोघंही गृहस्थाश्रमाचे नियम पाळत नाहीत, तरी एकमेकांचे नवरा-बायको असतात. सतत एकमेकांमध्ये भांडणं चालू असतात, नातेवाईक बघून हसत असतात, पण त्यांचं नातं जसंच्या तसं राहतं... आतून पोकळ. या सरकार आणि जनतेच्या मिलनातून (बलात्कार म्हणणं जास्त योग्य आहे) मुलांचा जन्म होतो, पण अशी मुलं? कायदा आणि सुव्यवस्थेसारखी - ना धड सरकारी चेहऱ्याची, ना धड लोकाभिमुख. मला याबद्दल काही बोलायचंच नाही आता... फार तर इतकंच म्हणेन, हे सगळं माझ्या डोक्यावरून जातं.

तशा तर असंख्य गोष्टी डोक्यावरून जातात. मी अमेरिकेची खाबूगिरी आणि भांडवलदारी वृत्ती समजू शकतो. मला रशियाच्या विळ्याचा आणि हातोड्याचा अर्थ समजतो. पण इथे, माझ्या स्वतःच्या देशात जे काही चालू आहे, ते मात्र माझ्या डोक्यावरून जातं. एक शक्यता अशी आहे की आज जे काही माझ्या डोळ्यांदेखत घडतंय ते फारच उच्च प्रतीचं आहे किंवा दुसरी अशीही शक्यता आहे की हे सगळं फार नीच आहे. काहीही असो, मला या गोष्टींचं नेहमीच वाईट वाटत राहील की हे सगळं समजावून सांगणारं कोणी मला भेटलं नाही.



अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांची मदत घेण्याचा करार झाला, यात एखाद्या कथाकाराला काय कळणार? तुर्कस्थान आणि पाकिस्तान यांच्यात जो करार झाला त्याबाबत कथाकाराला काही मत असू शकतं का? कथाकार हेही विचारू शकत नाही की मोठमोठ्या नेत्यांच्या हत्येचा जो तपास चालू आहे त्यातून नक्की काय हाताला लागलं? त्याला असे प्रश्न विचारण्याची हिंमतही नसते की या मोठ्या नेत्यांच्या मारेकऱ्यांना काय शिक्षा मिळते? - हे मारेकरीसुद्धा शेवटी माणसंच असतात, ज्यांना आपण शिक्षा म्हणून मारतो! हा. पण तो इतकं नक्की विचारू शकतो की पोस्टाच्या अलीकडच्या चौकात, माक्लोड मार्गाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, सुरुवातीलाच जे दोन खड्डे खोदले होते, त्याचा

अर्थ काय? ते खड्डे आता बहुतेक माती टाकून बुजवलेत, पण जो ट्रक त्या खड्ड्यात अडकून उलटला होता, तो अजून तिथेच आहे. कोणास ठाऊक आणखी किती दिवस तो अशा तुटलेल्या अवस्थेत तिथे उभा राहणार आणि माझ्यासारखंच विचारणार की त्याच्या या तुटक्या अवस्थेला जबाबदार असलेल्या दोन खड्ड्यांचा नक्की अर्थ काय?

रात्रीच्या अंधुक प्रकाशात एखाद दुसऱ्या टांग्याने यावं, या खड्ड्यात पडावं, त्या टांग्याच्या घोड्यांनी लुळंपांगळं व्हावं किंवा सरळ मरून जावं; एखाद्या सायकलस्वाराने आपली हाडं मोडून घ्यावीत किंवा एखाद्या मोटार सायकलवरच्या तरुणाने, मस्तपैकी फिल्मी गाणं गुणगुणताना या खड्ड्यात पलटी मारावी आणि आकाशातल्या चांदण्या बघाव्या, या उद्देशाने जर ते खड्डे खोदले गेले असतील तर मला काही म्हणायचं नाही. कारण लोकांच्या मनोरंजनाच्या अशा छोट्या-छोट्या संधी महापालिकेने दवडू नयेत, असं मलाही वाटतं. पण मला त्रास या गोष्टीचा होतो की जर मी म्हटलं, मला या खड्ड्यांबद्दल काहीच आक्षेप नाही तर उलट सरकार मलाच विचारेल, तुम्हाला काहीच कसं म्हणायचं नाही, जेव्हा आम्हाला त्याबद्दल इतकं काही म्हणायचंय!

खरं म्हणाल तर हल्ली असे आक्षेप घेण्याचे दिवसच राहिले नाहीत. आता बघा, इथे सिगरेट काळ्या बाजारात मिळते. तुम्ही म्हणाल आमचा याला आक्षेप आहे तर त्यातून काही निष्पन्न होणार नाही. छोटे दुकानदार म्हणतील, 'काय करणार साहेब? आम्हाला जितक्या कोट्याची परवानगी आहे, तेवढंच आम्ही मोठ्या दुकानातून घेऊ शकतो. तिथे आम्हाला दहा आण्याची डबी अकरा आण्यात मिळते, मग त्यावर आम्ही दोन पैसे-एक आणा कमावला तर मोठा गुन्हा झाला का?' डाळ-तांदळाचा भाव विचाराल तर बरोबर सांगतील, पण सिगरेटच्या झुरक्याबद्दल विचाराल तर काय बिशाद, तुम्हाला खरा भाव कळेल! तरीपण माणूस विचार करतो की सिगरेट का बरं काळ्या बाजारात मिळते? आता जे सिगरेटचे सोल एजंट आहेत, ज्यांच्याकडून सिगरेट बाजारात येते, त्यांना का विचारत नाही की कंपन्या त्यांच्याकडून जास्त पैसे का घेतात? कंपन्या का गरजेपेक्षा कमी सिगरेटचा पुरवठा करतात? काहीही असो, हे सरकारचं काम आहे की कंपन्या आणि त्यांचे सोल एजंट यांच्या ज्या काही समस्या असतील त्या जाणून घेऊन त्यावर उपाय करायचा. पण इथे खोच अशी आहे की सरकारलाच अनंत समस्या आहेत आणि असे तर आपल्या आजूबाजूला अगणित खड्डे आहेत, जे बुजवायचे म्हटले तर सरकारला आयुष्य अपुरे पडेल; पण मी फक्त त्याच दोन खड्ड्यांविषयी बोलतोय, जे पोस्टाच्या अलीकडे रस्त्याच्या सुरुवातीलाच खोदून ठेवले होते किंवा आपोआपच खोदले गेले होते आणि महापालिकेने शिताफीने रात्रीच्या अंधारात ते लोकांपासून लपवून ठेवले होते. मला खरं तर या देशातलं माझं स्थान अजूनही कळलेलं नाही; पण मी स्वतःच असं समजतो की उर्दू साहित्याच्या क्षेत्रात माझं बऱ्यापैकी नाव आहे आणि त्यामुळे माझं अस्तित्व महत्त्वाचं आहे (अशी काहीतरी स्वानंदी धारणा नसती तर कठीणच झालं असतं.) त्यामुळेच काही दिवसांपूर्वी मला या खड्ड्यांचं महत्त्व कळलं. जे दिसायला फारच निरुपद्रवी होते, पण प्रत्यक्षात फारच उपयोगाचे. निरुपद्रवी एवढ्याचसाठी की हे खड्डे नसते तरी लोक दुसऱ्या कोणत्यातरी कारणांनी जखमी झालेच असते. खड्डे नसते तरी इथे काही ना काही तोडफोड होतच राहिली असती आणि त्याचवेळेस उपयोगी अशासाठी की हे खड्डे इथे असल्यामुळेच आपल्याला कळलं की महापालिका नसली तरी सगळं काही नेहमीप्रमाणे चालत असतं. खूप दिवसांपूर्वी मला 'नवीन वसाहत' खात्याकडून नोटीस मिळाली की तुम्ही एक निरुपद्रवी नागरिक असल्यामुळे तुम्हाला जे घर देण्यात आलंय, ते ताबडतोब रिकामं करावं. माझ्या मते ही नोटीससुद्धा तितकीच निरुपद्रवी आहे, कारण जोपर्यंत शहरात निरुपद्रवी खड्डे आहेत, तोपर्यंत निरुपद्रवी माणसांनी शहरातली घरं रिकामी करण्याचा प्रश्नही निरुपद्रवीच नाही का?

काही दिवसांपूर्वी मी एका हॉटेलमधून बाहेर पडलो आणि टांग्यात बसलो. पोस्टाच्या जवळ टांगा येता-येता मला वाटलं, माक्लोड रोडकडून जरा बीइन रोडकडे जावं; कारण त्या रस्त्यावर एक फळांचं दुकान आहे, जिथून मी माझ्या मुलींसाठी फळं घेतो. टांगा पोस्टाच्या अलीकडे माक्लोड रोडकडे वळणार, इतक्यात मला रात्रीच्या अंधुक उजेडात ते दोन भयानक खड्डे दिसले. खरं म्हणजे मी रातांधळा आहे, रात्रीच्या अंधारात मला काही दिसत नाही, तरीही हे खड्डे मला दिसले म्हणजे कमालच झाली. मी एकदम जोरात ओरडलो. टांगेवाल्याने ओरडणं ऐकून लगाम असा काही

खेचला की घोडा जवळजवळ एक हात मागे येऊन थांबला. घोड्याने एक पाऊल जरी पुढे टाकलं असतं तरी काय झालं असतं सांगता येत नाही. टांगेवाल्याने मला दहा वेळा तोंडभरून आशीर्वाद दिले की माझ्यामुळे आज त्याचा घोडा बचावला; कारण केवळ शंभर पावलावर एक तुटलेला टांगा उभा होता आणि त्याचा घोडा जखमी अवस्थेत विव्हळत होता.

इकडे मी विचार करत होते, देशातला सर्वात मोठा उर्दू कथाकार अपघातातून बचावला. त्यावेळेस माझ्या मनात फक्त राष्ट्राच्या हानीचा विचार होता. मला एक बायको आणि तीन मुली आहेत, हे मी विसरूनच गेलो होते साफ. माझ्या डोक्यात फक्त इतकंच होतं की मी राष्ट्राची बहुमोल संपत्ती आहे, जी आज हातीपायी धड राहिली. अर्थात मी मेलो असतो तरी तो एका निरुपद्रवी माणसाचा मृत्यू ठरला असता म्हणा! काही नातेवाईक आणि मित्र नक्कीच गद्‌गदले असते, पण ज्याची मी स्वतःला राष्ट्रीय संपत्ती वगैरे समजतो, त्या भल्यामोठ्या राष्ट्राच्या डोळ्यात टिपूससुद्धा आलं नसतं. असा काही बाबतीत मी पराकोटीचा बेअक्कल आहे खरा, पण मग आपण बेअक्कल आहोत म्हणजेच माणूस आहोत, हे लक्षात आलं की हायसं वाटतं जरा.

आता असं बघा की मी मूर्खासारखा त्या दोन खड्ड्यांचा संबंध फक्त माझ्याशी लावला. तसं बघायला गेलं तर या शहरातल्या प्रत्येक नागरिकाचा मृत्यू त्या खड्ड्यांमुळे ओढवू शकतो, मग नाव सआदत हसन मंटो असो की आणखी काही! माझं हे असं आहे... अनेक गोष्टी मला समजतच नाहीत आणि ही गोष्ट तर अजिबातच समजत नाही की पोस्टाच्या अलीकडच्या रस्त्यावर ते दोन खड्डे का खोदून ठेवलेत किंवा आपोआप खोदले गेलेत? तिथे एखादी वेगळी खूण का नाही रोवून ठेवली, ज्यामुळे लोकांना सांगता येईल की बघा... जखमी व्हायला किंवा मरायला आवडेल का तुम्हाला? तर आम्ही सगळी तयारी करून ठेवलीय, खुशाल या आणि करून घ्या आपल्या जिवाचं बरं-वाईट! किंवा उलट्या भाषेत असंही सांगता येईल की जर परमेश्वराच्या मनात तुमच्या मृत्यूची योजना तयारच असेल तर हा रस्ता टाळून दुसऱ्या स्वच्छ, गुळगुळीत रस्त्यावरून गेलात तरी यमराज तुम्हाला भेटणार हे नक्की, मग उगाच या खड्ड्यांना दोष कशाला देता?

असं ऐकलंय मी, की इतर देशात जर रस्त्यावर अशा पद्धतीचा अडथळा असला तर सरकारी अधिकारी त्या जागेभोवती एक रस्सी ताणून बांधतात, म्हणजे लोक सावध होतात. रात्री रस्सी दिसणार नाही असं वाटलं तर तिथे लाल दिव्यांच्या बत्त्या लावल्या जातात, ज्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्यांना धोक्याची कल्पना येते. आपल्या नगरपालिकेला इतकी साधी गोष्ट माहीत नसेल, असं तर शक्यच नाही आणि तरीही त्यांनी पोस्टाच्या अलीकडच्या रस्त्यावर असे उघड्यावर खड्डे खोदून ठेवलेत म्हणजे ते नक्कीच काहीतरी चांगल्या उद्देशाने असतील. एका मामुली कथाकाराला त्यांचा हा उच्च उद्देश कसा काय समजणार? पण तरीही आपला बावळटपणा आणि अज्ञान यांना साक्षी ठेवून त्या कथाकाराला हे विचारण्याचा अधिकार तर नक्कीच आहे की खड्डे खोदण्यामागचा उच्च उद्देश कोणता? काहीच नाही तर निदान त्याला एखादी कथा लिहायला विषय मिळेल, हे काय कमी आहे?

पोस्टाच्या अलीकडे, जिथे काही दिवसांपूर्वीच खड्डे खोदले होते किंवा आपोआप खोदले गेले होते तिथे एक पायमोडका ट्रक आपली शाबूत तीन चाकं आणि भरपूर विटांच्या आधारे अजूनही उभा आहे. तो मला काही सांगण्याचा प्रयत्न करतोय की नगरपालिकेला? काही कळत नाही. मला एका कथाकाराला, त्याचं हे मुक्यानं काहीतरी सांगणं थोडंतरी कळतंय, पण नगरपालिका, जी फारच मोठी नाटककार आहे आणि या घडीची सगळ्यात मोठी मालकीण, ती ही बिनशब्दांची भाषा कितपत समजून घेईल, या बाबतीत मला काहीच अंदाज नाही. मला असं वाटतं की सरकारने, या दोन खड्ड्यांच्या विषयावर ताबडतोब एक शोधसमिती गठित करावी. मग या समितीच्या अहवालांचे जे कागद जमतील, त्यांनी ते खड्डे भरून टाकावेत. तोपर्यंत आणखी असे अनेक खड्डे रस्त्याला पडतील किंवा खोदले जातील, ज्यायोगे अशा अनेकानेक समित्यांसाठी नवीन जागाही तयार होत जातील.

तर मंडळी, पोस्टाच्या अलीकडच्या रस्त्यावरचे दोन खड्डे... झिंदाबाद! आणि त्यात न पडता जिवंत राहिलेली खड्ड्यांपलीकडची माणसे आणि घोडे... मुर्दाबाद!

• • •

अनुक्रमणिका

कविता

बारा कविता : जयंत परमार

अनुवाद : लोकनाथ यशवंत

१. कोंबड्याचा बळी

सतत येणाऱ्या तापानं
मी जर्जर झालो.

आई मला घेऊन जायची
बुरखा घालणाऱ्यांच्या मस्जिदीत
पिराच्या समोर आपला पदर पसरायची
आणि
मौलाना मोरपिसाचा झाडू
माझ्या डोक्यावर ठेवायचा.
जळत्या कानात फुंकायचा तो कुरानातील
आयते.
मी लवकर बरा होण्यासाठी दुआही मागायचा.

ताप होता आपल्या जिद्दीवर
आईच्या डोळ्यांतील झोप गायब
ओठांवर मन्नत, मन्तर आणि ताबिज़
शेवटी ती घेऊन गेली भल्यामोठ्या
मांत्रिकाकडे
लाल रंगाच्या गाठोड्यात
कुणास ठाऊक काय-काय बांधून ठेवलं होतं
त्यानं
लिंबू, नारंजी, वाघाची तीक्ष्ण नखं
आणि थैलीत गावठी कोंबडाही.

मांत्रिकाने पुन्हा मंत्र वाचले
निंबाला धाग्यात ओवलं
आणि धारदार सुरी फिरविली सहज
बिचाऱ्या कोंबड्याच्या मानेवरून
गरम रक्त शिंपडलं माझ्यावर...
दहशतीने थरथरत होतो मी.

आई म्हणायची नेहमीच
ईश्वर सगळ्यांचा रक्षणकर्ता आहे.

मग ईश्वर का मागतो कोंबड्याची गर्दन???

• • •

पुस्तके :
और : १९९९
पेन्सिल और दुसरी नज्म : २००६
मानिंद : २००७ / अंतराल : २०१०
इन्कपॉट और कविताएँ : २०११
पेन्सिल और बाकी कविताएँ (काश्मिरी) : २०१२
नज्म़ यानी : २०१३
पेन्सिल और बाकी कविताएँ (इंग्रजी) : २०१४
जायको मिट्टी के सपने : २०१६

पुरस्कार :
साहित्य अकादमी : उर्दू २००८
भाषा भारती सन्मान : २००६
गुजरात उर्दू साहित्य अकादमी

अवार्ड : २००१, २००६, २००८
कुमार पुशि अवार्ड : २००१

अनुवाद :
इंग्रजी, हिंदी, पंजाबी, कानडी, मराठी,
बंगाली, तेलगू, काश्मिरी, तामिळ, गुजराथी.

अनुक्रमणिका

२. चेंडू -१

लाकडी आलमारीतल्या काही भंगार सामानात
एक चेंडू मिळाला.
जुन्या कपड्याच्या रंगीबेरंगी चिंध्यांनी केलेला
आईने बनविला होता तो
माझ्या वाढदिवशी.
खूपच सुंदर. खूपच छान
खूप आवडायचा मला तो.

• • •

चेंडूच्या एकेका धाग्यात
आईच्या स्पर्शाचा सुगंध.

• • •


माझ्या फाटक्या बालपणाला
तिनेच लावली होती रंगीबेरंगी स्वप्नांची ठिगळं


• • •

३. चेंडू - २

शाळेतून येताच
खुट्टीला दप्तर अडकविल्यावर
तो माझ्याशी खेळायचा
उसळायचा हवेवर.
काळ्या आकाशाच्या जंगलात
वाळलेल्या गवताच्या पिवळ्या मैदानावर
गल्ली-मोहल्ल्यात. अरुंद जागेत
अथांग आकाशाच्या निळ्या घुमटात
मात्र,
एक दिवस मी त्याला असा जम्मून
फेकला आकाशात की,
तो कधी पुन्हा परतलाच नाही
माझ्या बालपणासारखा.

• • •





४. आक्रोश

निबांच्या झाडाखाली
मातीच्या भिंतींनी
गवत नि तराळ्यापासून बनविली आहे एक झोपडी
अनेकदा ती पावसाच्या माऱ्याने
हर-हर करून मोडून जाते
तरीही,
माझ्या आईला प्रिय आहे ती झोपडी
ती आपल्या हातांनी सजवत असते निरंतर तिला
साऱ्या शहरात भटकून
लोखंड, लाकूड, काचेचे नि कागदाचे तुकडे वेचून.
कधी-कधी आपल्यावर लादलेल्या
जातीचा खूप राग येतो
वाटते,
लोखंड, लाकूड, काच
अन् त्या कागदाच्या तुकड्यांचा
एक पृथ्वीसारखा बम बनवून
फोडू युनोच्या टेबलावर.

• • •

५. जात

माझ्या पूर्वजांनी
रक्ताळलेल्या हातांनी बांधला पाया
शाळेचा
शाळेच्या एकेका विटेत
सुगंध त्यांच्या रक्ताचा
ते होते अशिक्षित भोळे-भाबडे
त्यांनी टाकलं मला त्याच शाळेत
शिकून सवरून काही बनण्यासाठी.
मात्र
मास्तरांनी
मला येऊ दिलं नाही वर्गात
बसविलं वर्गाच्या बाहेर कडक उन्हात...
• • •
पशूसारखा केला व्यवहार
मी आतच आत होत गेलो जखमी...
स्वप्नाचं एकेक फूल अकाली वाळत गेलं.
खूप राग आला माझ्यावर थोपविलेल्या
जातीचा
नि घट्टेभरल्या हातांचा.

शाळेच्या एका विटेत आहे
माझ्याच रक्ताचा सुगंध.

• • •

अनुक्रमणिका

६. २५ डिसेंबर १९२०


तुम्ही जाळले
मनुस्मृतीचे पानन्‌पान
कुणात हिंमत होती
तुम्हाला थांबविण्याची...?
ह
मी शाईऐवजी त्याच अग्नीला
आपल्या दौतीत भरलं
ज्यात मी आपली लेखणी बुडवून
गाणे लिहितो तुमचे...

• • •

७. ।। दलितांसाठी...

तुझ्या
दुःखाच्या
महाकाव्याला
मी
लिहीन...
सूर्याच्या जळत्या छातीवर!

• • •



८. माहिया

गळ्यात जे मडकं आहे
तुम्ही कधी विचार केला?
भारी आहे ते पृथ्वीपेक्षाही...

• • •

९.
माझ्या संवेदनशील बोटात नाही शक्ती

दिव्याच्या पिवळ्या उजेडात
रायटिंग टेबलच्या छातीवर
कित्येक दिवसांपासूनचं तुझं पत्र
वाट बघत आहे माझी

पत्र लिहू?
मात्र, मी तुला पत्र कसं लिहू?
माझ्या संवेदनशील बोटांत आता नाही शक्ती
लेखणीला पकडू कसा?


तेज, अणकुचीदार काळी लेखणी
एकेवेळी माझ्यासाठी शस्त्राचा दर्जा ठेवायची

ही कलम आता
लहानग्या चंद्राच्या हाती ठेवून जातो.

• • •

१०. सकाळ आताही होते

सकाळ आताही होते
रात्रीचं छान नाटक
रोज खेळल्या जाते
•
भरून गेलं माझं मन
आश्चर्याच्या जुगनूंनी
आज सकाळी मी
मला जिवंत बघितलं
•
माझ्या श्वासांना स्पर्शून
शुभ्र चंद्र निघून गेला
आताही या जमिनीवर
काय असे लोक वास्तव्याला राहतात?
•
सकाळ आताही होते
रात्रीचं छान नाटक
रोज खेळल्या जाते
•
फुलासारख्या मुलांच्या हातात आहेत बंदुका
ज्यांच्या हाताने स्पर्श केला नाही
चेंडू नि पुस्तकांना
•
मी विश्वास कसा करू?
जगात ईश्वर असल्याचा
टीव्हीवर बघतो युद्ध आताही सुरू असल्याचं.
•
कवितेच्या एकेका ओळीवर आहेत बायोनेट
बगिच्यातल्या फुलझाडांच्या पानांवर
आहेत काळे थर
आता तर इराकमध्ये कोणतंच फूल नाही उगवत.
•
कैदी शरीराच्या चामडीला असे सोलून काढतात
जसे कुणी पायातून काढतात आपले मोजे.
तरीही हे भाबडं मन प्रेम करते माणसांना
•
कवयित्री मारिना तस्वीता ईवाला
माझ्या झोपेत हृदयाला येऊन ती म्हणते,
''अश्रूंना जपून ठेव, उद्या ते कामात येतील!''
•
शब्दांवर आलेली सगळी धूळ पुसून घेतो,
चंद्रावर उगवलेलं काळं गवत उपटून घेतो.
•
रात्रीचं सुंदर नाटक
रोजच खेळल्या जाते
सकाळ आताही होते...
• • •



अनुक्रमणिका

११. उपरा

स्वप्न, आशा-आकांक्षा
आणि दहशतीचं गाठोडं
गाढवाच्या पाठीवर लादून
पोटाची आग विझविण्यासाठी
गावोगाव भटकत आहेत बंजारे
त्यांच्या हिश्श्यात दिलेलं
आकाशाच्या घराचं छत्र अन् जमिनीचं अंथरूण.
•
लक्ष्मण माने,
सूर्याच्या खिडकीत बसून मोजत असतो कित्येकदा
रात्ररात्रभर कण्हत-विव्हळत ओरडणाऱ्या
वडिलांच्या पाठीवरील खोलखोल रक्ताळलेले घाव
लावत बसतो त्यांना
हळदीचा लेप तड्ड्याच्या झोपडीत.
मात्र,
जखमा वाहातच आहेत निरंतर.
•
गाढवांच्या पाठीवरचं ओझं उतरलेलं नाही
अजूनही...

• • •

१२. जयंत परमार


मी शोधून काढली एक कविता
विराट समुद्राच्या ओठातून
यासाठी की,
मी उघडू शकू एक जुनाट बंद खिडकी
ज्यात प्रवेश करू शकेल
प्रकाशाचा चकाकणारा पक्षी

मी शोधून काढली एक लाट
मीटरमध्ये बसणाऱ्या छंदाची
यासाठी की,
मी भरू शकू एक अनंत आकाश माझ्या आत

मी शोधून काढलेत प्रास नि यमकं
यासाठी की,
मी सजवू शकू
एक सुंदर स्वप्न या डोळ्यांत

मी शोधून काढली
शब्दांची अणकुचीदार छन्नी
यासाठी की,
मी तोडू शकू
रात्रीची भिंत
अन्
काळा एकांत

• • •



सात कविता : दीपक बोरगावे

१. दारावरची थाप

हे मला आता सर्व इथंच
टाकून जायला पाहिजे;

या अंगणात
तुझे बालपण दिसतेय
इथे
व्याकरणाच्या प्रश्नांचा गुंता
केला दोघांनी मिळून
चांगला मुलगा वाईट मुलगा
यांची चित्रे रेखाटली

पायथ्यास
तुझ्या वाढलेल्या पायांच्या नखांशी खेळत
काचाकवड्यांची रांगोळी
उलट्या पाटावर
म्हशीच्या शेणाने सारवलेली जमीन
तुला त्याचा दुर्गंध यायचा
नि आपला काचाकवड्यांचा डाव मोडायचा.


तुझा डाव खरोखरच मोडून गेला
अचानक पडली थाप दारावर
आणि तू निघालास
कुठे कसा काय? ते समजलंच नाही!

मलाही आता इथलं सगळं
आवरायला हवं;
कामं खूपच आहेत
ती राहणारंच आहेत

ती कुठली संपताहेत?
लांबतच जाताहेत
मारुतीच्या शेपटासारखी!

दारावर अजून तरी थाप नाही;
पण ती येवो न येवो
मला निघायला हवं
दूरदूर...
जिथे असेल
फक्त तुझे-नि-माझे राज्य
विखुरलेल्या आकाशढगांना
चांदण्यांनी विणण्याचे.

• • •



अनुक्रमणिका

२. शेक्सपियरचं थडगं

शेक्सपियरचं थडगं
पाहिलं होतं कधीतरी;
पण त्या आधीपासूनच
वास्तविक
हॅम्लेटच्या बापाचं भूत
जे डोक्यावर बसलं
ते ब्रूटसनी सांगूनही
काही उतरलं नाही;

कॉनरॅडची एक नाही
चार घरं पाहिली;
एवढ्या गिरक्या कशापायी?
एकतर निर्वासित गडी
आणि येडा समुद्रापायी;
कॉनरॅड म्हणजे समुद्र समुद्र समुद्र...
माझ्या खिडकीत समुद्राची गाज
खळळ्कन तुटली;

जेम्स जॉईसचा युलिसिस
काचेच्या कपाटात
सीलबंदाय;
आता
उघडावा म्हणतो त्याला
तुकारामाच्या गाथेप्रमाणं;

डी. एच. लॉरेन्सच्या प्रेमिका
आणि मुलंसुद्धा
बेरकी फार त्या काही केल्या बधल्या नाहीत;

टी. एस. एलियट थेम्सकाठी
गिरक्या घेत... सिगारेटी फुंकत
महाकाव्य गुणगुणतोय
मुळात रॉयल गडी...
कवितेला उलटा करणारा
नि उलटवणाराही
त्याला कोणी काही सांगूच शकत नाही;

डब्ल्यू. बी. ईएटस् प्रेमगाण्यात
डोक्याला हात
गरगर गिरक्या
नि काठीवर कोट
पळतोय उगाच
बायझॅन्टीयमकडे;

डब्ल्यू. एच. ऑडन
ड्राईव्ह करतोय
ॲम्ब्युलन्स
मार्क्स आणि फ्रॉइडला घेऊन
लंडन ते न्यूयॉर्क
सतत... कविता
नि कवितेवरही लिहिणे
जमल्यास मित्रांना
लाँग राईडला घेऊन जाणं
मोलकरीण न आल्यास
स्वतःचा स्वयंपाक करणं

हार्डी बिचारा
वेसेक्स नावाच्या खेड्यात
टेस्शी गप्पा मारत
हेंचर्डची कामं करतोय
त्याला कुठे जायचं नाही
आपलं गाव सोडून
माझं गाव सोडून
मी कुठं भटकतोय?
शेक्सपियर-ऑडन तर
माझ्या कपाटातच आहेत.

• • •



अनुक्रमणिका

३. हे तुला करावेच लागेल

प्रत्येक सूर्योदयानंतर
भवताली तुझ्या
एकूणच
अंधाराय
तिचं साम्राज्याय
विस्तारणारं
दुसऱ्यांच्याही खिडक्यांपर्यंत!

कधी संपेल ते?
कधी बुडेल ते?
नाही सांगता येणार...


म्हणूनच

कर अंधार
पारदर्शी;
ठेव पुसून
काचा कंदिलाच्या
स्वच्छ;
अगदीच काळ्या झाल्यात त्या
वितळणाऱ्या ह्या घरात तुझ्या;

खूपच जळल्यात त्या
आयुष्य डचमळल्यामुळे
सततच...

नको होऊ देऊस
ठिसूळ
त्यांना आता कधीच;
हे तुला
करावेच लागेल
कधीतरी;
किंवा आत्ताच.

• • •



४. चित्रांच्या पंधरा जुड्या

पूर्वी खूपदा
पत्र लिहिलीयत;
बऱ्याचदा पोस्टात न टाकता
तू भेटल्यावर
सरळ तुझ्या हातात ठेवलीयत;
वाचून झाल्यावर
खळखळून हसायचीस तू
तुझं हसणं अगदी मनापासून असायचं;
आज ह्यातलं काहीच राहिलं नाही!

सध्या
तुझं हसणं
चिन्हांतूनच अवतरतंय
आजकाल
प्रत्यक्ष
भेटलो तरी
तळहातावर ठेवतेस
तू
दहा चिन्हं
आणि
बोटांना अडवतेस
चित्रांच्या
पंधरा जुड्या

• • •

५. निमंत्रण

डोळ्यांत फुटलेत
रक्ताचे मेघ
सैरभैर

ठिबकते आकाश
वरखाली चघळत

भवताल ओघळांचा
अश्रूंच्या पिरॅमिडज्मध्ये

वाळूचे खिळे मेंदूत
खिळखिळ्या वाहिन्या
उघड्या देहाच्या
उभ्या पावसाला
निमंत्रण देत

• • •

६. संस्कृतीच्या शेंगा

म्हणतेस नेहमीच तू
समुद्र माझा मित्र... समुद्र माझा सखा
तोच तर आहे शेवटपर्यंत सोबत करणारा वगैरे...

तुझं हे असं अमानवी वाळूत घसरत जाणं
नि मातीच्या बोटांपासून तुटत राहणं
बेटातल्या झाडासारखाय;

माणूसखुणांच्या डोंगरापल्याड वेचत राहतेस
संस्कृतीच्या शेंगा तू
नि खात बसतेस एकटीच
पायथ्याशी समुद्राच्या

तुझं सागरगोट्यांचं हे गाणं
निवडुंगाच्या पानांसारखाय;

समुद्राच्या फेसाळ लाटांवर स्वार होणं
कॉनरॅडनंही केलं नव्हतं असं कधी!

तुझे खेळ
पटांगणाशिवायचे
अवकाशहीनतेच्या काठांवरचे

गवाक्षांच्या खोबणीतच सारी
रसायनं वेगवेगळ्या रंगांची

हातातल्या बराकीत
स्वःच्या गिरक्याभवतालची
ही आत्मरतता
किती रिती?

मांर्जार कुळातील
थिट्या नि संक्षिप्त जागा
लांबुडक्या गल्लीत
बिनचेहऱ्याच्या नाकासारख्या
समुदायाचा सामुद्रिक अवतार
जिवंत पानांच्या सळसळत्या खुणांसारखाय

अनुक्रमणिका

तू आहेस
फेकून दिल्यासारखी
खोल पाण्यात
पाषाणांच्या तळांशी
जिथे माणसांचा नि मानुषपणाचा अंत
माशांच्या खवल्यांवर चिकटलाय

पातळ
सरकत्या
वाळूतले
तुझे हे खोल धड आता
कर मोकळे

घे श्वास
मोकळ्या समुदायाचा

समुदायासाठीच प्रेम
ही पेरणी
असते इथेच

ती नसते
निमुळत्या स्वआशयाच्या झोक्यांवर
हिंदोळत
रस्त्यावरील दगडगोटेही असतात यात सामील

क्रमाने वाढत जातो
समुदायाचा समुद्र
मातीत पेरलेले मानवी आयाम
वेगळे होत नसतात
पाण्याच्या संस्कृतीपासून
हो...
मित्र-सखाही असतो
तो इथेच
समोरच्या डोळ्यांत सांडलेला

हवा असतो
फक्त एक थेंब
रक्ताचा
नि प्रामाणिक आशयाचा

फुलांच्या देठांतील
वाढत्या पेशींसारखा
• • •

७. रात्र...

रात्र...
खिडकीबाहेर
स्तब्ध
तिचं साम्राज्य
धुक्यासारखं

रात्र...
सतत
खिडकीतून
आतबाहेर
तिचा अंधार
डोळ्यांत बुबुळांत
गोठलेला

रात्र...
वाऱ्याचा जबडा
भिंतीवर
खिडक्यांच्या काचांतून
करकरत...

रात्र...
तिची ओल
उभी साऱ्या देहात
सळसळत कोपऱ्यांत
कोलमडत पावलांखाली

रात्र...
पलीकडे
स्तब्ध षड्ज करुण
भळभळत

रात्र उभी
रात्र आडवी
• • •

तीन कविता : विष्णू सोळंके

१. वारी

पंढरीला पायी चालणारी वारी
भावभक्तीमध्ये रंगणारी वारी

देव विठ्ठलाच्या दर्शनाची ओढी
कीर्तनाच्या संगे नाचणारी वारी

सोहळा सुखाचा चंद्रभागे काठी
आनंदाचा ठेवा वाटणारी वारी

कैवल्याची मूर्ती पांडूरंग माझा
माय रुक्मिणीला भेटणारी वारी

सुख दुःख सारे विठ्ठलाचे पायी
सोहळा सुखाचा पाहणारी वारी

चालतेली दिंडी रोज भाविकांची
पंथ, भेदाला या सारणारी वारी

• • •

२. वनवास उर्मिलेचा...

कोणास याद आहे वनवास उर्मिलेचा
रामायणात नाही आक्रोश उर्मिलेचा


पृथ्वी दुभंगल्याचे सान्यास ज्ञात आहे
का मात्र ठाव नाही 'गळफास' उर्मिलेचा

पारायणे कशी ही सप्ताह गावगावी?
पारायणात नाही 'लवलेश' उर्मिलेचा

घोटाळतात तिच्या डोळ्यांत मूक धारा
बंदिस्त पिंजऱ्याचा प्रवास उर्मिलेचा

सौभाग्य हे कशाचे, दुर्भाग्य हे कुणाचे
सांगू नये कुणी का इतिहास उर्मिलेचा?

• • •





३. दुःख माझे मला...

दुःख माझे मला
संगती सोबती
सुख हे भोवती
सांत्वनाला ।।

उपाशी पोटाला
पाण्याचा आधार
झाला निराधार
जगन्नाथ ।।

दगडाची उशी
झोपडी महाल
रातंदिन हाल
पामरांचे ।।

झोपले उपाशी
'राजहंस' बाळ
मोडकासा खेळ
आयुष्याचा ।।

विठू माझा उभा
चिंता त्याला नसे
जगायचे कसे
रुक्मिणीने ।।

• • •

पंचवीस हायकू

शशिकांत हिंगोणेकर

•
कुठले ऋतू
या झाडाने झेलले
निष्पर्ण झाले

•
सभोवताली
गर्दी दुःखांची झाली
रात्र जळाली

•
गुंतला जीव
अनामिक दुःखात
रोज गुंत्यात

•
दुःखाचे घट
किती दरे भरले
नाही संपले

•
थांबावे सारे
दुःखाचे काळे वारे
छलचक्र रे

•
शब्दांनी तुझ्या
मौनरूप घेतले
ऋतू उडाले

•
पक्ष्यांनी कसे
घरटे सुने केले
श्वास पांगले

•
पाऊस येतो
श्वासांना भिजवतो
मुळाशी जातो

•
या मोसमात
डोळे भरून आले
तूच पुसले

•
कुठले नवे
पर्व तू आरंभले
झाड जळाले

•
आकाश माझे
हरवलेय कुठे ?
सुने घरटे

•
तुझे हुंकार
काळजास स्पर्शती
तार छेडती

•
रात्र जागीय
दार मनाचे कुणी
उघडलेय

•
आयुष्य सारे
प्रवासात संपले
टोल वाजले

•
जरा भिजावे
अनोख्या पावसात
चिंब मनात

•
नाही संपली
ही ऋतूंची परीक्षा
रोज प्रतीक्षा

•
ऋतूंचे रंग
कितीदा उडतात
पुन्हा येतात

•
पान पिवळे
गळण्यास आतुर
नदीला पूर

•
किती भिजावे
ओल्या रे पावसात
रोज स्वप्नात

•
खिडक्या साऱ्या
मनाच्या उघडल्या
चिमण्या आल्या

•
पाऊस असा
सतत बरसला
पूरच आला


•
वाहून गेली
माझ्या स्वप्नांची पिसे
दुःखाचे धुके

•
स्वप्नांची माती
कितीदा उपसावी
खोल तळाशी

•
दुःखाची काळी
घनदाट सावली
उदासलेली

•
शब्द भिजले
दुःखाच्या शाईत
अवतरले

• • •



। प्रतिक्रिया

प्रमाणलेखनाचे सुलभीकरण

▫ डॉ. मनोहर रोकडे

मराठीच्या प्रमाणित लेखनाचे विद्यमान नियम व पोटनियम असे मिळून एकूण ६१ नियम आहेत. त्यात कितीतरी नियमांना अपवाद आहेत. त्यामुळे एखादा शब्द नियमात बसतो की तो अपवाद आहे हे ओळखणे भल्याभल्यांना कठीण झाले आहे. तिथं गडचिरोलीपासून मेळघाटपर्यंत सामान्य माणसांची काय कथा? याचे कारण विद्यमान नियम निश्चित दृष्टिकोन नसलेले, संस्कृतप्रभावित, संख्येने खूप जास्त आणि समाजविन्मुख आहेत. हे नियम समाजाभिमुख, लवचीक आणि संख्येने कमीतकमी असणे ही काळाची व समाजाची गरज आहे; कारण भाषा ही सामाजिक संस्था आहे. मराठी माणसाने मराठीप्रमाणे चालावे, इतरांचे अनुकरण करू नये.

अनुस्वार :

अनुस्वारासंबंधी एकच नियम असावा. उच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदा. चिंच, आंबा किंवा संशय, संवाद किंवा लोकांचे, मुलांना इत्यादी याव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

ऱ्हस्व-दीर्घ :

यात खरा घोटाळा आहे. कारण यात वर्गीकरणाचा अभाव तर आहेच; पण बहुतेक नियम अपवादांनी बद्ध आहेत. हे अपवाद बहुतांश तत्सम शब्दांचे आहेत. वास्तविक संस्कृत शब्द जेव्हा मराठीत येतात तेव्हा ते तत्सम बनतात, म्हणजेच संस्कृत शब्दांनी तत्सम बनून मराठीचे रूप घेतलेले असते, म्हणून त्यांना अपवाद न ठेवता त्यांचे लेखन मराठी नियमांनीच व्हायला पाहिजे. संस्कृतची प्रकृती अन्त्याक्षर ऱ्हस्व व उपान्त्याक्षर दीर्घ लिहिण्याची आहे. उदा. 'नीति' मधील नी दीर्घ आणि ति ऱ्हस्व. इतरही बरेच शब्द याचप्रकारचे. ही पद्धत मराठी प्रकृतीला विरोधी आहे. मराठीत अंत्याक्षर दीर्घ उच्चारण्याची प्रकृती आहे. यामुळेच अन्त्याक्षर दीर्घ लिहावे असा मराठी शुद्धलेखनाचा नियमही आहे. मराठी शुद्धलेखनाचे वर्गीकरण केले तर असे दिसून येते की असे केवळ चारच नियम आहेत की जेथे दीर्घ अक्षरे लिहावी लागतात.


१. एक अक्षरी शब्द - एक अक्षरी शब्द दीर्घ लिहावेत. उदा. मी, ती, जी, की इ. 'नि' या शब्दाचा अपवाद. यांना प्रत्यय लागले की ते एक अक्षरी शब्द राहात नाहीत म्हणून त्यांचे दीर्घत्व नष्ट होते. उदा. जिला, तिचे, तुझे इत्यादी. श्री व स्त्री हे शब्द याला अपवाद राहतील.

२. सर्वच शब्दांचे शेवटचे ईकार-ऊकार दीर्घ लिहावेत. उदा. मती, माहिती, उपस्थिती इत्यादी. याला आणि, परंतु व सर्व तत्सम अव्यये अपवाद आहेत. म्हणून अति, प्रति, यथामति

इत्यादी शब्दांचे अन्त्याक्षर ऱ्हस्व लिहावे लागते. हे सर्व अपवाद वगळून, आणि, परंतु, तथापि हे तीनच अपवाद ठेवावेत.

३. अनेकाक्षरी शब्दांना प्रत्यय लागले तरी अन्त्याक्षराचे दीर्घत्व बदलत नाही. उदा. नदी-नदीला, गरिबी-गरिबीमुळे, परिस्थिति-परिस्थितीप्रमाणे.

पण सामासिक शब्दात पूर्वपदातील तत्सम, इकारान्त-उकारान्त ऱ्हस्व लिहावे, असा विद्यमान नियम आहे. उदा. बुद्धिवैभव, कीर्तिप्रद. प्रत्यय लागले तरी दीर्घ पण सामासिक शब्दात ऱ्हस्व अशी ही ऱ्हस्व-दीर्घाची कसरत घोटाळ्याची बनली आहे. म्हणून अनेकाक्षरी शब्दांना प्रत्यय लागले तरी त्यांचे दीर्घत्व जसे बदलत नाही तसेच समासातही त्यांचे दीर्घत्व कायम राहील असा साधा, सरळ व सुटसुटीत नियम असावा.



४. अकारान्त शब्दांचे उपान्त्य ईकार-ऊकार दीर्घ लिहावेत, असा नियम आहे. उदा. गरीब, वकील, सून. याला अपवाद तत्सम शब्दांचा. उदा. मधुर, प्रचुर इत्यादी. या अपवादामुळे 'शिबीर' मधला 'बी' नियमाप्रमाणे दीर्घ लिहायचा सोडून ऱ्हस्व लिहावा लागतो. 'देखील' मधील खी दीर्घ तर 'अखिल' मधील 'खि' ऱ्हस्व लिहावा लागतो, असा प्रचंड घोटाळा होतो. संस्कृतमध्ये इक प्रत्यय ऱ्हस्व म्हणून मराठीतही ऱ्हस्व लिहितात. उदा. धार्मिक, वास्तविक इत्यादी.

प्रमाणलेखनाचे सुलभीकरण करायचे असेल तर तत्सम शब्दांचे हे सर्व अपवाद गाळायला हवेत.

इथे एक आक्षेप असा येऊ शकतो की, सुत ऱ्हस्व सूत दीर्घ, रवि आणि रवी, सुर- सूर, परि-परी यात ऱ्हस्वदीर्घामुळे अर्थभेद होतो. तेव्हा सर्वच ईकार-ऊकार दीर्घ कसे लिहिता येतील? वरवर पाहता आक्षेप अर्थपूर्ण वाटत असला तरी मुळात तो भ्रामक आहे. शब्दांचा अर्थ वाक्याच्या संदर्भाने घ्यायचा असतो. तो वर्णांच्या ऱ्हस्वदीर्घामुळे नव्हे. भस्मासुर आणि गाण्याचे सूर ह्यातील अर्थभेद सामान्य माणूसही जाणतो. 'तिच्या जीवनात प्रकाश आला' या वाक्यातील 'प्रकाश' या शब्दात तर कुठे ऱ्हस्वदीर्घाला जागाच नाही. तरीही संदर्भाने लोक प्रकाश म्हणजे उजेड की व्यक्ती हे बरोबर जाणतात. तेव्हा हा आक्षेप निराधार आहे. द्व्यर्थी शब्दांचा अर्थ संदर्भानेच घ्यावा लागतो.

५. आकारान्त, इकारान्त, एकारान्त व उकारान्त शब्दातील उपान्त्य इकार-ऊकार ऱ्हस्व लिहावेत असा नियम आहे. तो बरोबर आहे. उदा. किडा, दिवा, गरिबी, माहिती. पण यालाही तत्सम शब्दांचे विनाकारण अपवाद आहेत. उदा. क्रीडा, भीती, परीक्षा इत्यादी. या अपवादामुळे किडा ऱ्हस्व तर क्रीडा, क्रीडांगण दीर्घ, दिवा ऱ्हस्व तर दीपा दीर्घ, दिवाळी ऱ्हस्व तर दीपावली दीर्घ अशी विसंगती निर्माण होते. तत्सम शब्दांचे अपवाद काढून टाकले पाहिजेत तरच प्रमाणलेखन सुकर व सुलभ होईल.

याच नियमांच्या संदर्भात आणखी एक प्रश्न असा निर्माण होतो की अन्त्याक्षर अकारान्त आहे पण ते जोडाक्षर आहे तर त्यालाही हाच नियम लागू पडतो काय? जर जोडाक्षर रफारयुक्त म्हणजे आघातहीन असेल तर हा नियम लागू पडतो. उदा. सूर्य, पूर्व इत्यादी. पण ते आघातयुक्त असेल तर मात्र हा नियम लागू पडणार नाही. उदा. मित्र, इष्ट, रिक्त, घनिष्ठ, वरिष्ठ इत्यादी.

६. संधिनियमाने होणारे दीर्घत्व कायम राहील. उदा. रवि + इंद्र = रवींद्र, महींद्र इत्यादी.

दीर्घ कुठे कुठे लिहावे याचे विद्यमान नियमात एवढेच नियम आहेत. यावरून चार प्रश्नीय सूत्र तयार होते.

१. शब्द एक अक्षरी आहेत काय? त्याला प्रत्यय लागलेले नसावेत. श्री व स्त्री अपवाद.

२. नि, आणि, परंतु, तथापि हे शब्द वगळता शब्दाचे अन्त्याक्षर इकारान्त-उकारान्त आहेत काय? हे शब्द समासातील पूर्वपदात असोत किंवा त्यांना प्रत्यय लागलेला असो.

३. अकारान्त शब्दांच्या उपान्त्य अक्षरात ई, ऊ, ए, ओ आहे काय? अकारान्त जोडाक्षर आघातहीन आहे काय?

४. संधिनियमाने दीर्घत्व येते काय?

यापैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर

होकारात्मक आले तरच दीर्घ लिहा. एरवी सर्व अक्षरे ऱ्हस्व लिहा. वेगळ्या नियमांची गरज नाही.

जोडाक्षरे :

१. ब्रम्ह व त्यापासूनचे ब्रम्हदेव, ब्रम्हचर्य, ब्रम्हपुरी, ब्राम्हण इत्यादी. शब्द 'ह' ला 'म' जोडून लिहितात. हे चूक आहे कारण यांचा उच्चार ब्रह्म असा होत नसून ब्रम्ह असा होतो. शिवाय इतर जोडाक्षरात 'ह' हा महाप्राण जोडाक्षराच्या शेवटी येत असतो. उदा. म्हणून, म्हणजे, चिन्ह, न्हाणे इत्यादी. याचाच अर्थ ब्रम्ह व तज्जन्य शब्दातही 'म' ला 'ह' जोडणे अधिक उच्चारशुद्ध व शास्त्रशुद्ध ठरते. अर्थात म् ला ह जोडणेच शुद्ध मानले पाहिजे. ब्रम्हचा अपवाद नको.

२. जेथे द् + ध असे जोडाक्षरे येते, तेथे ध हा वर्ण द च्या पोटात लिहितात. जोडाक्षर नियमाच्या दृष्टीने ते योग्यच आहे. उदा. बुद्ध, शुद्ध इत्यादी; पण लोकांच्या लेखनात व दूरचित्रवाणीवरही आधी 'ध' व नंतर 'द' असे येते. कारण ते लेखनसुलभ आहे. तेव्हा लोकांना दुरुस्त करण्याऐवजी आपण विद्वानांनी दुरुस्त होणे अधिक इष्ट होय. भाषाविज्ञान वर्णस्थलांतर मान्य करते. उदा. 'उपानह' मध्ये 'न' हे उपान्त्य आणि 'ह' हे अन्त्य अक्षर आहे, तर यापासूनच बनलेल्या 'वहाण' या शब्दात नेमके उलटे म्हणजे 'ह' हे उपान्त्य आणि 'न' हे अन्त्य अक्षर आहे. आधीचा वर्ण नंतर येणे आणि नंतरचा वर्ण आधी येणे हे कुठार-कुऱ्हाड, स्नुषा-सून इत्यादी शब्दांत येणारे स्थलांतर जर भाषाविज्ञान शुद्ध समजते तर स्थलांतराचा आधार घेऊन भाषाविज्ञानाच्या आश्रयाने आधी 'ध' व नंतर द असे लेखन शुद्ध मानायला हरकत नाही. 'द्' ला 'ध' हे तत्सम म्हणून आणि 'ध' ला 'द' हे तद्भव म्हणून दोन्ही प्रकारचे लेखन शुद्ध मानता येईल.

३. महत्त्व, सत्त्व, तत्त्व यात दोन 'त', 'उज्ज्वल' मध्ये दोन 'ज', 'तज्ज्ञ' मध्ये 'ज' ला 'ज्ञ' असे लिहायचे असते. ते व्युत्पत्तीने सिद्ध होणारे असले विद्वान सोडून कोणीही असे लेखन करण्याच्या भानगडीत पडत नाही. कारण त्यात वित्त, मत्त, अत्तर, हत्ती असे आघात नाहीत. येथे व्युत्पत्तीने सिद्ध होणारेही अनुस्वार जसे आपण गाळले आहेत त्याचप्रमाणे आघातहीन 'त' किंवा 'ज' चे द्वित्व गाळायला हवे. व्याकरणात जसे पररूपसंधीमध्ये पहिला स्वर लोप पावतो आणि फक्त दुसरा स्वर कायम राहतो. उदा. 'पाहून' या शब्दात पाह+हुन यांचा संधी वास्तविक पाहोन असा व्हायला पाहिजे; पण पहिला अ जसा लोप पावल्यामुळे 'पाहून' हा शब्द शुद्ध ठरला आहे, तसे आघातहीन दोन 'त' किंवा दोन 'ज' मधील पहिला ज लोप पावला असे म्हणता येईल व उज्ज्वल (दोन ज) उज्वल (एक 'ज' चा लोप) उजळ ('व' चा लोप) अशी व्युत्पत्ती दाखवता येईल. याचप्रमाणे 'तज्ज्ञ' मधील 'ज' वगळता येईल. प्रमाणलेखनाचे सुलभीकरण असे व्हावे म्हणजे माणूसही सहज प्रमाणित शुद्ध लिहू शकेल.


• • •

लेखकांसाठी सूचना

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक **युगवाणी**

- साहित्य कागदाच्या एकाच बाजूने व सुवाच्य अक्षरांत लिहिलेले किंवा संगणकीय अक्षरजुळणीच्या स्वरूपात पाठवावे.
- लेखकांनी 'युगवाणी'साठी लेखन पाठविताना एक स्थळप्रत आपल्याजवळ राखून ठेवावी.
- 'युगवाणी'साठीचे लेखन इतरत्र प्रकाशित झालेले नसावे. लेखनाची छायाप्रत (Xerox) पाठवू नये.
- पत्रव्यवहारासाठी पुरेसे टपाल जोडावे. भ्रमणध्वनी क्रमांक वा ई-मेल दिल्यास उत्तम.
- आपले लेखन मराठी प्रमाणलेखनाच्या नियमांनुसार असावे. तसेच संपादकांना संबोधणारे पत्र जोडावे.
- 'युगवाणी'ला नव्या प्रवाहांचे, नव्या जाणिवांचे आणि सर्जनाच्या नव्या शक्यता धुंडाळणारे सशक्त लेखन हवे आहे.
- लेखकांनी आपले लेखन डॉ. अनिल नितनवरे, 'जातक', २३/२४, स्नेहनगर, नागपूर मार्ग, भंडारा - ४४१ ९०४ या पत्त्यावर पाठवावे.

अनुक्रमणिका



| टिपणे

भवभूती : एक संस्मरण

▫ सुमन्त देशपांडे

ये नाम केचिदेह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्ति ते किमपि तान् प्रति नैषयत्नः।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी।।

''जे अहंमन्य लोक आमची अवज्ञा करीत आहेत, त्यांच्यासाठी मी हे नाटक लिहिलेले नाही. माझ्याशी समान-धर्मा असलेला कोणी रसिक पुढे-मागे उत्पन्न होईल, असा मला भरवसा आहे. कदाचित असा रसिक सध्याही कुठेतरी असेल. कारण पृथ्वी विशाल आहे आणि काळ अनंत आहे. असे रसिकच माझ्या कृतीचे योग्य मूल्यमापन करू शकतील.'' विख्यात कवी भवभूतीचे हे उद्गार आहेत.

भवभूतीचा आपल्या काव्याविषयी असलेला आत्मविश्वास तर या उद्गारात आहेच; पण त्याहीपेक्षा त्याने प्रकट केलेला दुर्दम्य आशावाद विशेष महत्त्वाचा आहे. भवभूती काहीशा गंभीर वृत्तीचा आणि तापट स्वभावाचा असला पाहिजे असे त्याच्या नाटकांवरून वाटते. स्वतःच्या विद्वत्व, कवित्व, रसिकत्व इ. गुणांची त्याला यथार्थ जाणीव होती. विद्वत्तेप्रमाणे साहित्य-निर्मितीतही आपण सर्वश्रेष्ठ गणले जावे, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती म्हणून त्याने 'महावीरचरिता'चे पाच अंक लिहून झाल्यावर ते तत्कालीन विद्वानांना, रसिकांना परीक्षणार्थ दिले; पण रसिकांनी त्याचे नाटक कमी प्रतीचे असल्याचे ठरविल्यावरून व त्यातील काही दोष दाखविल्यावरून, भवभूतीला या दोषदिग्दर्शनाचा राग आला आणि त्याने वरील वक्तव्य केले.

इसवी सनाच्या आठव्या शतकात संस्कृत नाटककार भवभूती होऊन गेला. त्याने 'महावीरचरित', 'मालती माधव' व 'उत्तररामचरित' अशी तीन नाटके लिहिली. डॉ. वा. वि. मिराशी यांनी त्याच्या रचनेचा काळ इ.स. ७०० ते ८०० असा ठरविला आहे. भवभूतीचे पूर्वज दक्षिणपथातील पद्मपूर नामक नगरात राहात असत. विदर्भाच्या भंडारा जिल्ह्यातील आमगावजवळचे सध्याचे पद्मपूर हेच प्राचीन होय, असे डॉ. मिराशी यांनी सिद्ध केले आहे. इथेच भवभूतीचा जन्म झाला. कविकुलगुरू कालिदास आणि भवभूती ही संस्कृती नाट्यसाहित्याची दोन उत्तुंग शिखरे आहेत. कालिदास हा निःसंशय श्रेष्ठ प्रतिभावंत आहे. परंतु भावनोत्कटता, कल्पक काव्यात्मता आणि रसप्रतिती देण्याचे सामर्थ्य या आपल्या अंगच्या गुणवैशिष्ट्यांमुळे भवभूती हासुद्धा कालिदासाचा प्रतिस्पर्धी जरी नाही तरी तो ज्याच्या जवळपास येणारा आहे असे मानण्यास प्रत्यवाय नाही.

कालिदास आणि भवभूती हे दोघे आपापल्या परीने थोर असले तरी उभयंतांमध्ये एक मोठा भेद

अनुक्रमणिका

आहे. कालिदासाबद्दल चरित्रविषयक फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. स्वतःचा काळ, कुलपरंपरा आणि नाट्यविषयक कर्तृत्व याविषयी त्याने आपल्या साहित्यातून काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे त्याच्या इतिहासाबद्दल रसिक अंधारातच राहिलेले आहेत. याउलट भवभूतीने मात्र आपल्या नाटकांच्या प्रास्ताविकातून स्वतःसंबंधी बरेच काही सांगितले आहे. महावीरचरित या नाटकाच्या प्रास्ताविकात त्याने पद्मपूर या गावाचा निर्देश केला आहे. काश्यप मुनींचे गोत्रज असलेले उदुंबर हे भवभूतीचे घराणे अनेक पिढ्यांपासून पद्मपूर गावी राहात असे. कृष्णयजुर्वेदाच्या तैत्तरीय शाखेचे अनुयायी असलेले उदुंबर पंचाग्नी साधन करीत व सोम पीत. अत्यंत पवित्र आचरणाचे हे निष्ठावंत ब्राह्मण असून सूक्ष्म ब्रह्मज्ञानाची चर्चा करण्यात त्यांचा हातखंडा असे. या घराण्यात 'महाकवी' नामक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला, त्याने वाजपेय यज्ञ केला होता. या महाकवीपासून पाचव्या पिढीत भवभूती जन्मला. भट्टगोपाल-नीलकंठ-भवभूती अशी त्यांची वंशावळ असून भवभूतीच्या आईचे नाव जातुकर्णी असे होते तर त्याच्या गुरूचे नाव 'ज्ञाननिधी' होते. भवभूतीच्या विविध शास्त्रकलांमधील नैपुण्यावरून त्याचा गुरू खऱ्या अर्थाने ज्ञानसागर असला पाहिजे असे वाटते.

भवभूती हा आपल्या काळात पट्टीचा विद्वान गणला जात असे. व्याकरण, न्याय, तर्कशास्त्र यावर त्याचे प्रभुत्व होते. वेद, उपनिषदे, सांख्य आणि योग यांचा त्याने कसून अभ्यास केला होता. तत्त्वज्ञानाच्या सहा शाखा, काव्य, नाट्य यांचे त्याने केलेले सूक्ष्म अध्ययन त्याच्या साहित्यातून प्रकट झाले आहे. योगशास्त्राविषयीचे त्याचे ज्ञान 'मालती माधव' नाटकाच्या पाचव्या अंकात प्रत्ययाला येते. उपनिषदांमधील साहित्याचे संदर्भही तो आपल्या लेखनातून देतो. भवभूती हा प्रतिभासंपन्न कवी होता. त्याची नाटके म्हणजे नाट्यमय काव्येच होत. तो वेदांती पंडित होता; परंतु त्याची नाटके पांडित्यजड झाली नाहीत. उलट वेदांती बैठकीवर जीवनाची व्यापक आणि सखोल जाणीव त्याने आपल्या नाटकातून व्यक्त केली. त्याचे अंतःकरण कवीचे होते आणि त्याच्यातला कवी त्याच्या नाटकातून प्रकर्षाने प्रकट झालेला आहे. समकालीन नटवर्गाशी त्याचे सलोख्याचे संबंध असून त्यांच्या हातात त्याने आपल्या नाट्यकृती सोपविल्या होत्या.

'भवभूती' हे नाव या नाटककाराला कसे मिळाले याबद्दल वेगवेगळ्या आख्यायिका प्रचलित आहेत. सामान्यतः असे दिसते की भवभूती हे त्याचे जन्मनाव होते आणि 'श्रीकंठ' ही पदवी त्याच्या चाहत्यांनी त्याला प्रेमाने व गौरवाने दिली होती. स्वतः भवभूती आपला उल्लेख 'श्रीकंठपदलांच्छन भवभूतिर्नाम' असा करतो. याउलट काही टीकाकार असे मानतात की 'श्रीकंठ' हेच त्याचे मूळ नाव असून 'भवभूती' ही त्याला दिलेली गौरवसूचक पदवी आहे. 'भवभूती' या शब्दाचीही अनेक कल्पनारम्य स्पष्टीकरणे टीकाकारांनी दिलेली आहेत. भव म्हणजे शंकर, त्याने प्रसन्न होऊन या कवीला आपली विभूती दिली आणि त्यामुळे त्याला 'भवभूती' हे नाव मिळाले किंवा त्याने ते आपणहून धारण केले. पण हा नंतरच्या काळातील टीकाकारांचा तर्कविलास असावा.

कालिदास आणि भवभूती हे दोघेही संस्कृतमधील थोर मानले गेलेले नाटककार! दोघांनाही रसिकांचा फार मोठा प्रेमादर लाभलेला. अर्थात त्यांच्यामध्ये कलावंत म्हणून तुलना व्हावी हे अपरिहार्य होते. या तुलनेत उभयतांमधले सरसनीरसत्व सिद्ध करण्यासाठी त्यांच्या चाहत्यांनी काही आख्यायिकाही निर्माण केल्या आहेत त्यातली एक आख्यायिका :

राजा भोज याने या उभय कवींना एक विषय देऊन त्यावर प्रत्येकाला काव्यरचना करण्यास सांगितले. त्यानंतर सर्वजण भुवनेश्वरी देवीच्या मंदिरात गेले आणि तिथे राजाने दोन्ही कवींची रचना ज्यावर लिहिली होती ती भूर्जपत्रे देवीसमोर ठेवलेल्या तराजूच्या दोन्ही पारड्यात टाकली. भवभूतीच्या कवितेचे पारडे हलके असल्यामुळे वर गेले. कालिदासाच्या कवितेचे पारडे खाली टेकले. तथापि भवभूती कमी ठरावा हे भुवनेश्वरीला योग्य वाटले नाही. तिने आपल्या हातातील कमळामधला एक मधबिंदू भवभूतीच्या पारड्यात टाकला. त्याबरोबर दोन्ही पारडी एकदम समान पातळीवर आली. कालिदास आणि भवभूती दोघेही कवित्वगुणात तुल्यबळ ठरले.


भवभूतीने आपले 'उत्तररामचरित' नाटक लिहिल्यावर ते कालिदासाला वाचून दाखविले. कालिदास त्यावेळी बुद्धिबळाचा पट मांडून बसला होता. नाटक ऐकताना तो खेळातच गुंग झाला होता. तेव्हा त्याने आपले नाटक लक्षपूर्वक ऐकले नसावे असे वाटून भवभूती मनातून काहीसा खट्टू झाला. पण वस्तुस्थिती

वेगळी होती. कालिदासाने भवभूतीचे नाटक लक्षपूर्वक ऐकले होते. नाटकाचे वाचन संपले तेव्हा कालिदासाने 'उत्तररामचरित' नाटकाचे मनापासून कौतुक केले आणि भवभूतीची तोंडभरून प्रशंसा केली. मात्र त्याने नाटकाच्या पहिल्या अंकात (१.२७) राम दण्डकारण्यात असताना आपण सीतेबरोबर गुजगोष्टी करीत कशा रात्री घालविल्या ते सांगताना म्हणतो :

किमपि किमपि मन्द मन्दमासक्तीयोगादविरलित
कपोलं जल्पतोक्रमेण।

अशिथिल परिरम्भ व्यापृते कैक दोष्णोः
अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत।।

या श्लोकाच्या चतुर्थ चरणातील 'एवम' या शब्दातील अनुस्वार गाळावा अशी सूचना कालिदासाने केली व भवभूतीने ती मान्य केली. मुळात ती काव्यपंक्ती 'अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरसीत' अशी होती आणि तिचा अर्थ राम व सीता वनवासात रात्री परस्परांशी गोष्टी बोलत त्यावेळी 'प्रहरामागून प्रहर जाऊन रात्र कशी संपे' हा होता. कालिदासाने 'एवं' वरील अनुस्वार काढण्यास सांगितले तेव्हा त्या ओळीचा अर्थ 'प्रहर कसे गेले हे न कळता रात्रच अचानक संपून गेली, गोष्टी संपल्याच नाहीत' असा झाला. या लहानशा बदलामुळे मूळच्या काव्यपंक्तीचा अर्थ अधिक उत्कट आणि सुंदर झाला आहे व तिची रसवत्ता कितीतरी वाढली. या दोन्ही आख्यायिका मनोरंजक असून त्यात मार्मिकता व कल्पनारम्यता आहे. मात्र वास्तवाचा त्यात लवलेश नाही; कारण इथे दोन्ही कवींचे समकालीनत्व गृहीत धरले आहे ते चूक आहे. अनेक समीक्षकांनी व टीकाकारांनी कालिदास ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकात तर भवभूती हा आठव्या शतकात होऊन गेला हे पुराव्यानिशी सिद्ध केले असल्याने भवभूती, कालिदासाचा उत्तरकालीन ठरतो. भवभूती स्वतंत्र प्रज्ञेचा कवी असला तरी त्याने



कालिदासाचे बारकाईने वाचन केले असावे. कालिदासाच्या काही काव्यकल्पनांचे पडसाद त्याच्या लेखनात उमटलेले दिसतात. कालिदास व भवभूती हे दोघेही श्रेष्ठ प्रतिभावंत असल्याने त्यांच्यात तुलना करण्याचा मोह अनेक समीक्षकांना झाला असल्यास नवल नाही.

कालिदासाला राजाश्रय होता, तर भवभूती लोकाश्रयी कवी होता. त्याच्या नाटकांचे प्रयोग कालप्रियनाथाच्या जत्रेत होत असत.

कालिदास व भवभूती दोघेही स्वतंत्र प्रज्ञेचे नाटककार आहेत. त्यांची कलादृष्टी सुजाण असून भाषेवरील प्रभुत्व असामान्य आहे. शब्दांची निवड, वृत्तरचनेतील विविधता हेही त्यांचे गुण लक्षणीय आहेत, मात्र दोघांच्या शैलीत फरक आहे. कालिदास हा आपल्या वैदर्भी शैलीबद्दल विख्यात आहे तर भवभूती अनेक ठिकाणी वैदर्भी शैलीचा वापर करून सहजसुंदर रचना करीत असला तरी गौडी शैलीत समासांची भरपूर योजना करून क्लिष्ट, दुर्बोध रचना करणे हेही त्याचे एक वैशिष्ट्य आहे.

कालिदास अधिक कल्पक तर भवभूती जास्त भावनाशील आहे कालिदासाने प्रणयाची, शृंगाराची मोहक चित्रे रंगविली आहेत तर भवभूतीच्या साहित्यात करुण आणि वीररसाचा उत्कट आविष्कार आढळून येतो.

दोघेही कवी निसर्गाशी समरस होतात; पण भवभूतीची निसर्गवर्णने अधिक चित्रदर्शी आहेत. वर्णनात नाजूकपणा, कोमलपणा याऐवजी भव्य व उदात्ततेचा प्रत्यय देणे त्याला अधिक रुचते.

प्रचंड अरण्ये, विशाल पर्वतरांगा, वेगाने कोसळणारे धबधबे, अरण्यातील विविध प्राणी यांची चित्तवेधक वर्णने भवभूती करतो, ती दृश्ये डोळ्यांसमोर उभी करतो.

कालिदास निसर्गातील सौम्य मृदु, आल्हाददायक अशा रूपांचा आविष्कार घडवतो; पण याच निसर्गाचे

अनुक्रमणिका

उग्र, रौद्र, भयकारक असे चित्रण बघावयाचे असेल तर त्यासाठी भवभूतीच्या नाटकांकडे वळावे लागेल.

कालिदासाने आपल्या नाटकांमधून समकालीन राजेलोक, त्यांची प्रेमशृंगाराची प्रकरणे, सुखदुःखे राजसभेतील लोकांचे रीतिरिवाज या गोष्टी मुख्यत्वाने दाखवून दिल्या आहेत. तर भवभूतीने आपल्या काळातले लोकजीवन प्रामुख्याने चित्रित केले आहे.

भवभूतीने एकूण तीन नाटके लिहिली. त्यात

१) महावीरचरितम् - हे भवभूतीचे पहिले सात अंकी नाटक! यात रामायण कथेचा पूर्वार्ध आला आहे, म्हणजे रावणवध होऊन रामास राज्याभिषेक झाला इथपर्यंतचा कथाभाग आला आहे. या नाटकावर भासाच्या 'अभिषेक' नाटकाची छाप उमटलेली दिसते. हे त्याचे पहिलेच नाटक असल्याने नाट्यनिपुणता परिणत झालेली दिसत नाही. भाव व भाषा असावी तशी उदात्त नाही. नाटकाचा प्रधान रस वीररस आहे. राम, परशुराम, वाली इत्यादींच्या बाबतीत तो व्यक्त रूपात असून वशिष्ठ, विश्वमित्रादिकात तो सूक्ष्म रूपात आहे. रामाच्या चरित्रावर जे आक्षेप घेतले जातात त्याचे निराकरण या नाटकातून केले आहे. याच नाटकाला विद्वानांनी कमी प्रतीचे ठरविले. त्यावरून भवभूती रागाच्या भरात महावीरचरित अर्धेच सोडून घर त्यागून उत्तरेत निघून गेला. महावीरचरिताच्या पाचव्या अंकातील ४६ व्या श्लोकानंतरचा भाग आणि सहा व सात हे अंक सुब्रह्मण्य नामक कवीने रचले असे महावीरचरिताचा टीकाकार वीरराघव याने सांगितले आहे.

२) मालती माधव - रागाच्या भरात भवभूती पद्मपुराहून निघाला तो तडक मध्य प्रदेशातील पद्मावती नगरात गेला. तिथे त्याने बराच काळ घालविला. 'मालती माधव' या नाटकातील कथानक घडल्याचे दाखविले आहे. त्या अनुषंगाने तिथल्या नद्या, देवालये व वाडे यांचे उल्लेख व वर्णन त्यात आले आहे. तथापि या नाटकाचा पहिला प्रयोग पद्मावती येथे न होता तो कालप्रियनाथ यात्रेत झाला. हा कालप्रियनाथ म्हणजे उज्जयिनीचा महाकाल असे काही विद्वानांना वाटते; पण वा.वि. मिराशी म्हणतात कालप्रियनाथ म्हणजे सूर्य असून कालप्रिय म्हणजे कन्नौजच्या दक्षिणेस यमुनातीरावरील काल्पी होय. कन्नौजचा राजा यशोवर्मा ह्याचा आश्रय मिळाल्यानंतर हा वैदर्भीय कवी माळव्यात गेला असावा. कालप्रियनाथाच्या यात्रेतच त्याच्या तीनही नाटकांचे प्रयोग झाले. मालती माधव हे १० अंकी नाटक आहे, यातील कथा स्वतंत्र असली तरी तिला बृहत् कथेतील एका कथेचा आधार आहे. हे नाटक म्हणजे यौवनातील उन्मादक प्रेमाचे सरस वर्णन आहे.

मालती भुरिवसूची कन्या व माधव देवराताचा पुत्र या दोघांचा विवाह व्हावा अशी दोघाही पित्यांची इच्छा होती, परंतु ज्या पद्मावतीच्या राजाचा भुरिवसू अमात्य होता, तो राजा मालतीचा विवाह नंदनशी व्हावा अशी इच्छा धरून होता. एकदा माधवाचा मित्र मकरंद मदयन्तिकेस-मालतीच्या मैत्रिणीस वाघाच्या जबड्यातून सोडवितो, तेव्हापासून मकरंद व मदयन्तिका परस्परांवर अनुरक्त बनतात. राजाज्ञेने मालती व नंदन यांचा विवाह होणार म्हणून विरक्त झालेला माधव स्मशानात जातो; पण कर्मधर्मसंयोगाने कपाल कुंडला नावाची अघोरघंटाची शिष्या आपल्या तांत्रिक गुरूला मोठी सिद्धी प्राप्त करून देण्यासाठी मालतीला पळवून नेते. स्मशानातील चामुण्डेला हे स्त्रीरत्न बळी देण्याची ते तयारी करतात; पण मालतीच्या आक्रोशाने तेथे गेलेल्या माधवास हे कळते तो अघोरघंटाचा वध करून मालतीची सुटका करतो. इकडे मकरंद मालतीचा वेष घेऊन नंदनशी विवाह करतो व त्याच रात्री मदयन्तिकेला घेऊन पळून जातो. माधव मालतीला सुखरूप एकीकडे ठेवतो, तेथून तिला पुन्हा कपालकुंडला पळवून नेते. पण सौदामिनी नावाची योगिनी यावेळी तिची सुटका करते. याप्रमाणे अनेक संकटांतून पार पडलेले हे जोडपे राजाज्ञेने विवाहबद्ध होते. हे नाटक म्हणजे गद्यपद्यात्मक अद्भुत कथा असून 'भून्मा रसानां गहनाः प्रयोगाः' याप्रमाणे अनेक रसांचा यात प्रयोग केलेला आहे. नाटकात चमत्कार आहेत. चामुण्डा व वनपशूंची वर्णने भयंकर आहेत. मनुष्यस्वभावाच्या नाजूक, करुण, मृदु भावनांची तार छेडताना भवभूतीचा हात धरणारा संस्कृत भाषेत दुसरा कवी नाही.

३) उत्तररामचरित - या नाटकात सात अंक असून रामायणाचा उत्तरार्ध यात आला आहे. रामाच्या राज्याभिषेकापासून सीतात्यागानंतरचा आणि सीतामिलनापर्यंतचा भाग यात आला आहे. त्यातील काही घटना मूळ रामायणाप्रमाणे नसून काल्पनिक आहेत. रामायणात सीतेला धरती पोटात घेते असे असले तरी भवभूतीने नाट्यपरंपरेचे अनुकरण करून सीतामिलनाने उत्तररामचरित सुखान्त बनविले आहे.

चित्रदर्शन, रामाचे दण्डकारण्यात पुनरागमन, वासंती भेट, छायारूप सीता ह्या घटना कल्पित आहेत.

वैशिष्ट्ये -

१) 'अन्तर्मोद कमपि भवभूतिर्वितनुते:' भवभूतीची नाटके वाचताना हृदयाला एक अवर्णनीय आनंद होतो. कारण ती श्रेष्ठ साहित्यगुणांनी नटलेले आहेत.

२) 'कारुण्य भवभूतिरेव तनुते'- भवभूती रससिद्ध कवी आहे. आपल्या नाटकात त्याने वीररसाचा परिपोष केला असला तरी करुण रसाला त्याने प्राधान्य दिले आहे. करुणरसाचा आविष्कार करावा तर तो भवभूतीनेच, अशी उक्ती निर्माण झाली.

३) आवर्त, बुदबुद, तरंग हे एकाच जळाचे केवळ विकार त्याप्रमाणे जीवनातले सारे रस म्हणजे एका करुणरसाचाच आविष्कार असे त्याने उत्तररामचरितात सुचविले आहे.

भवभूतीच्या तीनही नाटकांत काही साम्ये येतात, ती येणेप्रमाणे-

१. तिन्ही नाटके कालप्रियनाथाच्या यात्रेत मोकळ्या जागेत दाखविली गेली.
२. तिन्ही नाटकांत भवभूतीने एकपत्नीव्रताचा पुरस्कार केलेला आहे.
३. करुण हाच तिन्ही नाटकांतील प्रधान रस आहे. नाटकात गद्यपद्यासाठी एकच शौरसेनी प्राकृत वापरले आहे.
४. तिन्ही नाटकांत आकाशातून गमन करणारी पात्रे आहेत.
५. सर्वत्र मोठमोठ्या शास्त्रांचे विद्वत्ताप्रचुर उल्लेख येतात.
६. स्थळकाळाची बंधने मानलेली नाहीत.

कृत्रिमता, पाल्हाळ आणि विवेचक शक्तीचा अभाव असे एकदोन दोष भवभूतीचे आहेत असे टीकाकार म्हणतात. असे दोष वगळता भवभूतीसारखा कवी संस्कृत भाषेत नाहीच. त्याने गद्याची एक दीर्घ समासयुक्त व पद्याची मधुर व प्रासादिक अशा दोन रिती- गौडी व वैदर्भी अनुसरल्या आहेत. गद्य व पद्य इतके पृथक ठेवण्याची कला भवभूतीशिवाय अन्य कवीला साधलेली नाही.

• • •

(एप्रिल, मे, जून - २०१७ अंकासाठी काही निवडक अभिप्राय)

• **डॉ. अरुणा ढेरे,** कवयित्री, पुणे :

विदर्भ साहित्य संघाच्या या अतिशय 'देखण्या' ग्रंथालयात आले आणि मन प्रसन्न झालं. पुस्तकांचं एक अतिशय सुंदर घर इथे निर्माण झालं आहे. अंतर्बाह्य सुंदर! अट्ठावीस हजार पुस्तकं! समृद्ध संदर्भसंग्रह. जोडीला सर्वसाधारण ग्रंथसंग्रह इथल्या कसदार संशोधक लेखकांची आठवण करून देणारी औचित्यपूर्ण बोधवाक्ये!

इथे यावं आणि आवडीनं किंवा अभ्यासाचं पुस्तक हातात घेऊन बसावं. वेळ कसा किती संपला हे समजूही नये- ग्रंथवेड्या माणसाला आणखी काय हवं?

मनापासून शुभेच्छा आणि धन्यवादही.

• **डॉ. आशुतोष जावडेकर,** पुणे :

एखादी वास्तूच अशी असते जिथे प्रवेश करताना आणि केल्यावरही मनात उत्फुल्ल वारा खेळत राहतो आत्मप्रत्ययाचा निर्भर वारा... स्वतःमध्ये पुन्हा डोकावून बघायला लावणारा वारा... ही ग्रंथालयाची वास्तू त्या जातकुळीची आहे हे नक्की!

शांत आणि प्रसन्न... आत्मबळ वाढवणारी ही सारी पुस्तकं... मी नक्की येणार आहे इथे पुन्हा निवांत बघायला, वाचायला...

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे
ग्रंथ ॥ सहवास ॥
वाचन संस्कृतीचे निवांत स्थळ

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी स्मृती सार्वजनिक वाचनालय आणि
विद्वत्रत्न डॉ. के. ल. (भाऊजी) दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय
ह्यांचा संयुक्त उपक्रम : ग्रंथसहवास

कार्यवृत्त

(एप्रिल २०१७ ते सप्टेंबर २०१७ या काळातील)

• सूरसरिता : ८ एप्रिल २०१७

पं. कुमार गंधर्व यांचा जन्मदिवस कलापिनी कोमकली आणि रेखा इमानदार - साने यांनी संपादित केलेल्या 'कालजयी कुमार गंधर्व' या ग्रंथाच्या पुनःप्रकाशनाने संपन्न झाला. त्यानिमित्त संगीताच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ. मोहना मार्डीकर आणि वृषाली देशपांडे यांनी कुमारजींच्या गायन विशेषांवर आपली मते मांडलीत. यावेळी कुमारजींवर राजूला शाह यांची 'सबद निरंतर' या लघुपटाची चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंजली भांडारकर यांनी केले.

• दीप लाविला... जाणा : १५ एप्रिल २०१७

संत साहित्याच्या अभ्यासकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात ज्येष्ठ समीक्षक डॉ. प्रज्ञा आपटे यांनी 'नाम तोचि देव' या विषयावर भाष्य केले. यावेळी डॉ. अलका बडगे यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला तर डॉ. कादेरा तालिब शेख (जुल्फी) यांनी उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. कोमल ठाकरे यांनी ग्रंथालयात होणाऱ्या वाङ्मयीन उपक्रमांचा आणि दिनविशेषांचा आढावा घेत सूत्रसंचालन केले.

• जागतिक पुस्तक दिवस : २२ एप्रिल (स्थळ : जागतिक पुस्तक दिनाच्या कार्यक्रमात)

सुप्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक श्रीमती दीपाली घोंगे यांनी सोफोक्लीज या ग्रीक नाटककाराच्या पु. ल. देशपांडे यांनी मराठीत रूपांतरित केलेल्या 'राजा ओयदिपौस' या शोकांतिकेवर आपले स्मरण जागविले, इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. सुपंथ भट्टाचार्य यांनी विभूतिभूषण बंदोपाध्याय यांच्या 'पथेर पांचाली' या आत्मकथनात्मक कादंबरीतील सौंदर्यस्थळांची सविस्तर चर्चा केली. ज्येष्ठ समीक्षक-कादंबरीकार डॉ. वि. स. जोग यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'माझी जन्मठेप', त्यांना जाणवलेले माहात्म्य उलगडून दाखविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती वनकर यांनी केले.

• द्विदल : १० मे २०१७

रवींद्रनाथ ठाकूर आणि कविवर्य ग्रेस यांचे जन्मदिवस ऐन वैशाखातले. या श्रेष्ठ साहित्यिकांचा जन्मदिन ग्रंथालयात संपन्न झाला. संगीतकार आदित्य बेडेकर यांनी ग्रेस यांच्या 'कावळे उडाले स्वामी' ही त्यांच्याच आवाजातील ध्वनिमुद्रित रचना ऐकविली. तर माधुरी आणि दिनकर बेडेकर या दाम्पत्याने 'गुलाब वाळविण्याची गोष्ट' या दीर्घकथेचे वाचन केले. डॉ. माधवी ग्रेस यांनी लिहिलेल्या 'केशरकुंकू' या ललितबंधाचे अभिवाचन डॉ. रजनी हसनअली हुद्दा आणि प्रा.डॉ. सुपंथ भट्टाचार्य यांनी केले. डॉ. पं. गिरीश चंद्रिकापुरे यांनी ग्रेस यांची त्यांना भावलेली कविता गाऊन सादर केली. कवी रवींद्रनाथ ठाकुर यांच्या बंगाली कविता मराठीमध्ये आणण्याचे श्रेय विदर्भात डॉ. राम म्हैसाळकर यांना जाते. त्यांनी भावानुवादिलेल्या रवींद्रनाथांच्या मराठी कवितांचे वाचन डॉ. अरुंधती वैद्य, मंदिरा गांगुली, ज्योत्स्ना पंडित, डॉ. मृणालिनी दस्तुरे, श्री. अभिषेक वाघमारे, अजित दिवाडकर यांनी केले. मुख्य अतिथी म्हणून स्वतः राम म्हैसाळकर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुचिता खनगई यांनी केले.

• आषाढस्य प्रथम दिवसे : २० जून १७

यंदा कालिदासदिनी संस्कृत अभ्यासक डॉ. विभा क्षीरसागर यांचे 'कालिदासाच्या नाट्यतंत्राचा अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या संगीत सौभद्रवरील प्रभाव' यावर व्याख्यान झाले. कार्यक्रमास संस्कृत भाषा प्रचारिणी सभेचे सचिव आचार्य चंद्रगुप्त श्रीधर वर्णेकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांचेही अभ्यासपूर्ण भाषण झाले.

• 'लावू झाड... कथेचे!' : जुलै २०१७

कथनशैलीला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता शालेय विद्यार्थ्यांसाठी त्रैमासिक स्वरूपाचा कथाकथनाचा उपक्रम हाती घेण्यात आला. जुलैतील पाचही शनिवारी नागपुरातील अकरा शाळांमध्ये विदर्भ साहित्य संघाच्या २२ प्रतिनिधींनी गुणाढ्याची कथा आणि कथाविषयक अन्य माहिती सांगितली. शाळांच्या ग्रंथालयांना १०० पुस्तकांची ग्रंथभेट देण्यात आली. तसेच शाळांमध्ये वृक्षारोपणही करण्यात आले. या उपक्रमात श्री. प्रकाश एदलाबादकर, अभिषेक वाघमारे, सुचिता खनगई, नीता खोत, रेवती जोशी (अंधारे), मंजूषा जोशी, डॉ. विनीता हिंगे, मंजूषा सोमण, विजया मारोतकर, जोत्स्ना पंडित, डॉ. अंजली भांडारकर, केतकी कानिटकर, कीर्ती वनकर आणि डॉ. अरुंधती वैद्य यांचा समावेश होता. ग्रंथालयाचे समन्वयक श्री. दिलीप म्हैसाळकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या वरील उपक्रमाला शाळांच्या व्यवस्थापनांनी, शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

• डॉ. एस. आर. रंगनाथन जन्मदिवस : ९ ऑगस्ट २०१७

डॉ. रंगनाथन जन्मदिनाच्या कार्यक्रमात ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, महाचर्चा आणि वार्षिक वाचक पुरस्कार याचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेकचे ग्रंथपाल डॉ. दीपक कापडे यांनी केले.

लयदार योग या क्रीडाप्रकारात झपाट्याने आंतरराष्ट्रीय पातळी गाठणाऱ्या कु. धनश्री लेकुरवाळे आणि संच यांचे प्रात्यक्षिक योगाचार्य श्री. राम खांडवे यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आले.

त्यानंतर हिंदुधर्म संस्कृती मंदिर या ग्रंथालयाचे समन्वयक श्री. मंगेश जोशी यांचे वाचनसंस्कृतीवर व्याख्यान झाले. दुपारच्या सत्रात 'कसा करावा सामना-ताणतणावांचा' या विषयावर विविध क्षेत्रातील आमंत्रित वक्त्यांनी आपली मते मांडलीत. त्यात श्री. सुपंथ भट्टाचार्य (शिक्षण), श्री. राजा आकाश (समुपदेशन), श्री. कार्तिक लोखंडे (पत्रकारिता), श्री. सुनील बोंडे (पोलीस विभाग), डॉ. तनुजा नाफडे (संगीत), अंजली कारंजकर (विदेशी भाषा) शिवाली देशपांडे (सैनिकी शिक्षण), स्वाती धर्माधिकारी (समुपदेशन), डॉ. उज्ज्वला चक्रदेव (स्थापत्यशास्त्र) यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता तर अतिथी म्हणून 'रेझोनन्सचे' श्री. अभिषेक बंसल यांनी अध्यक्षीय समारोप केला. वृषाली देशपांडे, मंजूषा जोशी आणि ऐश्वर्या कायंदे यांचाही सहभाग महत्त्वाचा ठरला.

• वाचक पुरस्कार - २०१७

यंदाचा वाचक पुरस्कार विजेत्या यशोदा गर्ल्स महाविद्यालयातील मराठीच्या प्राध्यापिका डॉ. विनिता हिंगे यांना विशेष अतिथी नागपूरच्या महापौर श्रीमती नंदा जिचकार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी पाच हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह देऊन डॉ. हिंगे यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ समीक्षक डॉ. प्रज्ञा आपटे यांचे वाचनसंस्कृतीवर भाषण झाले. यावेळी रातुम नागपूर विद्यापीठाची डी.लिट सर्वोच्च पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. जुल्फी शेख यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्यावतीने त्यांच्या यजमानांनी हा सत्कार स्वीकारला. सूत्रसंचालन गौरव खोंड यांनी केले.

• प्रज्ञाभरती आचार्य श्रीधर भास्कर वर्णेकर जन्मशताब्दी स्मृती व्याख्यान : १० ऑगस्ट २०१७

सांस्कृतिक समिती, ग्रंथालय समिती आणि सी.पी. ॲण्ड बेरार महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य उमा वैद्य, (कुलगुरू, क. का. संस्कृत विश्वविद्यालय रामटेक, नागपूर) यांचे 'आचार्य वसंत त्र्यंबक शेवडे आणि त्यांच्या साहित्यकृती' या विषयावर रसाळ व्याख्यान झाले. त्यास वर्णेकरांचे कुटुंबीय आवर्जून उपस्थित होते. प्राचार्य

अनुक्रमणिका

डॉ. मिलिंद बारहाते आणि डॉ. चंद्रगुप्त वर्णेकर व्यासपीठावर होते. सी.पी.ॲण्ड बेरार महाविद्यालय आणि विदर्भ साहित्य संघाच्यावतीने डॉ. उमा वैद्य यांचा शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावरील डॉ. बाराहाते, डॉ. चंद्रगुप्त वर्णेकर, डॉ. विभा क्षीरसागर यांनाही त्यांच्या सहभागाबद्दल सन्मानित करण्यात आले. डॉ. उमा वैद्य यांनी आपले व्याख्यान दृक्‌श्राव्य माध्यमातून उलगडून दाखविले.

• वार्षिक वाचक मेळावा : ११ ऑगस्ट २०१७

दि. ११ ऑगस्ट रोजी वार्षिक वाचक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. वाचक पुरस्कार विजेत्या डॉ. विनीता हिंगे यांच्या मनोगताने मेळाव्याला सुरुवात झाली. रेखा दंडिगे-घिया यांनी 'स्वगत' या विषयावर लघुशोधनिबंध सादर केला तर रंगकर्मी दीपाली घोंगे यांनी 'जिजाऊ' हे एकपात्र रंगविले. केतकी कानिटकर आणि वसंत वाहोकार यांनी कथाकथन केले. प्रमुख अतिथी म्हणून अजित दिवाडकर उपस्थित होते.

'रेनबो' नाटकाच्या लेखिका डॉ. स्मिता माहुरकर आणि दिग्दर्शक समीर हेजीब यांची ज्योत्स्ना पंडित यांनी प्रकट मुलाखत घेतली.

सूरसरिता

संध्याकाळच्या संगीतसभेत 'शब्दप्रधान गायकी' या यशवंत देव यांच्या मौलिक पुस्तकावर आधारित 'देवचाफा' या यशवंत देवांच्या निवडक रचनांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात भाग्यश्री बारस्कर, चेतन बालपांडे, मयूरेश काळे, गिरीश चंद्रिकापुरे, स्मिता जोशी यांचा सहभाग होता.

अखेरच्या सत्रात भरतमुनींच्या नाट्यशास्त्रावर डॉ. पराग घोंगे लिखित संहितेचे सोनु जेसवाणी यांच्या मदतीने नावीन्यपूर्ण अभिवाचन सादर करण्यात आले. वार्षिक वाचक मेळाव्याची सांगता शर्वरी वैद्य आणि प्रकाश एदलाबादकर यांच्या ग्रंथपुष्पांजलीने झाली.

• 'रचनेच्या खोल तळाशी' : १८ ऑगस्ट २०१७

'रचनेच्या खोल तळाशी' या उपक्रमात सुप्रसिद्ध कवी-गीतकार, 'गुलजार' यांच्या हिंदी कवितांचे श्रद्धा भारद्वाज यांनी अभिवाचन केले. विवेक अलोणी यांनी गुलजार यांच्या हिंदी कवितांच्या कवी सौमित्र यांनी मराठीत केलेल्या भावानुवादाचे अभिवाचन सादर केले. शर्वरी वैद्य यांनी सूत्रसंचालन केले. दिलीप म्हैसाळकर यांच्या हस्ते मान्यवरांना ग्रंथभेट देण्यात आली.

• शिरीषाच्या सावलीत : १६ सप्टेंबर २०१७

ज्येष्ठ कवयित्री, पत्रकार, लेखिका शिरीष पै यांच्या निधनानंतर 'शिरीषाच्या सावलीत' हा अभिवादनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जर्मन भाषेच्या अंजली कारंजकर यांनी पै यांच्या हायकूवर प्रकाशझोत टाकला. डॉ. अरुंधती वैद्य यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

• ग्रंथचर्चा २३ सप्टेंबर २०१७

नंदा खरे या विचारवंत लेखकाच्या २०१५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'उद्या' कादंबरीवर ग्रंथालयात ग्रंथचर्चा आयोजित करण्यात आली. यावेळी अनुराधा मोहनी, अभिषेक वाघमारे व डॉ. विनिता हिंगे यांची चिकित्सक भाषणे झालीत. रंगत आली. यावेळी डॉ. विद्यागौरी खरे यांनी 'उद्या' या कादंबरीवर जॉर्ज ऑरवेल व जॉन स्टाईनबेक या दोन आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या लेखकांचा प्रभाव ठळकपणे जाणवतो, असे मत व्यक्त केले.

अनुक्रमणिका

• वाचन प्रेरणा दिवस : १४ ऑक्टोबर २०१७

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी शालेय विद्यार्थ्यांसाठी 'प्रिय डॉ. कलाम यांना पत्र' या विषयावीरल लेखनस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यापक विद्यालय, नागपूरच्या दीक्षा उके व मनोज्ञा वैद्य यांनी विभागून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

दुसऱ्या 'उत्स्फूर्त अभिव्यक्ती' या स्पर्धात्मक उपक्रमात डॉ कलाम यांच्या 'अग्निपंख' आत्मचरित्रातील प्रसंगकथन करणारी स्पर्धा आयोजित केली गेली. या स्पर्धेत अनेक विद्यार्थी व शिक्षकांनी परीक्षक म्हणून अरविंद पुराणिक, डॉ. अरुंधती वैद्य आणि जयश्री रॉबर्ट यांनी काम बघितले. सोमलवार हायस्कुल, रामदासपेठ. या शाळेच्या कु. गार्गी भाकरे यांना प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव खोंड व प्रतिमा पाटील यांनी संयुक्तपणे केले. कार्यक्रमाच्या अतिथी डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांनी उपस्थितांशी वाचन संस्कृतीविषयी दिलखुलास संवाद साधला.

- डॉ. अरुंधती वैद्य
संचालक, ग्रंथालय

(एप्रिल, मे, जून - २०१७ अंकासाठी काही निवडक अभिप्राय)

• **श्री. शिरीष जोशी,** ज्ञानमुद्रा, नागपूर :
शोभा धनवटे व डॉ. रमा गोळवलकर

पुस्तकांचं गावं कसं असावं? प्रश्न प्रत्येक ग्रंथप्रेमींच्या मनात खोल कुठेतरी दडलेला असतोच. आज आम्ही या पुस्तकाच्या गावाचा साक्षात्कार अनुभवला!!! विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या 'ग्रंथसहवास' या ग्रंथग्रामात आम्ही तिघे, सुश्री शोभा धनवटे, डॉ. रमा गोळवलकर आणि शिरीष जोशी, ज्ञानमुद्रातर्फे या सर्व उपक्रमांना भेट देण्यासाठी आलो आणि ग्रंथसहवासचे रहिवासीच झालोत.

उपक्रमशीलतेला आमच्या शुभेच्छा!

• **श्री. विजय सातोकर,** पत्रकार, दिल्ली :

Amidst book and that too in the premiss of Vidarbh Sahitya Sangh was a trip down memory lane kindling flashes of meetings and concerts-thanks for every thing. Any possibility of makes the books available online. It will be great help to those out side Nagpur but shil love everything in the city.

• **श्री. सच्चिदानंद शेवडे,** सुप्रसिद्ध व्याख्याते, डोंबिवली, ठाणे

विदर्भ साहित्य संघात जाण्याचा योग आला. अतीव उत्तम कार्यालय व नियोजित नाट्यगृह पाहून छान वाटले. त्याचप्रमाणे 'ग्रंथसहवास' पाहिले. सुमारे ६५००० हून अधिक ग्रंथ आणि संदर्भग्रंथ आहेत. अत्यंत समृद्ध ग्रंथालय आणि त्याचे उपक्रम एकूण बरे वाटले. श्री. म्हैसाळकरांशी मनमोकळ्या गप्पा झाल्या. विचारांचे आदान-प्रदान नेहमीच चांगले असते.

एकंदरीत येथील वेळ सत्कारणी लागला.

धन्यवाद प्रकाश एदलाबादकर!

विदर्भ साहित्य संघ

मकर संक्रांत १९२३

आमची प्रकाशने

• **मराठी वर्णोच्चार विकास** : डॉ. द . ह. अग्निहोत्री	१००.०० रु.
• **लोकसाहित्य संपदा** : संपादक : ना. रा. शेंडे	१००.०० रु.
• **आणखी गडकरी** : डॉ. मधुकर आष्टीकर	२५.०० रु.
• **तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७** : डॉ. र. शं. केळकर	६०.०० रु.
• **'प्रातिभ' : प्रातिनिधिक लघुकथासंग्रह (१९८०)** : संकलन : प्रा. ज. रा. फणसाळकर	१००.०० रु.
• **समग्र वजाबा** : संपादन / संकलन - द. भा. प्रधान	१००.०० रु.
• **ज. के. उपाध्ये यांची कविता (१८८३ - १९९३)** : संपादन : डॉ. आशा सावदेकर	१००.०० रु.
• **दक्षिणेतील दोन आचार्य** : तर्कतीर्थ लक्ष्मशास्त्री जोशी	२०.०० रु.
• **कविता विदर्भाची** : संपादन : डॉ. आशा सावदेकर	१२५.०० रु.
• **छंदःशास्त्र : एक अध्ययन** : कुंदर दिवाण	४०.०० रु.
• **वसंतवैभव : (कै. व. कृ. वन्हाडपांडे)** : संपादन : डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुलकर्णी	१५०.०० रु.
• **धन्यतेची थाप** (निवडक प्रस्तावना) : डॉ. वि. भि. कोलते	१००.०० रु.
• **वक्ता दशसहस्रेषु** : (प्रा. राम शेवाळकर यांची भाषणे) - संपादक : डॉ. वि. स. जोग	१५०.०० रु.
• **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड १** : संपादक : सा. भू. तु. ना. काटकर	२००.०० रु.
• **विदर्भ साहित्य संमेलने : अध्यक्षीय भाषणे : खंड २** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	२५०.०० रु.
• **विविध प्रवाही साहित्य संमेलनांची अध्यक्षीय भाषणे** : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी	३००.०० रु.
• **युगवाणी साहित्य सूची** : संपादक : केशव जोशी	१००.०० रु.
• **युगवाणी साहित्य सूची** (पुरवणी) : संपादक : केशव जोशी	७५.०० रु.
• **वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८)** : संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी	१००.०० रु.
• **कै. वा. ना. देशपांडे यांचे स्फुटलेखन, ३ खंड : तुलाधर, चित्रगुप्त, त्रिविक्रम** : संपादक : प्रा. राम शेवाळकर	१०००.००रु.
• **विदर्भ साहित्य संघ - अमृत महोत्सवी स्मरणिका (१९९९)** : संपादन : वामन तेलंग	२००.०० रु.
• **युगवाणी : ग. त्र्यं. माडखोलकर विशेषांक १९९८** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर	१००.०० रु.
• **युगवाणी : कुसुमावती देशपांडे जन्मशताब्दी विशेषांक (२००४-०५)** : संपादन : डॉ. सुलभा हेर्लेकर	१००.०० रु.
• **युगवाणी : वसंत आबाजी डहाके विशेषांक** : संपादक - प्रा. अजय देशपांडे - २०११-१२	१००.०० रु.
• **युगवाणी : ग्रेस विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे २०१२-१३ (आवृत्ती संपली)	
• **युगवाणी : नामदेव ढसाळ विशेषांक** : संपादक : प्रा. अजय देशपांडे - २०१३-१४	१००.०० रु.
• **निवडक युगवाणी भाग १** : संपादक : वामन तेलंग - २०१४-१५	३५०.०० रु.
• **निवडक युगवाणी : भाग २** : संपादक : वामन तेलंग - २०१५-१६	३५०.०० रु.

विदर्भ साहित्य संघाने आजवर प्रकाशित केलेल्या दुर्मिळ २० ग्रंथांचा संच २००० रुपयांत उपलब्ध (पार्सल खर्च वेगळा). महाविद्यालये, ग्रंथालये आणि अभ्यासकांनी संपर्क करावा.



श्रद्धांजली

ज्येष्ठ नाटककार, अभिनेते व दिग्दर्शक
प्रा. मधुकर तोरडमल
२४ जुलै १९३२ - २ जुलै २०१७

~~~

सुप्रसिद्ध लेखक आणि पत्रकार
अरुण साधू
१७ जून १९४१ - २५ सप्टेंबर २०१७

~~~

ज्येष्ठ कवियित्री आणि सामाजिक कार्यकर्त्या
शिरीष पै
१५ नोव्हेंबर १९२९ - २ सप्टेंबर २०१७

~~~

सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार
मंगेश तेंडुलकर
१९३४ - १० जुलै २०१७

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व लेखक
भीमराव गस्ती
१९५० - ८ ऑगस्ट २०१७

~~~

सुविख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि वैज्ञानिक
प्रोफेसर यशपाल
२६ नोव्हेंबर १९२६ - २४ जुलै २०१७

~~~

ज्येष्ठ कवी आणि अनुवादक
चंद्रकांत देवतळे
७ सप्टेंबर १९३६ - १५ ऑगस्ट २०१७

~~~

प्रसिद्ध अभिनेते
टॉम ऑल्टर
२२ जून १९५० - २९ सप्टेंबर २०१७

अनुक्रमणिका


With Best Compliments From...
Pt. Shankarprasaad Agnihotri
Chairman
Shri Sachin S. Agnihotri
Secretary
Jai Mahakali Shikshan Sanstha
AGNIHOTRI GROUP OF INSTITUTIONS, WARDHA
Agnihotri College Campus, Bapuji Wadi, Sindi (Meghe) Wardha 07152 661111, 243575
Running Various Courses in the field of
• Engineering
• Pharmacy
• Polytechnic
• Computer Science
• Management
• Law
• Physical Education
• Colleges of Education
• Public School (CBSE Board)
• Junior College
• State Board Schools
A temple of learning which
open the Doors to New Era of Education

अनुक्रमणिका